ग्रं. स. वाचनालय, ठाणे.
विषय कादंब
क्र. 23213

IRBK-0123213

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

चना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, से न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे ा वर्गणी भरावी लागेल.

20 MAR 1996

2 2 AUG 2000

OCT 20

(क्रू. मा. पहा)
२०००-१२-८८

# सुख पाहता

वसंत कानेटकर

IRBK-0123213

परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबई - ४.

प्रकाशक
सौ. शुभदा विष्णू परचुरे
परचुरे प्रकाशन मन्दिर,
३११, राजा राममोहन रॉय मॉर्ग,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

आवृत्ती पहिली
२ फेब्रुवारी १९८९

मूल्य पंचवीस रुपये

मुखपृष्ठ
राज ठाकरे

मुद्रक
स. म. वैद्य
जॉली ऑफसेट
१४, वडाळा उद्योग भवन,
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

अक्षर-जुळणी
अस्ती लेझर प्रिंटस,
१७८, प्रार्थना समाज,
गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

या नाटकाच्या प्रयोगाचे, भाषांतराचे, चित्रपटाचे इत्यादी सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन आहेत. आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करु नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि प्रयोगमूल्य यांबद्दल सौ. उषा वसंत कानेटकर, शिवाई, शरणपूर रोड, नाशिक - ४२२ ००२ येथे पत्रव्यवहार करावा.
दूरध्वनी क्रमांक ७३०१२.

# निवेदन

'सुख पाहता' – हे नाटक म्हणजे एक फार्स अथवा प्रहसन आहे. या प्रहसनात 'चमत्कारा'च्या रूपाने मी फँटसी मिसळली आहे. कशासाठी ? नाटक शेवटपर्यंत पाहिल्यावरच उलगडेल. "असे कधी तरी घडणे शक्य आहे का ?" अथवा "यामुळे अंधश्रद्धा बळावणार नाही का ?" असले काही वृत्तपत्रीय समीक्षकांनी विचारलेले सवाल माझे रसिक वाचक प्रेक्षक तरी विचारणार नाहीत अशी माझी खात्री आहे. प्रहसनात्मक फँटसीला वास्तववादी नाटकाचे निकष लावून तिचे मूल्यमापन करणे म्हणजे 'खमंग पिठल्याची, पुरणाच्या पोळीशी तुलना करण्यासारखे आहे. फार्सचा जन्मच मुळी मनमुराद हसण्यासाठी असतो. यात व्यक्तिचित्रे व्यंगचित्रांच्या ढंगाने रंगली जातात तर 'दैव' विदूषकी रूपात हसत खेळत अवतरते.

निव्वळ हसण्या-हसवण्यासाठी लिहिलेल्या या प्रहसनात आदेश-उपदेश वगैरे काही नाही. म्हटलेच तर – "इच्छा म्हणजे एक अग्नी आहे. तो जाळीतच सुटतो आणि मागे ठेवतो फक्त अतृप्तीची राख... इच्छेची पूर्ती हा दैवाचा खेळ आहे. सुख ही ईश्वरी कृपा आहे. सुखासाठी खूप द्यावं लागतं, सोसावं लागतं, कष्टावं लागतं, झिजावं लागतं, प्रसंगी इच्छा देखील माराव्या लागतात... ठेचांवर ठेचा खाऊन बालपणापासून माणसाला शहाणपण शिकावं लागतं. पण तो जेव्हा संपूर्ण शहाणा होतो तेव्हा त्याचं आयुष्यच संपलेलं असतं...." हा अध्यात्म-विचार अंमळ गमतीनं दाखवण्याची मी या नाटकात धडपड केलीय. त्यासाठीच तर प्रहसनात फँटसी (अद्‌भुतरम्यता) मिसळली आहे. अध्यात्म, अद्‌भुतरम्यता आणि विनोद यांचे हे मिश्रण रसिकांना आवडले तर त्या दिशेने मी आणखी काही प्रयोग करून पाहण्याचे ठरवले आहे. तसा हा प्रकार काही मी प्रथमच जन्माला घालतो आहे असे नाही. बायबलमधील ख्रिस्त-कथा, बुद्धाच्या जातक-कथा, खलिल जिब्रान आणि इसाप यांच्या नीतीकथा आणि 'गीताई' मधील विनोबांच्या दृष्टांतकथा याच जातीच्या आहेत.

या नाटकाचा प्रयोग श्री. दिलीप कोल्हटकरांनी फार कल्पकतेने आणि खुमासदार ढंगाने बसवला आहे. श्री. यशवंत दत्त, श्री. सुनील शेंडे, श्री. अच्युत देशिंगकर, श्री. नमशीकर, अमिता खोपकर, कीर्ती शरद यांनी आपल्या बहारदार अभिनयाने प्रयोगाला अजोड रंगत आणली आहे. त्यात श्री. अनंत अमेंबल यांची संगीत योजना, श्री. बोरकरांची दाद द्यावी अशी रंगभूषा, आणि श्री. मोहन वाघ यांची प्रकाश व नेपथ्य योजना, यांनी विलक्षण आल्हाददायी भर टाकली आहे. श्री. मोहन वाघ यांची निर्मितीमूल्ये आणि अप्पा परचुरे यांची प्रकाशन दृष्टी ही माझ्या नाटकांची नेहमीच विलोभनीय वैशिष्ट्ये असतात. एका दिवशी तीन नवी नाटके सादर करण्याच्या आव्हानात चंद्रलेखेचे इतर कलाकार आणि कार्यकर्ते – विशेषतः श्री. कदम आणि श्री. शिंदे यांनी अपरंपार कष्ट घेतले. या सर्वांच्या आधारावरच 'चंद्रलेखा' उभी आहे, श्री. मोहन वाघ उभे आहेत आणि त्यांच्या खांद्यावर मी उभा आहे.

मी या सर्वांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

– वसन्त कानेटकर

वसंत कानेटकर लिखित 'सुख पाहता' या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग, चंद्रलेखा संस्थेने, शनिवार दि. ३१ डिसेंबर १९८८ रोजी सकाळी ११ वा. शिवाजी मंदिर, दादर येथे सादर केला.

दिग्दर्शक – दिलीप कोल्हटकर
पार्श्वसंगीत – अनंत अमेंबल
ध्वनी – अशोक डोइफोडे
वेशभूषा – अनिल दळवी, चंद्रकांत गमरे
नेपथ्य साहाय्यक – बाबू पुरोहित
गीतरचना कविश्रेष्ठ मंगेश पाडगांवकर
निर्मिती साहाय्यक – हनुमान शिंदे

निर्मिती/नेपथ्य/प्रकाश – मोहन वाघ
रंगभूषा – कृष्णा बोरकर, श्रीराम शिंदे
प्रकाशयोजना साहाय्यक – दादा वैद्य
केशरचना – वृंदावन रंगभूषा
रंगमंच व्यवस्था – अण्णा शिंदे आणि सहकारी
व्यवस्थापक – मनोहर कदम

## – कलाकार –

| | |
|---|---|
| गजानन | अच्युत देशिंगकर |
| मीरोपंत | सुनील शेंडे |
| मंदा | अमिता खोपकर |
| लैला राजे | कीर्ती शरद |
| हैबती | महेश नमशीकर |
| काळू दरोडेखोर | ताता नाईक |
| आणि – महंतराज, ॲडव्होकेट जमदग्नी, मदनकुमार, श्रीकृष्ण, मुकुंद माधवाचार्य आणि पिऱ्या दरोडेखोर यांच्या सहा भूमिकांत | यशवंत दत्त |

# सुख पाहता

23273

## अंक पहिला ✤ प्रवेश पहिला

(जहागीरदार बाबा महाराज चिंचलीकर यांचा पुण्याजवळच्या चिंचली गावातला जुना वाडा. रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा समोर दिसतो या वाड्यातला पहिल्या मजल्यावरला दिवाणखाना. कोणत्याही इनामदाराच्या वाड्यातल्या दिवाणखान्यासारखाच हाही एक दिवाणखाना. छताला हंड्या, झुंबर, जमिनीवर गालिचा, गादी, लोड, तक्के. त्यातच जुन्या शाही थाटाच्या खुर्च्या, एक दिवाण, एक टेबल-खुर्ची, एक आरशाचे कपाट, भिंतीवर जुन्या झालेल्या रविवर्म्याच्या तसबिरी, कोपऱ्यात भिंतीत बसवलेली एक तिजोरी. वेळ सायंकाळची. गजानन चिंचलीकर, एक देखणा तरुण पाठीवर हात घेऊन प्रक्षुब्ध मुद्रेने दिवाणखान्यात येरझारा घालीत आहे. समोर दिवाणावर मंदाकिनी, एक बऱ्या रूपाची तरुणी, त्याच्याकडे अगतिकतेनं पाहत बसली आहे. क्षणभराने)

**मंदा** : (धीर करून) मग अण्णांना काय सांगू मी आता ? ते आता मुळीच थांबायला तयार नाहीत. या मार्गशीर्षात माझं लग्न झालंच पाहिजे असं निक्षून सांगितलंय त्यांनी मला.

**गजानन** : हूं ऽऽ! मोरोपंतांचंही बरोबरच आहे. मंदे, अग तू त्यांची एकुलती एक मुलगी. आईविना त्यांनी वाढवलेली. त्यांचंही वय झालंय. तेव्हा तुला लवकर उजवून जबाबदारीतून मोकळं व्हावं, असं त्यांना वाटायचंच की !

**मंदा** : पण गजानन, तुझा विचार काय आहे ? तू काय ठरवलं आहेस ?

**गजानन** : हे बघ, बाबा महाराज आता आजारी पडलेत. या दुखण्यातून ते उठतीलसं मला वाटत नाही. माझ्यासारख्या एका अनाथ, पोरक्या, आपल्या स्वयंपाकिणीच्या मुलाला, त्यांनी संभाळलं, वाढवलं, हे त्यांचे मोठे उपकारच आहेत माझ्यावर. कदाचित ते मला दत्तक सुद्धा घेतील. निदान बऱ्यापैकी पैसा-अडका तरी

फोफावलंय.

गजानन : हे तुझं झालं. पण माझा काही विचार ?

मंदा : तुझा विचार ? तुझा कसला विचार ? तुझं माझ्यावर आता प्रेम राहिलं नाहीये का ?

गजानन : प्रेम अजिबात राहिलं नाहीये, असंच काही मी म्हणत नाही. पण जे प्रेम उरलंय, त्यात तसा काही दमच राहिला नाहीये.

मंदा : दमच राहिला नाहीये, म्हणजे ?

गजानन : नळाला पाणी कसं बुळ्बुळ् येतं, तसं थोडं फार प्रेम ठिबकत असेल माझं तुझ्यावर. पण रस्त्यावरला पाइप फुटला की कसं शंभर शंभर फूट उंच कारंजं उसळतं, तसं प्रेम, लग्न करुन संसारात पडायचं म्हणजे, हृदयात उसळावं लागतं. प्रेमात पडणं म्हणजे धबधब्यात झोकून देणं, झपाटून जाणं, भोवऱ्यात गरगरा फिरणं, बघता बघता माणसाचं पार भिरभिरं होऊन जाणं. तसं कधी आपलं झालं होतं का ?

मंदा : तू काय बडबडतो आहेस गजानन, ते मला कळत नाहीये.

गजानन : तसं ते कळण्याच्या पलीकडचंच प्रकरण आहे. ते अनुभवावंच लागतं. म्हणण्याचा सारांश इतकाच की आपलं वैवाहिक जीवन काही सुखाचं होणार नाही. तेव्हा तू दुसरा सुयोग्य वर पाहा आणि त्याच्याशी लग्न करुन संसाराला लाग. मी माझ्या प्रेयसीची योग्य वेळी निवड करीन. ओ. के. ?

मंदा : 'प्रेयसीची निवड करीन' की आधीच 'निवड केली आहेस ?'

गजानन : (गडबडून) त...त... तुला म्हणजे नेमकं काय म्हणायचंय मंदे ?

मंदा : सध्या बाबा महाराजांची सेवा-शुश्रूषा करायला या वाड्यावर एका नव्या तरुण सुंदर नर्सची नेमणूक झालीय. रोज सकाळी ती पुण्याहून येते आणि रात्री ती परत जाते. लैला राजे. तिच्यापुढं या वर्षभरात तू कसा गोंडा घोळतो आहेस, ते काय मला दिसत नाही, का समजत नाही, असं तुला वाटतं ?

गजानन : हे बघ, या माझ्या निर्णयाशी लैलाचा काही एक संबंध नाही. एकदा तुझा-माझा संबंध संपला म्हटल्यावर, मी हवा तिच्यापुढे गोंडा घोळीन नाही तर नाक घाशीन. तुला काय करायची पंचाईत ?

मंदा : तुझा-माझा संबंधं संपलाय, असं मी मानीत नाही. तू मला लग्नाचं वचन दिलं आहेस तीन वर्षांपूर्वी.

गजानन : त्या वेळी मला अक्कल नव्हती. मी महामूर्ख, गाढव होतो. आता मला तुझ्याशी लग्न करायचं नाही, नाही, नाही ! तू काय करणार आहेस ?

मंदा : जे काय करायचं ते अण्णाच करतील. मी फक्त तुझी वाट पाहीन.

गजानन : उद्या मी लग्न केलं, तरी तू काय जन्मभर माझी वाट पाहणार आहेस ?

मंदा : ती लैला, बारा गावचं पाणी प्यायलेली बनेल मुलगी. ती काय जन्मभर तुझ्याशी एकनिष्ठ राहणार आहे ? कधी तरी तुला ती हात दाखवून –

गजानन : शट अप्. लैलाचा इथं काही संबंध नाही, म्हणून सांगितलं तर–

मंदा : तू लैलावर लट्टू झालेला नाहीस ? खरं सांग, गळ्याची शपथ घेऊन सांग.

गजानन : (ओरडून) होय होय होय ! झालोय. काय म्हणणं आहे तुझं ? (तोच तर्रर झालेले मोरोपंत तपस्वी येतात. ते तोल संभाळून आहेत.)

मोरोपंत : तिचं काय म्हणणं आहे ते, मी तुला बरोबर सांगतो गजूबाळ. मंदे, अगोदर जाऊन सावकारांना चहा करून नेऊन दे. मी याचा समाचार घेतो.

मंदा : मी निघालेच अण्णा. पण तुम्ही गजाननला काही वेडंवाकडं बोलू नका.

मोरोपंत : कळलं कळलं. मूर्खे, तुझी अक्कल काय ती चुलीपुढं. तू जा अगोदर; सांगितलेलं काम कर; नाही तर म्हातारा कोकलत येईल इथं.

मंदा : पण अण्णा –

मोरोपंत : हे बघ, आधी मी याचं कोंबडं भाजतो, मग तुला कसं तळून काढायचं ते ठरवतो. जा. (मंदा जाते. मग मोरोपंत आपल्या अंगातल्या कोटाच्या आतल्या खिशात ठेवलेली चपटी व्हिस्कीची बाटली, खिशात हात घालून आतल्या आत उघडतात, आणि खिशासकट वर करून तोंडाला लावीत, एक घुटका घेऊन "हाऽऽऽ" करतात आणि –) शिंच्या या आजकालच्या कारट्यांना गळाला लागलेला मासा टोपलीत कसा टाकावा एवढं सुद्धा कळत नाही. तिथंही त्यांच्या आईबापांनीच कडमडलं पाहिजे. (बिडी शिलगावून झुरका घेत, धूर सोडत) हूंऽऽऽ तर गजाभाऊ,

त्या फुद्टाणीला पाहिल्यापासून तुमच्या हृदयात पाइप फुटून शंभर फूट उंच कारंजं उसळायला लागलंय म्हणता ? थोडा घुटका घेता एक घुटका ?

गजानन : तुम्हाला ठाऊक आहे मोरोपंत, मी दारूला कधीच स्पर्श करीत नाही.

मोरोपंत : पण तरण्याताठ्या पोरींना संधी मिळेल तेव्हा स्पर्श करता, काय ?

गजानन : मंदाला मी - त - तसा स्पर्श केला नाही कधी.

मोरोपंत : मग काय चिमणीच्या दातांनी, तोंडावर रुमाल घेऊन चुंबन घेत होता? (हसतात) प्रेमाच्या व्यवहारात इतपत देवाण-घेवाण क्षम्य आहे. पण औषध म्हणून तरी तुम्ही दारूचा एक घुटका घेत चला. म्हणजे हृदयातल्या फुटलेल्या पाइपची आपोआप दुरुस्ती होईल. धमन्यांतून बुळूबुळू वाहणाऱ्या रक्ताचा दाबही वाढेल. शिवाय तो भोवरा.. तो धबधबा.. चट सारे बूच मारल्यासारखे बंद होतील. वाळलेल्या कोंबाला पालवी फुटेल, आणि आटलेल्या प्रेमाचा खवा तरी नक्कीच खायला मिळेल. ग्लास घेऊन या एक.

गजानन : मोरोपंत, तुम्ही तळघरात जाऊन बाबा महाराजांच्या कपाटातल्या बाटल्यांवर डल्ला मारता आणि –

मोरोपंत : पोरीबाळींच्यावर डल्ला मारण्यापेक्षा बाटलीवर डल्ला मारणं हा काही फार मोठा गुन्हा नाहीये. मुद्द्याचं बोला राव, मुद्द्याचं बोला. मंदाबद्दल तुम्ही काय ठरवलंय ?

गजानन : मला मंदाशी लग्न करायचं नाही.

मोरोपंत : असं का ? मग काय तुम्हाला त्या लैलाचा मजनू व्हायचंय ?

गजानन : त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय ?

मोरोपंत : पुष्कळ काही करायचंय. पण पूर्वी त्या अस्सल लैलाच्या पायात खराखुरा मजनू पार ठार झाला होता म्हणे. तसं काही तुमचं होणार नाही ना ? संभाळा हो.

गजानन : माझं काय वाट्टेल ते झालं तरी तुम्हाला का काळजी ?

मोरोपंत : (झुरका घेत) अरे गजा, लेका तू एका अनाथ विधवा स्वयंपाकिणीचा बच्चा. तुला मी माझी कुलशीलवान मुलगी, सालंकृत जमीनजुमल्यासह द्यायला राजी झालो. तर तू माझ्यावरच मस्तीत गुरकावतोस ? का रे ऽऽ ? एवढी कसली मिजास चढलीय तुला ? तू कितीही गोंडा घोळत बसलास, तरी

ती गोरीगोमटी गावभवानी तुझ्यावर भाळणार आहे का ? तिच्या नादी लागून तुला कसलं सुख मिळणार आहे बापड्या ?

गजानन : मोरोपंत, ते तुमच्यासारख्या कारकुनी पेशातल्या कारभाऱ्याला या जन्मात कधी कळणार नाही.

मोरोपंत : जे मजसारख्या कारभाऱ्याला कळणार नाही, ते तुझ्यासारख्या आश्रिताला कळलंय म्हणतोस ?

गजानन : मोरोपंत, आज मी आश्रित असलो तरी एक दिवस मी धनी होण्याची दाट शक्यता निर्माण झालीय, हे विसरू नका.

मोरोपंत : वाहवा ! भले बहाद्दर ! तू धनी होणार ? हे कोणी सांगितलं तुला राजा?

गजानन : खुद्द साक्षात बाबा महाराज चिंचलीकर जहागीरदारांनी.

मोरोपंत : असंऽऽऽ ? अरे वा वा वा ! बेटा, सावकार तुला केव्हा, कुठे, काय काय, म्हणाले ते सांगशील का मला ?

गजानन : तुम्हाला ते मी काय म्हणून सांगावं ?

मोरोपंत : तू सांगितलंस तर बदल्यात मीही तुझ्या ज्ञानात थोडीफार भर घालीन. अंमळ तुला धक्का बसेल. पण तुझे पाय तरी जमिनीला लागतील.

गजानन : ठीक आहे. सांगतो. दोन दिवसांपूर्वी सायंकाळी बाबा महाराजांनी मला आपल्या पलंगावर जवळ बसवून घेतलं आणि माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, "गजानना, तू आजवर माझ्या आज्ञेत वागलास; माझी खूप सेवा केलीस. तू काळजी करू नकोस. माझ्यानंतर तुला काहीही कमी पडणार नाही, अशी मी तुझी व्यवस्था केली आहे."

मोरोपंत : (हसत) वा रे बहाद्दर ! म्हातारा पक्का बेरकी आहे यात शंका नाही. आणिक ते काय म्हणाले ? सांगायचं नसलं तर नको सांगूस. काल ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी मुंबईहून येऊन सावकारांना भेटून गेले.

गजानन : होय होय. ते कळलं मला. बाबा महाराज मृत्युपत्र तयार करून त्यात सगळी प्रॉपर्टी माझ्या नावे करून ठेवणार आहेत. त्यासाठीच –

मोरोपंत : सगळी प्रॉपर्टी ? तुझ्या नावे ? असं सांगितलं सावकारांनी तुला ? म्हणजे मग म्हातारा चांगलाच इरसाल आहे म्हणायचा. (हसत) गंमत आहे.

गजानन : तुम्हाला ही सगळी गंमत वाटते, मोरोपंत ?

मोरोपंत : मला जे ठाऊक आहे ते तुला समजल्यावर तुलाही त्यातली गंमत कळेल. कान घट्ट करून ऐक. श्रीमंत जहागीरदार बाबा महाराज चिंचलीकर लवकरच लग्न करताहेत.

गजानन : (चाट होत) क - काय, काय, काय ? बाबा महाराज ? लग्न करणार आहेत ? या या वयात लग्न ? कोणाशी ?

मोरोपंत : कुमारी लैलाराणी राजे हिच्याशी.

गजानन : छे छे शक्य नाही. शक्यच नाही – लैला कशी तयार होईल या लग्नाला ?

मोरोपंत : कशी तयार होईल म्हणून काय विचारतोस ? राजा, अरे ती तयार झालीय. आता बोल.

गजानन : मला नाही खरं वाटत. लैला काही इतकी मूर्ख नाहीये.

मोरोपंत : छे छे – मूर्ख तर मुळीच नाहीये. उलट फार शहाणी आहे; पक्की वस्ताद आहे. सावकार किती काळ जगणार आहेत अजून, हे तिला चांगलं ठाऊक आहे. म्हातारा खपला की सगळा पैसा-अडका, जमीन-जुमला तिलाच मिळणार. त्या दृष्टीने लग्नाचा व्यवहार हा काही तिला आतबट्ट्याचा होणार नाही.

गजानन : नाही नाही, माझा यावर मुळीच विश्वास बसत नाही. सावकार काही इतके लबाड, लंपट, उल्लू नाहीत आणि लैलाही इतकी बनेल मुलगी नाही.

मोरोपंत : ठीक आहे. घोडा-मैदान, जवळच आहे.

गजानन : मी मंदाशी लग्न करावं म्हणून तुम्ही मला मुद्दाम खोटं-नाटं रचून सांगताहात.

मोरोपंत : मंदाची गोष्ट तू सोडून दे. तिचा प्रश्न मिटला. तिचं लग्न हा काही फार गंभीर प्रश्न नाहीये. तिच्या भावी नवऱ्याला मी जे देणार आहे, ते कळल्यावर तिला मागणी घालणाऱ्यांची माझ्या दारात रांग लागेल रांग. पण सावकारांनी मृत्युपत्रात तुझी काय 'व्यवस्था' करून ठेवलीय तीही ऐकून ठेव.

गजानन : काय व्यवस्था केलीय माझी ?

मोरोपंत : 'व्यवस्था' कसली बोडक्याची ? पा ऽ र 'अवस्था' करून टाकलीय तुझी.

गजानन : अवस्था म्हणजे ?

मोरोपंत : म्हणजे असं की ... (वाचल्यासारखे बोलत) चिरंजीव गजानन चिंचलीकर हा आमच्या अनाथ विधवा स्वयंपाकिणीचा मुलगा, या वाड्यावरच वाढला; आमच्या आज्ञेत राहिला; आणि

ती गोरीगोमटी गावभवानी तुझ्यावर भाळणार आहे का ? तिच्या नादी लागून तुला कसलं सुख मिळणार आहे बापड्या ?

गजानन : मोरोपंत, ते तुमच्यासारख्या कारकुनी पेशातल्या कारभाऱ्याला या जन्मात कधी कळणार नाही.

मोरोपंत : जे मजसारख्या कारभाऱ्याला कळणार नाही, ते तुझ्यासारख्या आश्रिताला कळलंय म्हणतोस ?

गजानन : मोरोपंत, आज मी आश्रित असलो तरी एक दिवस मी धनी होण्याची दाट शक्यता निर्माण झालीय, हे विसरू नका.

मोरोपंत : वाहवा ! भले बहाद्दर ! तू धनी होणार ? हे कोणी सांगितलं तुला राजा?

गजानन : खुद्द साक्षात बाबा महाराज चिंचलीकर जहागीरदारांनी.

मोरोपंत : असंऽऽऽ ? अरे वा वा वा ! बेटा, सावकार तुला केव्हा, कुठे, काय काय, म्हणाले ते सांगशील का मला ?

गजानन : तुम्हाला ते मी काय म्हणून सांगावं ?

मोरोपंत : तू सांगितलंस तर बदल्यात मीही तुझ्या ज्ञानात थोडीफार भर घालीन. अंमळ तुला धक्का बसेल. पण तुझे पाय तरी जमिनीला लागतील.

गजानन : ठीक आहे. सांगतो. दोन दिवसांपूर्वी सायंकाळी बाबा महाराजांनी मला आपल्या पलंगावर जवळ बसवून घेतलं आणि माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, "गजानना, तू आजवर माझ्या आज्ञेत वागलास; माझी खूप सेवा केलीस. तू काळजी करू नकोस. माझ्यानंतर तुला काहीही कमी पडणार नाही, अशी मी तुझी व्यवस्था केली आहे."

मोरोपंत : (हसत) वा रे बहाद्दर ! म्हातारा पक्का बेरकी आहे यात शंका नाही. आणिक ते काय म्हणाले ? सांगायचं नसलं तर नको सांगूस. काल ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी मुंबईहून येऊन सावकारांना भेटून गेले.

गजानन : होय होय. ते कळलं मला. बाबा महाराज मृत्युपत्र तयार करून त्यात सगळी प्रॉपर्टी माझ्या नावे करून ठेवणार आहेत. त्यासाठीच –

मोरोपंत : सगळी प्रॉपर्टी ? तुझ्या नावे ? असं सांगितलं सावकारांनी तुला ? म्हणजे मग म्हातारा चांगलाच इरसाल आहे म्हणायचा. (हसत) गंमत आहे.

गजानन : तुम्हाला ही सगळी गंमत वाटते, मोरोपंत ?

मोरोपंत : मला जे ठाऊक आहे ते तुला समजल्यावर तुलाही त्यातली गंमत कळेल. कान घट्ट करून ऐक. श्रीमंत जहागीरदार बाबा महाराज चिंचलीकर लवकरच लग्न करताहेत.

गजानन : (चाट होत) क - काय, काय, काय ? बाबा महाराज ? लग्न करणार आहेत ? या या वयात लग्न ? कोणाशी ?

मोरोपंत : कुमारी लैलाराणी राजे हिच्याशी.

गजानन : छे छे शक्य नाही. शक्यच नाही – लैला कशी तयार होईल या लग्नाला ?

मोरोपंत : कशी तयार होईल म्हणून काय विचारतोस ? राजा, अरे ती तयार झालीय. आता बोल.

गजानन : मला नाही खरं वाटत. लैला काही इतकी मूर्ख नाहीये.

मोरोपंत : छे छे – मूर्ख तर मुळीच नाहीये. उलट फार शहाणी आहे; पक्की वस्ताद आहे. सावकार किती काळ जगणार आहेत अजून, हे तिला चांगलं ठाऊक आहे. म्हातारा खपला की सगळा पैसा-अडका, जमीन-जुमला तिलाच मिळणार. त्या दृष्टीने लग्नाचा व्यवहार हा काही तिला आतबट्ट्याचा होणार नाही.

गजानन : नाही नाही, माझा यावर मुळीच विश्वास बसत नाही. सावकार काही इतके लबाड, लंपट, उल्लू नाहीत आणि लैलाही इतकी बनेल मुलगी नाही.

मोरोपंत : ठीक आहे. घोडा-मैदान, जवळच आहे.

गजानन : मी मंदाशी लग्न करावं म्हणून तुम्ही मला मुद्दाम खोटं-नाटं रचून सांगताहात.

मोरोपंत : मंदाची गोष्ट तू सोडून दे. तिचा प्रश्न मिटला. तिचं लग्न हा काही फार गंभीर प्रश्न नाहीये. तिच्या भावी नवऱ्याला मी जे देणार आहे, ते कळल्यावर तिला मागणी घालणाऱ्यांची माझ्या दारात रांग लागेल रांग. पण सावकारांनी मृत्युपत्रात तुझी काय 'व्यवस्था' करून ठेवलीय तीही ऐकून ठेव.

गजानन : काय व्यवस्था केलीय माझी ?

मोरोपंत : 'व्यवस्था' कसली बोडक्याची ? पा ऽ र 'अवस्था' करून टाकलीय तुझी.

गजानन : अवस्था म्हणजे ?

मोरोपंत : म्हणजे असं की ... (वाचल्यासारखे बोलत) चिरंजीव गजानन चिंचलीकर हा आमच्या अनाथ विधवा स्वयंपाकिणीचा मुलगा, या वाड्यावरच वाढला; आमच्या आज्ञेत राहिला; आणि

ती गोरीगोमटी गावभवानी तुझ्यावर भाळणार आहे का ? तिच्या नादी लागून तुला कसलं सुख मिळणार आहे बापड्या ?

गजानन : मोरोपंत, ते तुमच्यासारख्या कारकुनी पेशातल्या कारभाऱ्याला या जन्मात कधी कळणार नाही.

मोरोपंत : जे मजसारख्या कारभाऱ्याला कळणार नाही, ते तुझ्यासारख्या आश्रिताला कळ्ळंय म्हणतोस ?

गजानन : मोरोपंत, आज मी आश्रित असलो तरी एक दिवस मी धनी होण्याची दाट शक्यता निर्माण झालीय, हे विसरू नका.

मोरोपंत : वाहवा ! भले बहाद्दर ! तू धनी होणार ? हे कोणी सांगितलं तुला राजा?

गजानन : खुद्द साक्षात बाबा महाराज चिंचलीकर जहागीरदारांनी.

मोरोपंत : असंऽऽऽ ? अरे वा वा वा ! बेटा, सावकार तुला केव्हा, कुठे, काय काय, म्हणाले ते सांगशील का मला ?

गजानन : तुम्हाला ते मी काय म्हणून सांगावं ?

मोरोपंत : तू सांगितलंस तर बदल्यात मीही तुझ्या ज्ञानात थोडीफार भर घालीन. अंमळ तुला धक्का बसेल. पण तुझे पाय तरी जमिनीला लागतील.

गजानन : ठीक आहे. सांगतो. दोन दिवसांपूर्वी सायंकाळी बाबा महाराजांनी मला आपल्या पलंगावर जवळ बसवून घेतलं आणि माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, "गजानना, तू आजवर माझ्या आज्ञेत वागलास; माझी खूप सेवा केलीस. तू काळजी करू नकोस. माझ्यानंतर तुला काहीही कमी पडणार नाही, अशी मी तुझी व्यवस्था केली आहे."

मोरोपंत : (हसत) वा रे बहाद्दर ! म्हातारा पक्का बेरकी आहे यात शंका नाही. आणिक ते काय म्हणाले ? सांगायचं नसलं तर नको सांगूस. काल ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी मुंबईहून येऊन सावकारांना भेटून गेले.

गजानन : होय होय. ते कळ्ळं मला. बाबा महाराज मृत्युपत्र तयार करून त्यात सगळी प्रॉपर्टी माझ्या नावे करून ठेवणार आहेत. त्यासाठीच –

मोरोपंत : सगळी प्रॉपर्टी ? तुझ्या नावे ? असं सांगितलं सावकारांनी तुला ? म्हणजे मग म्हातारा चांगलाच इरसाल आहे म्हणायचा. (हसत) गंमत आहे.

गजानन : तुम्हाला ही सगळी गंमत वाटते, मोरोपंत ?

मोरोपंत : मला जे ठाऊक आहे ते तुला समजल्यावर तुलाही त्यातली गंमत कळेल. कान घट्ट करून ऐक. श्रीमंत जहागीरदार बाबा महाराज चिंचलीकर लवकरच लग्न करताहेत.

गजानन : (चाट होत) क - काय, काय, काय ? बाबा महाराज ? लग्न करणार आहेत ? या या वयात लग्न ? कोणाशी ?

मोरोपंत : कुमारी लैलाराणी राजे हिच्याशी.

गजानन : छे छे शक्य नाही. शक्यच नाही – लैला कशी तयार होईल या लग्नाला ?

मोरोपंत : कशी तयार होईल म्हणून काय विचारतोस ? राजा, अरे ती तयार झालीय. आता बोल.

गजानन : मला नाही खरं वाटत. लैला काही इतकी मूर्ख नाहीये.

मोरोपंत : छे छे – मूर्ख तर मुळीच नाहीये. उलट फार शहाणी आहे; पक्की वस्ताद आहे. सावकार किती काळ जगणार आहेत अजून, हे तिला चांगलं ठाऊक आहे. म्हातारा खपला की सगळा पैसा-अडका, जमीन-जुमला तिलाच मिळणार. त्या दृष्टीने लग्नाचा व्यवहार हा काही तिला आतबट्ट्याचा होणार नाही.

गजानन : नाही नाही, माझा यावर मुळीच विश्वास बसत नाही. सावकार काही इतके लबाड, लंपट, उलू नाहीत आणि लैलाही इतकी बनेल मुलगी नाही.

मोरोपंत : ठीक आहे. घोडा-मैदान, जवळच आहे.

गजानन : मी मंदाशी लग्न करावं म्हणून तुम्ही मला मुद्दाम खोटं-नाटं रचून सांगताहात.

मोरोपंत : मंदाची गोष्ट तू सोडून दे. तिचा प्रश्न मिटला. तिचं लग्न हा काही फार गंभीर प्रश्न नाहीये. तिच्या भावी नवऱ्याला मी जे देणार आहे, ते कळल्यावर तिला मागणी घालणाऱ्यांची माझ्या दारात रांग लागेल रांग. पण सावकारांनी मृत्युपत्रात तुझी काय 'व्यवस्था' करून ठेवलीय तीही ऐकून ठेव.

गजानन : काय व्यवस्था केलीय माझी ?

मोरोपंत : 'व्यवस्था' कसली बोडक्याची ? पा ऽ र 'अवस्था' करून टाकलीय तुझी.

गजानन : अवस्था म्हणजे ?

मोरोपंत : म्हणजे असं की ... (वाचल्यासारखे बोलत) चिरंजीव गजानन चिंचलीकर हा आमच्या अनाथ विधवा स्वयंपाकिणीचा मुलगा, या वाड्यावरच वाढला; आमच्या आज्ञेत राहिला; आणि

आजवर आमच्या सेवेत राबला. सबब त्याला आमच्या देवघरात पूजा-अर्चेसाठी ठेवावे; राहायला औट हाऊसमध्ये दोन खोल्या द्याव्यात आणि दोन वेळचे जेवण आणि ठराविक कपडालत्ता द्यावा. रोख रक्कम देऊ नये. इतर कोठे नोकरी करण्यास हरकत घेऊ नये ...

गजानन : (ओरडून) नाही-नाही असं कदापी कदापी होणार नाही.

मोरोपंत : (हसत) तेही लवकरच कळेल. पण अगदी कडकडून विंचवासारखी डसली ना तुला ही तुझी 'व्यवस्था' ?

गजानन : ते मी आता खुद्द बाबा महाराजांनाच विचारीन.

मोरोपंत : खुशाल विचार. मी कानांवर हात ठेवून मोकळा होईन.

गजानन : सावकारांनी तुमचीही काही तरी व्यवस्था केलीच असेल की ?

मोरोपंत : मला माहीत नाही. पण सावकारांनी मला विचारलं, तेव्हा मी एवढंच सांगितलं की कारभारीपणाची मीठभाकरी मला जन्मभर मिळावी. आणि ती मलाच मिळणार.

गजानन : पण त्याऐवजी आत्ताच तुम्हाला बाबा महाराजांनी हातात नारळ देऊन निरोप दिला तर ? त्याचीही व्यवस्था करणं मला काही कठीण नाही.

मोरोपंत : त्यालाही माझी तयारी आहे. आम्ही गाशा गुंडाळून शेतावर जाऊन राहू. अरे पोटभरू आश्रिता, माझ्यासारखे कारकुनी पेशातले कारभारी, धनी आपल्याला मरणोत्तर काय देणार आहे यावर कधीच अवलंबून नसतात. ते पहिल्या दिवसापासून चर चर चरत राहतात. मिळेल ते हडप करतात. या बाटलीसारखं. त्यामुळं कोणी 'जा' म्हणालं की निघाले. आपल्याला काय ? दुसरं कुरण !

(तेवढ्यात वाड्यावरला वृद्ध गडी हैबती येतो. आणि)

हैबती : तुमची तरी कमालच आहे कारभारी काका. तुम्हाला कुठं कुठं शोधायचं ? सावकार कोकलायला लागलेत तुमच्या नावानं. महंतराज कालियास्वामी यायचेत पुण्याहून. त्यांच्यासाठी गाडी घेऊन जायचं, फराळाची काही व्यवस्था करायची –

मोरोपंत : आलो ऽ ! येतो ऽ ! निघालोच. ओरडू नकोस हैबती. गॅरेजकडं जाऊन शोफरला गाडी बाहेर काढायला सांग. (जातात)

हैबती : गजाभाऊ, नर्सबाई आत्ता आल्या. त्यांना तुमची चिठ्ठी दिली.

गजानन : अरे नर्सबाई काय म्हणतोस ? लैलाताई म्हणावं किंवा राजेबाई म्हणावं.

हैबती : सगळ्यांनाच यापुढं त्यांना "आईसाहेब" म्हणायची वेळ येणार

आहे.

गजानन : म्हणजे ?

हैबती : म्हणजे काही नाही. सावकारांना सुई टोचून तुम्हाला भेटायला येते असा त्यांचा निरोप आहे तुम्हाला.
(लगबगीनं जातो. गजाननची मुद्रा तंग होते. क्षणभरानंतर मोरोपंतांशी बोलत लैला प्रवेशते. सुंदर, तरतरीत आणि एकदम बिनधास्त. पोशाख संपूर्णपणे नर्सचा. मोरोपंतांना ती येता-येता सांगत असते – "नाही नाही, या गोळ्या परत करा. बायर कंपनीच्याच टॅबलेट्स हव्या आहेत. ही इंजेक्शनच्या ट्यूब्सची यादी. एक डझन आणून ठेवा. तुम्ही सगळी औषधं घेऊन तर या, मग केव्हा काय करायचं ते सांगेन.. हाय गजन, हाऊ आर यू ? तो 'फाइन' म्हणतो आणि भारल्यासारखा तिच्याकडं पाहतच राहतो.)

लैला : आणि एक काम करायचं. खाली बागेत माळ्याला सांगायचं की माझ्याकडं इतक्यात मदनकुमार येणार आहे.

मोरोपंत : प्रख्यात सिनेस्टार मदनकुमार ? तुमच्याकडं येणार आहे ?

लैला : हो. तो आला की त्याला इकडंच पाठवून द्यायला सांगा. नाही तर तो बुद्दू मदनकुमारला खाली हॉलमध्येच बसवून ठेवील.

मोरोपंत : तुम्ही आता इथंच थांबणार आहात ?

लैला : हो, महाराजांना झोप लागलीय. शिवाय गजाननचं काही तरी काम आहे माझ्याकडं. औषधं घेऊन लवकर या. मदनकुमारबरोबर मी मुंबईला जाणार आहे. (मोरोपंत "आता जाऊन येतो" असं म्हणत गजाननकडे साभिप्राय नजर टाकीत जातात. मग एका खुर्चीवर बसत लैला म्हणते –) हूं बोल. म्हातारेबाबा उठला की मला जावं लागेल. मला सोडतच नाही तो. ही इज जस्ट लाइक अ चाइल्ड. दोन दिवस माझ्याशी लग्न कर म्हणून मागं लागलाय. व्हेरी फनी, नाही ?

गजानन : मग तुम्ही कबूल केलंत त्यांच्याशी लग्न करायचं ?

लैला : जस्ट अ जोक. मी म्हटलं त्यांना, मला तुमच्या सगळ्या प्रॉपर्टीची मालकीण करा, मी आत्ता लग्न करते तुमच्याशी.

गजानन : म ऽ ग ? काय म्हणाले बाबा महाराज ?

लैला : (हसत) अरे चक्क हो म्हणाले ते मला. काय मागशील ते देतो, पण तू माझी हो, म्हणायला लागले. मी चांगला घोळात घेतलाय त्याला. आय ॲम रिअली एंजॉइंग द फन्.

गजानन : पण तुमचा खरोखरीच तसा काही विचार नाही ना ?

लैला : कोण मी ? त्यांच्याशी लग्न ? व्हॉट नॉन्सेन्स ! पैसा मात्र मी बक्कळ काढणार आहे त्याच्याकडून. हा मदनकुमार येतोय ना, त्याच्या नव्या पिक्चरला फायनान्स करा म्हणून सांगणार आहे मी महाराजांना. दहा लाख रुपये.

गजानन : एवढी मोठी रक्कम बाबा महाराज देतील असं वाटतं तुम्हाला ?

लैला : अरे जरा लाडात येऊन घोळात घेतलं, की हा म्हातारा कसा पाघळतोय ते दाखवतेच मी तुला. तसा म्हातारा सात्विक सरळबिरळ काही नाहीये हं ! चांगला रंगेल लंपट आहे. बरं, ते जाऊ दे. तुझ्या कामाचं प्रथम बोल. (गजानन गडबडतो. आवंढा गिळतो. ओठावरून जीभ फिरवतो. घाम पुसतो...) येऽस ?... बोलाना ऽ?.. एनीथिंग सीरियस् ?

गजानन : (घाम पुसत) सीरियस म्हणजे ऽऽ त- तसं काही फार हे ऽ नाहीये. पण म्हणजे म- म- मला असं म्हणायचं होतं- म्हणजे मला असं एक सांगायचं होतं- तसं काही ते हे नाही-

लैला : तुला काय म्हणायचंय गजन ? सावकारांनी तुला दंडबिंड केलाय का ?

गजानन : छे छे, तसं काही नाही. काही सुद्धा नाही. म्हणजे मी- मी जरा हे झालोय ना? म्हणजे एक्साइट? काही वेळाच अशा असतात नाही का ? तुम्ही रागावणार नसाल तर एक- एक-

लैला : अय्याऽ मला रागवायचं काय कारण आहे ? गरीब बिच्चारा ! हूं बोल-

गजानन : म्हणजे मी दोन ओळी लिहिल्यात, त्याच वाचून दाखवतो तुला- त- तुम्हाला. नाही नाही- तुम्हीच वाचा त्या. (टेबलावरला पॅडचा कागद फाडून घडी घालून देतो तिला.)

लैला : (घडी उलगडून) "प्रीतिपुष्पांचाच झेला मी तुझ्या हाती दिला स्वीकारणे, लाथाडणे वा ते तुझ्या स्वाधीनचे." या ओळी तू लिहिल्या आहेस ?

गजानन : म- म- मी म्हणजे- कागदावर मी लिहिल्या आहेत. पण ओळी माझ्या नाहीत.

लैला : पण त्या ओळीतल्या भावना तुझ्या आहेत. असंच ना ?

गजानन : हो हो- तसंच.

लैला : अस्सं. केव्हापासून प्रेमाची लागण झालीय तुला ?

गजानन : तसं म्हणजे म- मी तुला पहिल्यांदा पाहिलं तेव्हापासूनच आपलं

हे असं झालं.

लैला : तुझं त्या मोरोपंताच्या मुलीशी अफेअर चालू आहे म्हणून मी ऐकलं होतं.

गजानन : छे छे ! त्यात काही अर्थ नाही. मी तिला केव्हाच नाही म्हणून टाकलंय.

लैला : का ?

गजानन : म्हणजे तसं अगदी खरं खुरं गाढ प्रेम तिच्याबद्दल मला कधीच वाटलं नव्हतं. उगीच आपलं वर वर- तुझ्याबद्दल मला जे अगदी आतून, खोल खोल वाटत आलंय-

लैला : गजन, तू महामूर्ख आहेस; पागल आहेस; पाजी देखील आहेस.

गजानन : आं ऽऽ ?

लैला : आं काय ? मला तू एक सरळ साधाभोळा गरीब तरुण वाटत होतास. तू एवढा उल्लू असशील अशी कल्पना नव्हती माझी. तुम्ही पुरुष असे कसे रे एवढे लंपट असता ? जरा गोरीगोमटी बाई दिसली की लट्टू झालेच. त्यातून ती जरा मोकळेपणानं बोलली चालली की बदाबदा पाघळलेच.

गजानन : न- नाही- नाही- तसं नाही.

लैला : तसं नाही काय ? तुझी-माझी काय बरोबरी आहे ? तुझी काय लायकी आहे म्हणून तू माझ्या प्रेमात पडलास ? तू समजतोस कोण स्वतःला ?

गजानन : जरा शांत व्हा – समजून घ्या थोडं मला.

लैला : शांत व्हा ? काय समजून घ्या ? मी फर्स्टक्लास करीयरची ग्रॅज्युएट मुलगी, गव्हर्नमेंट हॉस्पिटलमधे क्लास वन् ऑफिसर, मोठे मोठे इंडस्ट्रियॅलिस्ट्स आणि एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर्स मला मागण्या घालायला येतात, आणि तू कोठला कोण फडतूस, शेणावरचा किडा ! माझ्या साड्या धुवायची तरी तुझी पात्रता आहे का ? (या वेळी मोरोपंत येतात आणि रोचकतेने ऐकत राहतात. लैलाची त्यांच्याकडे पाठ आहे. पण गजाननला ते समोरच दिसतात. त्यामुळे पाण्यात ढेकूळ टाकल्यासारखा तो विरघळतो. आणि-)

गजानन : माझं चुकलं असेल बाई, मी क्षमा मागतो, पण –

लैला : तू एका यःकश्चित स्वयंपाकिणीचा मुलगा; चार इयत्ता शिकलेला; आश्रित म्हणून या वाड्यावर शिळंपाकं अन्न चघळत वाढलास. मोलकरणींच्या पोरी धुंडाळायचं सोडून मान वर

माझ्याकडं करून पाहण्याचं तुला धाडस झालंच कसं ?

गजानन : बाई, मी चुकलो म्हटलं ना ? मला क्षमा करा.

मोरोपंत : (पुढं येत) जाऊ द्या, लैलादेवी. एकेका माणसाचा पोच सुटतो कधीकधी.

लैला : बघा ना मोरोपंत, धिस डर्टी डॉग हॅज द ओडॅसिटी टू प्रपोज मी. मोरोपंत, कसली माणसं तुम्ही या वाड्यावर पोसत बसला आहात ? हा काय पांजरपोळ आहे का इनामदारांचा वाडा ? जोड्यानं मारून हाकलून काढा या माणसाला.

हैबती : (प्रवेशत) लैलादेवी, सावकार जागे झालेत. तुमची वाट बघताहेत. ही तुम्ही सांगितलेली औषधं. नीट पाहून घ्या. गजाभाऊ, हे टिक् ट्वेंटी. ढेकणाचं औषध. कुठं कुठं मारायचं ते सांगा. सगळ्या सांदीफटीत नीट मारायला हवं.

लैला : नव्हे ऽ – त्यालाच धरून पाज, हैबती. म्हणजे सगळ्या पोरी सुरक्षित होतील.

(लैला जाते. मग मोरोपंतही कुत्सितपणे – "काय भावी सावकार, कळ्ली का तुमच्या प्रीतिपुष्पांच्या झेल्याची वाताहत ? आता हे सावकारांना कळलं की तुम्ही एकदम रस्त्यावर ! ओम् भवति भिक्षांदेही !" गजानन मटकन बसतो. मोरोपंत जातात. गजाननचे डोळे भरून येतात. रुमालाने तो डोळे पुसतो.)

हैबती : काय हे गजाभाऊ, बाईंनी तुमची पाऽर उलटी-सुलटी केली ना ?

गजानन : तू ऐकलीस वाटतं ?

हैबती : तर काय ! मीच काय, वाड्यावरली सगळी चाकर मंडळीसुद्धा इथं बाहेरच उभी होती की कान देऊन फिदफिदत.

गजानन : मंदा देखील होती ?

हैबती : हांऽऽ - त्या देखील होत्या. पण पुढं ऐकवेनासं झालं तेव्हा त्या रडत निघून गेल्या. तुमचं जरा चुकलंच, गजाभाऊ.

गजानन : (सुस्कारत) हूंऽऽ ! काहीच्या काहीच होऊन बसलं हे.

हैबती : चुकलं म्हणजे राव, फारच गाढवपणा झाला. कहां राजा भोज, कहां गंग्या तेली ? राव, तुम्ही आता या वाड्यावर राहू नका.

गजानन : वाड्यावर काय म्हणतोस ? या जगातच राहू नये असं वाटतंय मला.

हैबती : हां ऽऽऽ – तुम्हाला तसं वाटलं तर त्यात काही चूक नाही. आता इथं तुम्ही राहण्यात शोभा उरली नाही.

गजानन : (चिडून) ते तू मला शिकवायची गरज नाही, हैबती.

हैबती : राहिलं. पण हे ढेकणाचं औषध कुठं कुठं मारायचं ते तर सांगाल मला?

गजानन : ओत माझ्या नरड्यात आणि कर काळं इथून.

हैबती : तुमचं डोकंच ठिकाणावर नाहीये, गजाभाऊ. मी अंमळशानं येतो.

(टेबलावर ढेकणाच्या औषधाची बाटली ठेवून हैबती निघून जातो. क्षणात अस्फुट हुंदका फुटून रुमालात तोंड झाकून गजानन रडू लागतो. त्याच वेळी मंदा येते. त्याच्या पाठीशी उभी राहून त्याच्या केसांतून मायेनं हात फिरवीत म्हणते.)

मंदा : नको, गजानन, माझ्या राजा– नको एवढं दुःख करून घेऊस.

गजानन : (डोळे पुसत) तू कशाला आलीस इथं ? मला शिव्या घालायला ?

मंदा : मी तुला एक तरी वेडावाकडा शब्द बोलले आहे का रे ? त्या सटवीच्या जिभेला हाड नाही, तू कशासाठी गप्प बसून एवढं ऐकून घेतलंस?

गजानन : ती म्हणाली त्यातलं एक अक्षर खोटं नव्हतं. मी एक क्षुद्र आश्रित माणूस आहे. जवळ दिडकी नाही, शिक्षण नाही, नोकरी-चाकरी करायची पात्रता नाही. मी जगायच्यासुद्धा लायकीचा इसम नाही.

मंदा : तू माझं अजून ऐक. तिचा नाद सोडून दे. आपण लग्न करू आणि –

गजानन : तिचा नाद सोडण्याचा आता प्रश्नच नाही. पण आता एवढ्यावर ती बया थांबणार नाही. ती मला या वाड्यावरून हुसकावून लावील. सावकारांनी मला घालवून दिलं तर मी कुठं जाणार ? काय करणार ?

मंदा : म्हणूनच म्हणते, आपण लग्न करूया आणि आमच्या मळ्यातल्या झोपडीत जाऊन राहू या.

गजानन : तीही शक्यता आता उरली नाही. तुझे अण्णा आता या लग्नाला मुळीच मान्यता देणार नाहीत आणि दिली तरी केवळ अगतिकतेनं मलाच हे लग्न करावंसं वाटणार नाही.

मंदा : मग काय करणार आहेस तू ?

गजानन : त्याचा तुझ्याशी काय संबंध आहे ?

मंदा : मला तुझ्याबद्दल जे काही वाटतंय –

गजानन : त्याला बूच घालून टाक कायमचं. कृपा कर आणि तू जा इथून.

मंदा : मर्जी तुझी.

(मंदा निघून जाते. क्षणभर स्तब्ध शांतता. गजानन भेसूर मुद्रेने आणि भयाण दृष्टीने टिक् ट्वेंटीच्या बाटलीकडे बघत राहतो. बाटली उचलून न्याहाळतो. सगळीकडून विकट हसणे ऐकू येते. लैलानं केलेली निर्भर्त्सना आणि मोरोपंतांचे छद्मी उद्गार त्याला ऐकू येतात. ते असह्य होऊन तो टेबलावरचा ट्रँझिस्टर लावतो. तशी त्यातून "जन पळभर म्हणतिल हाय हाय । मी जाता राहिल कार्य काय ?.." या ओळी ऐकू येतात. तशी तो ट्रँझिस्टर बंद करतो. मग क्षणमात्र एकदम शांतता. निश्चयानं तो उठतो. दार बंद करून तो कडी लावतो. मग एका ग्लासमध्ये बाटलीतलं सगळं विष तो ओतून घेतो. दिव्याचा स्विच बंद करून अंधार करतो. मग शांतपणे ग्लास उचलून तो ओठाशी नेतो, तोच – प्रचंड कडकडाट होऊन वीज पडल्यासारखा आवाज होतो. वीज चमकते. फटका मारल्यासारखा त्याच्या हातातला ग्लास खाली पडून खळकन् फुटतो. खाडकन दार उघडले जाते, पटकन् दिवा लागतो आणि दारात उभे दिसतात महंतराज कालियास्वामी. रुबाबदार व्यक्तिमत्व, शुभ्र लुंगी, काळा अंगरखा, गळ्यात रुद्राक्षाची माळ, मानेपर्यंत रुळणारे शुभ्र केस, तेजस्वी मुद्रा, खांद्याला शबनम पिशवी. त्यांना पाहताच –)

गजानन : (दचकून बावचळून) कोऽण ? महंतराज कालियास्वामी ? खुद्द आपण ? हा-हा काय चमत्कार घडला ? निरभ्र आकाशात गडगडाट कसा झाला ? वीज कशी चमकली ? आतून कडी घातलेलं दार कसं उघडलं गेलं ? दिवा कसा लागला ? माझ्या हातावर फटका बसून ग्लास कसा पडला ? महंतराज, नेमक्या याच क्षणी आपण कसे इथं आलात ?

महंत : (संथपणे) बेटा, या सगळ्या घटना वेगवेगळ्या घडल्या तरी त्या गोवल्या होत्या एका दिव्य इच्छाशक्तीच्या सूत्रात. आज तुझा मृत्युयोग टळला तो आमच्या दैवी इच्छाशक्तीनं. जय देवी कपालकुंडला !

गजानन : पण तुम्ही मला कशासाठी जगवलंत ? मला जगायची तिळमात्र इच्छा उरली नाहीये. मला मरण हवंय.

महंत : कपालकुंडला देवीला अशीच माणसं हवी असतात, बेटा.

गजानन : पण जगून मी काय करू ?

महंत : जगण्यासाठी 'जगत राहाणं' एवढं एक कारण सुद्धा पुरतं.

गजानन : जगण्यासारखं एक सुद्धा सुख माझ्यापाशी राहिलेलं नाहीये. सगळीकडे दुःख, दुःख, दुःख पसरलंय, महंतराज.

महंत : सुखःदुःखाची बात सोड. पण तुझ्या मनातल्या इच्छा तर मेलेल्या नाहीत ?

गजानन : ज्या कधीच पुऱ्या होणार नाहीत अशा वांझ इच्छा कशासाठी उराशी कवटाळीत मी जगू ?

महंत : सामान्य जनांच्या इच्छा पुऱ्या होत नाहीत, कारण या इच्छांच्या पाठीशी दैवी शक्ती नसते. त्या शक्तीचं बळ मिळालं की नुसती इच्छा करून या विश्वात हवा तो चमत्कार घडवता येतो.

गजानन : तुम्ही ऽ– तुम्ही खरंच सांगताहात महंतराज ?

महंत : तुला प्रचीती घ्यायची इच्छा आहे माझ्या शक्तीची ?

गजानन : इच्छा तर आहे. पण तेवढं सामर्थ्य तुमच्यात असेल असं मला वाटत नाही.

महंत : (पिशवीत हात घालून एक शंख काढून फुंकतात आणि) जय देवी कपालकुंडला ! बोल, काय तुझी इच्छा आहे ?

गजानन : (गडबडून) इच्छा–इच्छा म्हणजे – तशी काही फार नाही. पण ही लैला मला किती वाईट-वाईट बोलली ते तुम्ही अंतर्ज्ञानानं जाणलं असेल स्वामी. खरं म्हणजे मी तिच्याच बोलण्यामुळं जीव द्यायला निघालो होतो.

महंत : इच्छा बोल. प्रस्तावना, खुलासा नको.

गजानन : महंतराज, लैलानं इथं येऊन आपली चूक कबूल करावी आणि माझी माफी मागावी, अशी माझी इच्छा आहे.

महंत : तथास्तु !

गजानन : म्हणजे महंतराज, मला असं म्हणायचं होतं की –
(महंतराज हात वर करून त्याला थांबवतात. त्याच क्षणी लैला येते आणि –)

लैला : गजन, मघाशी रागाच्या भरात मी तुला नको नको ते वाईट-साईट बोलले. माझं चुकलं. मला क्षमा कर. वाटल्यास मी तुझे पाय धरते –
(ती पाय धरायला खाली वाकते तशी थक्क झालेला गजानन तिला हाताला धरून उठवत – " हे काय ? हे काय लैला ? म्हणजे मला असं म्हणायचं नव्हतं की -" महंतराज हात वर

करून त्याला थांबवतात. आणि –)

महंत : बेटी, त्यानं तुला क्षमा केलीय. तू जाऊ शकतेस. (लैला डोळे पुसत जाते.)

गजानन : (आ वासून बघत) फँटास्टिक ! (एकदम स्वामींचे पाय धरीत) कालियास्वामी, मी तुम्हाला सर्वस्वी शरण आलो आहे.

महंत : ऊठ. तुला प्रचीती आली, इथं आपला व्यवहार संपला. (जाऊ लागतात)

गजानन : थांबा, थांबा, महंतराज. व्यवहार संपला नाही. मला अजून दोन इच्छा पुऱ्या करून घ्यायच्या आहेत.

महंत : (स्मित करीत) जय देवी कपालकुंडला ! इथून आपला पुढला व्यवहार सुरू होतो. तुझ्या दोनच का ? मी तर तुझ्या पाच इच्छांची पूर्ती करायला सिद्ध आहे. मात्र त्याच्या बदल्यात देवी कपालकुंडलाची एक इच्छा तू पुरी केली पाहिजेस.

गजानन : कोणती इच्छा, महंतराज ? काही अवघड कठीण व्रत तर तुम्ही सांगणार नाही ?

महंत : मुळीच नाही. या देवीच्या इच्छेचा तुझ्या जिवंतपणी तर संबंधच पोचत नाही. देवीची इच्छा अशी आहे की मरणोत्तर तुझ्या शवाला मंत्राग्नी मिळता कामा नये. फक्त भडाग्नी मिळेल आणि तुझ्या अस्थी देवीच्या मालकीच्या होतील.

गजानन : महंतराज, तुमची तरी कमालच आहे. मरणोत्तर माझ्या देहाचं कोण आणि काय करणार, याबद्दल मी काय सांगू वा करू शकणार ? प्रेताची कशी विल्हेवाट लावावी हे काही मेलेला माणूस सांगू शकत नाही.

महंत : रास्त आहे. पण आपल्या शवाची विल्हेवाट कशी लावावी हे जिवंतपणी माणसाला ठरवता येतं.

गजानन : कसं काय ?

महंत : एक करार करून.

गजानन : करार ? कसला करार ?

महंत : कुणा अंधाला नेत्रदान, कुठल्यातरी इस्पितळात शिकाऊ विद्यार्थ्यांना चिरफाडीसाठी देहदान – आणि त्यानंतर उरलेल्या देहाला भडाग्नी देऊन अस्थी घेऊन जाण्यासाठी मला हक्कदान. (पिशवीतून गुंडाळी काढीत) हा करार.

गजानन : (करार घेऊन, वाचून, वर पाहत) महंतराज, यात काही चालबाजी तर नाही ना ?

महंत : तुला तसं वाटत असेल तर तू अजून माघार घेऊन शकतोस. करार इकडं दे परत. मी जातो.

गजानन : (गडबडीनं) नाही नाही. मला मान्य आहे. (करारावर सही करीत) पण कालियास्वामी, मी एक खरोखरीच सामान्य, अगदी फडतूस माणूस. तुम्ही इच्छापूर्तीचा हा वर देण्यासाठी माझीच निवड कशी केलीत ?

महंत : माणसं दुःखी-कष्टी असली तरी मरायला तयार होण्याइतपत निरीच्छ होत नाहीत. उद्याच्या आशेवर ती जगत राहतात. जो माणूस मरण स्वीकारायला राजी होतो त्याची ही आशा सुद्धा संपलेली असते. असलीच माणसं आमच्या अघोर पंथाला आपली वाटतात. आम्ही महंतराज देशोदेशी असल्याच माणसांच्या शोधात असतो.

गजानन : अघोर पंथ ? अघोर पंथ हे काय गौडबंगाल आहे, महंतराज ?

महंत : ते तुला सहज समजण्यासारखं प्रकरण नाहीये.

गजानन : असं म्हणता ? असेल, असेल बुवा. (सही केलेला कागद परत देतो.)

महंत : (कागदाची गुंडाळी पिशवीत ठेवीत) बेटा, तू आता इच्छापूर्तीच्या अधिकाराला पात्र झालास. (पिशवीतून मघाचा शंख काढून देत) सगळ्याच इच्छा तू एकदम सांगाव्यास अशी आमची अपेक्षा नाहीये. इच्छा मागायचं तुझं ठरेल तेव्हा हा शंख तू फुंकायचास. मी कुठंही असलो तरी तत्काळ सेवेला हजर होईन. मात्र एक विसरू नकोस. फक्त पाचच इच्छा. सहावी नाही.

गजानन : मी तर दोनच इच्छा मागणार आहे. बाकीच्यांची मला गरजच पडणार नाही.

महंत : ते काळानंच ठरेल. पण उरलेल्या इच्छाही सुरक्षित आहेत.

गजानन : मग, मागू मी माझ्या दोन इच्छा ?

महंत : जरा थांब. (शंख घेऊन फुंकत) जय देवी कपालकुंडला ! सांग तुझी इच्छा.

गजानन : जहागीरदार बाबा महाराज चिंचलीकर यांची सगळी स्थावर जंगम मालमत्ता, सगळा पैसा-अडका, सोनं-नाणं, जडजवाहीर, मला राजरोस मिळावं.

महंत : (डोळे मिटून काही पुटपुटत) तथास्तु. दुसरी इच्छा. (पुन्हा शंख फुंकतो) जय देवी कपालकुंडला ! बोल.

गजानन : या लैलाचं माझ्याशी लग्न व्हावं. तेही – तिनं मला त्यासाठी विनंती करून लग्न व्हावं.

महंत : (डोळे मिटून पुटपुटत) तथास्तु !
(तशी गडगडाट होतो. दिवे लुकलुकू लागतात. वीज चमकते. आणि क्षणार्धात मोरोपंत धावत येतात आणि म्हणतात –)

मोरोपंत : महंतराज, चला चला लवकर. गजाभाऊ धावा – बाबा महाराज गेले.
(गजानन धावत आणि महंतराज 'जय देवी कपालकुंडला' म्हणत संथ पावलांनी जाऊ लागतात. सुयोग्य संगीत उसळते. त्याच्या पार्श्वभागी माणूस मेल्यानंतरचा घरादाराचा आक्रोश अस्पष्टपणे ऐकू येतो. आणि त्याच वेळी – अंधार)

(प्रवेश पहिला संपला)

# अंक पहिला ❖ प्रवेश दुसरा

(मागील प्रवेशातील घडामोडीनंतर सुमारे पंधरा दिवस उलटले आहेत. तोच दिवाणखाना. वेळ सकाळी दहा वाजण्याची. दिवाणखान्यात फर्निचरची थोडी वेगळी मांडामांड चालली आहे. मोरोपंत, गजानन, हैबती आणि मंदा जातीनं राबताहेत. टेबल-खुर्ची मध्यभागी मांडून ठेवली आहे. त्यावर चादर, फ्लॉवर पॉट. एका बाजूला तीन आणि दुसऱ्या बाजूला तीन अशा खुर्च्या मांडल्या जात आहेत. एका स्टुलावर कै. बाबा महाराजांची तसबीर ठेवली असून तिला हार घातला जात आहे. अशात –)

गजानन : (घड्याळात पाहत) मोरोपंत, दहा वाजून गेले. ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नींना घेऊन येण्यासाठी तुम्ही स्टेशनवर गाडी घेऊन जाताहात ना ?

मोरोपंत : हा काय निघालोच. महंतराज येणार आहेत का ?

गजानन : काही सांगता येत नाही. पण बहुतेक नाही. त्यांचं काय काम आहे आज इथं ? लैला मात्र येईल. मी तिचीच वाट पाहतो आहे.

मंदा : तिचं तरी काय काम आहे इथं ?

गजानन : ती सुद्धा एक बेनिफिशियरी आहे – म्हणजे असावी.

मंदा : बेनिफिशियरी म्हणजे ?

मोरोपंत : म्हणजे मृत्युपत्रात जिच्यासाठी मयतानं काही देऊन ठेवलेलं आहे अशी व्यक्ती. तू सुद्धा एक बेनिफिशियरी आहेस.

मंदा : पण बाबा महाराजांनी कोणाला काय काय दिलंय ते कुठं जाहीर झालंय ?

गजानन : त्यासाठी तर हा मृत्युपत्र-वाचनाचा कार्यक्रम आहे. सध्या हे मृत्युपत्र फक्त ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नींनाच ठाऊक आहे. मोरोपंत –

मोरोपंत : निघालो. (जाऊ लागतात)

गजानन : माळ्याला सांगून ठेवा, लैलाबरोबर तो मदनकुमार आला तर त्याला खालीच बसवून ठेवा. इथं त्याचं काहीही काम नाही. (मोरोपंत जातात)

मंदा : चहा-कॉफी तयार ठेवायला हवी ?

गजानन : ही मंडळी काय फराळासाठी जमणार आहेत इथं ? मृत्युपत्र-वाचन हा एक कायदेशीर उपचार आहे. म्हातारबाबांनी

इस्टेटीची खिरापत करून टाकली नसली म्हणजे मिळवली.

मंदा : म्हातारबाबा काय म्हणतोस रे ? मेलेल्या माणसाबद्दल तरी आदरानं बोलावं.

गजानन : तो आदर तू दाखव वाटल्यास. नाही तरी तुला जे काय मिळणार असेल ते फुकाफुकीच मिळायचंय. मला त्याच्याबद्दल मुळीच आदर उरला नाहीये. या वयात हा रंगेल थेरडा लैलाशी लग्न करायला निघाला होता.

मंदा : असं लैला म्हणत होती म्हणूनच ना ? मला नाही खरं वाटत.

गजानन : खरं काय न् खोटं काय, त्याचा निकाल लागेलच आता.

मंदा : बाबा महाराज अगदी एकाएकी आकस्मिक गेले, नाही ?

गजानन : हूं. हैबती, किती वेळ त्या फोटोला हार घालीत बसला आहेस ?

हैबती : (हात झटकीत) झालंच. एखादी उदबत्ती लावून ठेवू का इथं ?

गजानन : समई आणि निरांजन सुद्धा लाव. देवाची आरतीच करायची की नाही आज !

मंदा : काही तरीच काय बोलतोस रे गजानन ? हैबती, लाव उदबत्ती आणून. (हैबती जातो.) लैला त्या दिवशी तुला किती वाईट-साईट बोलली रे ?

गजानन : पण नंतर तिनं आपण होऊन येऊन माझी क्षमा मागितली. अगदी माझ्या पायावर डोकं ठेवून.

मंदा : आणि तरी सुद्धा तुला तिच्याशी लग्न करायचंय ?

गजानन : तिनं माझ्याजवळ येऊन माझ्याशी लग्न करायची इच्छा व्यक्त केली तरच मी तिच्याशी लग्न करीन.

मंदा : ती त्या मदनकुमारबरोबर फिरत असते –

गजानन : लग्न झालं की हे सारं चटदिशी बंद होईल.

मंदा : तिच्या पायी तू कायमचा दुःखी होशील.

गजानन : मुळीच नाही. लैलासारखी बायको आणि सावकारांची संपत्ती, या दोन गोष्टी मला मिळाल्या की मी सुखाच्या शिखरावर ! (तोच लैला येते. या वेळचा पोशाख अगदी वेगळा : स्टक् इन शर्ट, जीन्स, पायात फॅशनेबल सँडल्स, डोळ्यांवर मोठ्ठा गॉगल, हातात पर्स. आल्या आल्या ती नखरेलपणे पर्स फिरवीत म्हणते –)

लैला : हाय गजन, हाय मंदा. माय गुडनेस ! अजून इथं कोणीच आलं नाही ?

गजानन : या या, अशा इथं बसा. इतक्यात मोरोपंत ॲडव्होकेट

जमदग्नींना घेऊन येतीलच. बाकी आपण सगळे आहोतच इथं.

लैला : गजन, हे वुइल बाबा महाराजांनी केव्हा करून ठेवलं होतं ?

गजानन : महिना-दोन-महिने तरी झाले असतील. अर्थात मला नक्की तारीख माहीत नाही.

लैला : व्हॉट अ पिटी ! सावकार आणखी थोडे दिवस जगायला हवे होते. पूर्वीचं मृत्युपत्र रद्द करून मी त्यांना नवं वुइल तयार करायला लावलं असतं – माझ्या इच्छेप्रमाणं. ती संधी गेली. पण गजन, हे वुइल तू कधी पाहिलं आहेस ?

गजानन : छे. नाही. मी कसा पाहणार ? कदाचित मोरोपंतांनी पाहिलं असेल.

मंदा : नाही. अण्णांनी देखील पाहिलं नाही. फक्त त्याबद्दल अण्णांचं बाबा महाराजांशी काही तरी बोलणं झालं होतं.

गजानन : तसं बोलणं तर त्यांचं सगळ्यांशीच झालं होतं. प्रत्यक्षात त्यांनी काय लिहून ठेवलंय, ते एक सावकार आणि दुसरे ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नीच जाणे. कदाचित महंतराज कालियास्वामींनाही माहीत असेल.

(तेवढ्यात छोटी ब्रीफकेस घेऊन ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी येतात. येतात ते चाचपडत. त्यांना अंमळ कमी दिसत असावे. पांढरी पँट, काळा कोट, गळ्याला बो. ओठावर चार्ली चॅपलिन टाइप मिशा. छोटी दाढी, हनुवटी, पुरतीच. डोळ्यांना जाड भिंगाचा चष्मा. डोक्यावर सन् हॅट. चेहऱ्यामोहऱ्यात महंतराजांशी साम्य. त्यांच्याबरोबरच मोरोपंत आणि हैबती येतात. येता येता गुरुनाथ म्हणतात – “नो नो, मला जेवायला वगैरे वेळ नाही. सॉलिसिटर कांगा माझी लंचसाठी पुण्याला वाट पाहणार आहेत. तेवढ्यासाठी मी गाडी घेऊन आलोय. इथलं काम उरकून मी लागलीच निघणार.” आत येत – )

गुरुनाथ : वेल, गुड डे, लेडीज अँड जन्टलमेन. बसा बसा. (हैबती सोडून सगळे बसतात. हैबतीकडं पाहून) तू का उभा आहेस ? तुझं नाव काय ?

हैबती : हैबती गांगुर्डे.

गुरुनाथ : म्हणजे तू बेनिफिशियरी आहेस तर ! मग उभा का राहतोस ? बैस बैस. आज तू वाड्यावरला गडी नाहीस. (हैबती खुर्ची

ओढून बाजूला बसतो.) वेल, फ्रेंड्स, मी मृत्युपत्र काही सगळं वाचणार नाही. कारण एक तर तेवढा वेळ नाही मला. शिवाय माझ्या डोळ्याच्या रेटिन्याचा प्रॉब्लेम झालाय, त्यामुळं वाचताना मला खूपच अडचणी येतात. तुम्ही सुद्धा सगळे मला वेडेवाकडे नागमोडी आकारात दिसताय. तेव्हा मी फक्त गोषवारा तेवढा मुळात पाहून सांगेन. नंतर मी तुमच्यापैकी प्रत्येकाला झेरॉक्स कॉपी देणारच आहे. ती तुम्ही तुमच्या सवडीनं वाचा. (हे सांगत टेबलासमोर चाचपडत येतात आणि खुर्चीवर बसत, ब्रीफकेस उघडून त्यातून एक फाइल काढतात. ती उघडून डोळ्यांजवळ नेऊन उलटी-सुलटी करून पुन्हा पुन्हा न्याहाळीत) मी ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी. बाबा महाराजांनी माझ्याकडूनच हे वुइल करून घेतलंय दोन महिन्यांपूर्वी. मलाच त्यांनी एकमेव एक्झिक्यूटर नेमलंय. बाबा महाराजांना जवळचा नातेवाईक कोणी नाही. एक पुतण्या, बाळकृष्ण चिंचलीकर नावाचा होता म्हणे. पण त्याचा ठावठिकाणा कोणालाही माहीत नाही. पेपरमधल्या जाहिरातीलाही त्यानं प्रतिसाद दिलेला नाही. तेव्हा तो हयात नसावा अथवा बेपत्ता असावा, असं मानून बाबा महाराजांनी हे वुइल तयार केलंय. मृत्युपत्राच्या पहिल्या भागात बाबा महाराजांनी आपल्या सगळ्या स्थावर आणि जंगम मालमत्तेचं तपशीलवार वर्णन दिलंय. ते काही मी वाचीत नाही. तुम्हाला तुमची प्रत मिळेल तेव्हा तुम्ही वाचा. पण सारांशानं सांगायचं तर सुमारे साठ लाखांची शेतजमीन आणि बागायती मळे, चाळीस लक्ष रुपयांचे शेअर्स, सावकारीत गुंतलेले अदमासे सत्तावीस लाख रुपये, निरनिराळ्या बँकांतल्या आणि कंपन्यांतल्या डिपॉझिट्समध्ये ठेवलेले छत्तीस लाख रुपये, सेव्हिंग्ज अकाउंट्मध्ये ठेवलेले बेचाळीस लाख रुपये, तिजोरीत ठेवलेलं रोख चाळीस लाख रुपये आणि तिजोरीतल्या डब्यात ठेवलेले अदमासे पंधरा लाख रुपयांच हिरे-मोती-सोनं – अर्थात दागिन्यांच्या रूपातलं जडजवाहीर, अशी ही एकूण बाबा महाराजांच्या मालकीची चार कोटींची संपत्ती आहे. पैकी तिची वाटणी करताना बाबा महाराज म्हणतात– (पान उघडून चाळीत आणि डोळ्यांजवळ नेऊन वाचत) तर हां – आता असं –कारभारी गजाननाने एकनिष्ठपणे आणि इमाने-इतबारे

माझ्या इस्टेटीचा कारभार पाहिला आणि निरलसपणे चाकरी केली म्हणून मी त्याला वाड्यावरल्या देवपूजेचं काम देत आहे. त्याबद्दल त्याला, त्याच्या कुटुंबीयांना आणि त्याच्या पै-पाहुण्यांना दोन वेळचं मोफत जेवण देण्यात यावं वा हवा असेल तेवढा सर्व प्रकारचा शिधा त्याला विनामूल्य द्यावा. तसंच त्याला हवं असेल तेवढं कापड-चोपडही मोफत द्यावं. त्याला राहायला वाड्यामागची पर्णकुटी द्यावी. रोख पैसे मात्र त्याला देऊ नयेत. इतरत्र कोठे नोकरी करायला वा धंदा करायला हरकतही घेऊ नये. पण –

गजानन : (रागानं ताडकन उठत) सावकारांनी देऊ केलेली ही भिक्षा मला मुळीच नकोय. त्यापेक्षा मी उपाशी मरेन, नाही तर –

गुरुनाथ : जस्ट वेट ! नको असेल तर नका घेऊ, पण वुइलचा गोषवारा तरी ऐकून घ्याल ? मला रेटिन्याचा प्रॉब्लेम आहे म्हणून –

मोरोपंत : बसा हो गजाभाऊ खाली. (गजानन कपाळाला हात लावून हताशपणे बसतो.) वकीलसाहेब, वाचा तुम्ही पुढं.

गुरुनाथ : (फाइलमध्ये पाहत) येस – हां, तर आता असं. मोरोपंत, (थबकून वर पाहतात आणि मोरोपंत कोण असे विचारतात. तशी मोरोपंत उत्साहभरानं खुर्ची पुढं ओढत हुरळून म्हणतात –)

मोरोपंत : मी मी मोरोपंत. वाचा वाचा पुढं !

गुरुनाथ : तुम्ही मोरोपंत. ठीक आहे. पण तुम्ही असे नागमोडी का बसलात ? तुम्ही नृत्य वगैरे करता का ?

मोरोपंत : (हबकून) म-म-मी ? आणि नृत्य ? छे छे ! मी नृत्य बघतो. तेही तमाशातलं. भलतंच काय ?

गुरुनाथ : हूंऽऽ पुन्हा रेटिन्याचा प्रॉब्लेम. मला तुम्ही असे (नृत्याविर्भाव करीत) बसलेले दिसताय. फरगेट इट ! (फाइलमध्ये पाहत) "मोरोपंत आमच्या अनाथ विधवा स्वयंपाकिणीचा मुलगा म्हणून या वाड्यावर वाढला असला तरी –" असं सावकार म्हणतात –

मोरोपंत : (आ वासून पाहत) क – काय, काय, काय ?

गुरुनाथ : तरी भीमाबाईला तो खुद्द आमच्याचपासून पण अनौरस पुत्र झालेला आहे –

मोरोपंत : (ताडकन् उठत) काय बडबडताहात काय वकीलसाहेब ? मी अनौरस मुलगा ? सावकारांचा ? राजश्री, सावकार माझ्यापेक्षा

फक्त पाच-दहा वर्षांनी मोठे असतील. काय हो, सावकारांना त्यांच्या बालपणीच, माझ्यासारख्या पुत्राची प्राप्ती झाली होती का ?

लैला : मला वाटतं, मिस्टर जमदग्नी, तुमचा काही तरी घोटाळा झालाय.

गजानन : भीमाबाई हे माझ्या आईचं नाव आहे.

गुरुनाथ : (चष्मा काढीत) कारभारी कोण ? गजानन की ऽऽ – ?

मोरोपंत : कारभारी मी – मोरोपंत.

गुरुनाथ : जस्ट अ मिनिट. मग भीमाबाई कुठं आहेत ? थांबा, थांबा. (ब्रीफकेसमधून जाड भिंग काढतो आणि भिंगानं फाइल वाचून पाहत–) थोडा घोटाळा झालाय. डोळ्याच्या रेटिना प्रॉब्लेममुळं झालंय काय, खालच्या ओळीतले शब्द वरच्या ओळीत जातात आणि वरच्या ओळीतले शब्द खाली येतात. तर असं पाहा ऽऽ (भिंगातून बघत) येस येस... तर मघाशी ते देवपूजेचं, दोन वेळच्या जेवणाचं आणि पर्णकुटीत राहायला देण्याचं जे मी सांगितलं, ते मोरोपंत, तुमच्याबद्दल होतं.

मोरोपंत : आं ऽ ? असं कसं होईल ?

गुरुनाथ : ते वुइल वाचल्यावर तुम्हाला कळेल. तुमच्या भीमाबाई तुम्हाला सांगतील.

गजानन : अहो, भीमाबाई माझी आई. तरी मला वाटलंच ! बाबामहाराज माझी भिकाऱ्यासारखी संभावना करणार नाहीत.

मोरोपंत : नाही, पण वकीलसाहेब, अजून मला वाटतं की –

गुरुनाथ : सायलेन्स ! नो ॲर्ग्युमेंट्स. मला वेळ नाही. शिवाय मला रेटिन्याचा प्रॉब्लेम आहे. तेव्हा –

गजानन : खाली बसून घ्या मोरोपंत. (हात ओढून बसवीत) दोन वेळचं जेवण, पर्णकुटी रोख पैसे नाहीत ऽऽऽ !

मोरोपंत : कळलं कळलं, अक्करमाशा –

गजानन : शट अप् ! आता एक वेळचं जेवण मिळणार नाही. करा ओम् भवति भिक्षां देही.

लैला : तुम्ही दोघेही जरा गप्प बसाल काय ? मिस्टर जमदग्नी, यू प्रोसीड फर्दर.

गुरुनाथ : तर "गजानन हा आमच्यापासून (वर बघत) म्हणजे सावकारांपासून – माझ्यापासून नाही ! भीमाबाईला झालेला अनौरस पुत्र असल्यामुळं आम्ही त्याला सगळ्या स्थावर

जंगम मालमत्तेची, काही बाबी वगळता, संपूर्ण मालकी देत आहोत." बाय द वे, भीमाबाई कुठं आहेत ? त्या दिसायला अंमळ फाकडू होत्या का ?

गजानन : (हर्षभरानं उठत) जय देवी कपालकुंडला ! महंतराज, आपण धन्य आहात !

लैला : 'काही बाबी' कोणत्या वकीलसाहेब ?

गुरुनाथ : (भिंग बाजूला ठेवीत तिच्याकडे पाहत) तुम्ही तर भीमाबाई नव्हे ? (तिची मुद्रा न्याहाळीत) सॉरी ! हां तर – "गजाननाची मुलगी मंदा –"

लैला : अय्या ऽऽ (हसत) गजाननाची मुलगी ?

मोरोपंत : वकीलसाहेब, मंदा माझी मुलगी आहे. ही ही – इथं बसलेली ! भिंगातून पाहा.

गुरुनाथ : (भिंगातून पाहत) हूंऽऽ ! कळलंय ! याचा अर्थ खालचे शब्द वर सरकले. (भिंग उचलून पाहत) येस, येस. मोरोपंतांची मुलगी मंदा. करेक्ट. तर "या वाड्यावर आमच्या मुलीसारखी ती वाढली, म्हणून आम्ही तिला तिजोरीत ठेवीत आहोत– नाही नाही– तिजोरीत ठेवलेले डब्यातले सगळे दागदागिने बक्षीस देत आहोत."

मोरोपंत : चला, तेवढं तरी पदरात पडलं.

लैला : बाय जोव्ह ! पंधरा लाखांचे दागदागिने या मंदाला ? गजन –

गजानन : मिळू देत. तू काळजी करू नकोस, लैलाराणी. माझ्याजवळ रग्गड पैसा आता येणार आहे. सगळे दागिने मी नवे कोरे करकरीत घडवीन. तर पुढं चला जमदग्नी.

गुरुनाथ : (पुन्हा भिंग दूर ठेवून वाचत) तर असं – गजाननाच्या मनात हैबतीशी लग्न करायचं आहे, असं आम्हाला –

गजानन : आं ऽ ? काय काय काऽय ?

मोरोपंत : गजाननाचं हैबतीशी लग्न ? काय हैबतराव ? (सगळे हसतात तशी)

हैबती : (शहारे देत) हॅं हॅंऽऽऽ... भलतंच काय साहेब ?

गुरुनाथ : पुन्हा खालचं नाव वर सरकलं वाटतं ?

लैला : पण वकीलसाहेब, ते भिंग बाजूला ठेवून तुम्ही वाचता कशाला ?

गुरुनाथ : (भिंगानं तिच्याकडं पाहत) सॉरी सॉरी. भीमाबाई, हैबतीशी नाही. लैला राजे हिच्याशी.

लैला : (ओरडून) मी भीमाबाई नाही – मी लैला !

गुरुनाथ : येस, येस. तर गजाननाच्या मनात लैला राजे हिच्याशी लग्न करायचं आहे, असं आम्हाला कळलं. हे लग्न व्हावं असं आम्हालाही वाटतं.

मोरोपंत : (उठून ताडकन) हे – हे वुइल तयार केलं, त्या वेळी बरं का. आत्ता नाही. दोन महिन्यांपूर्वी. अलिकडं –

गजानन : (सदरा ओढून बसवीत) तुम्ही चूप बसा हो मोरोपंत. पुढं वाचा जमदग्नी. भिंग घेऊन वाचा.

गुरुनाथ : "या लग्नासाठी लैला राजे तयार झाली तर तिला तिजोरीतले रोख पंचवीस लाख रुपये द्यावेत."

मोरोपंत : (ओरडत) रोख पंचवीस लाख ? काय डोकं फिरलं होतं की काय म्हाताऱ्याचं ? का तुमच्या भिंगानं घोटाळा केला, वकीलसाहेब ?

मंदा : ज्याच्या त्याच्या नशिबात लिहिलेलं असतं, ते ज्याला त्याला मिळतं. तुम्ही कशाला तडफडाट करता अण्णा ?

गजानन : थोडा शहाणपणा शिका लेकीकडून, मोरोपंत.

लैला : पुढं वाचा वकीलसाहेब. भिंग घेऊन– हंऽ !

गुरुनाथ : (वाचत) "मात्र ही रक्कम लैला राजे हिला लग्न झाल्यावरच देण्यात यावी. मोरोपंतांशी लग्न करण्याची तिची तयारी नसेल तर तिला आमच्या सेवाशुश्रूषेबद्दल –"
(सगळे ओरडतात) मोरोपंत नव्हे– गजानन – गजानन !

गुरुनाथ : तेच ते. तिला पंचवीस रुपये देऊन परत पाठवावी– एस्. टी. नं.

गजानन : (हर्षभरानं) जय देवी कपालकुंडला ! जय महंतराज कालिया स्वामी !

गुरुनाथ : तसंच हैबतीला दहा हजार रुपये मी बक्षीस देत आहे. त्याचा नव्या धन्याने अखेरपर्यंत संभाळ करावा. शेवटचं कलम असं: आमच्या वाड्याच्या तळघरात कपाटामध्ये शेकडो उंची मद्याच्या बाटल्यांचा आम्ही साठा केला होता. तो आधीच फस्त केला नसला तर तो मोरोपंतांना देऊन टाकावा.

मोरोपंत : पण फुकट ना ? मग ठीक आहे. तेवढे चार दिवस तरी सुखात जातील.

गुरुनाथ : (फाइल मिटत) या मृत्युपत्राला कोणाची काही हरकत आहे ?

गजानन : छे छे, कोणाचीही हरकत नाही, वकीलसाहेब. सगळ्यांना

मान्य आहे.

मोरोपंत : आणि हरकत घेऊन तरी काय फायदा ? वुइल बदलता येणार आहे थोडंच ?

गुरुनाथ : (ब्रीफ केसमधून मृत्युपत्राच्या प्रती काढीत) हैबती, या प्रती प्रत्येकाला एकेक प्रमाणं दे. (हैबती एकेक प्रत प्रत्येकाला देतो. दरम्यान गजानन, जाण्यासाठी उठत असलेल्या गुरुनाथ जमदग्नींजवळ जातो आणि विचारतो – )

गजानन : माफ करा मिस्टर जमदग्नी, पण महंतराज कालिया स्वामी तुमचे कोणी भाऊबंद लागतात का ?

गुरुनाथ : (चष्मा चढवीत) नाही.

गजानन : नाही ? आश्चर्य आहे. त्याच्यात आणि तुमच्यात एवढं साम्य आहे म्हणता –

गुरुनाथ : शक्य आहे. माणसासारखी माणसं जगात पुष्कळ दिसतात. तर मंडळी, उद्या याच वेळेला मी पुन्हा वाड्यावर येईन, वुइलमधल्या तरतुदी अमलात आणण्यासाठी. इन्सिडेंटली, मिस् लैला राजे, तुमचा विचार काय ठरतो ते मला तुम्ही केव्हा कळवाल ? पुढल्या आठवड्यापर्यंत ?

लैला : (उठत) पुढल्या आठवड्यापर्यंत कशाला ? मी आत्ताच सांगते. (गजाननाच्या जवळ जात) डार्लिंग गजन, मला तुझ्याशी लग्न करायचंय. पत्नी म्हणून तू माझा स्वीकार करशील ना ?

गजानन : 'करशील ना –' म्हणून काय विचारतेस लाडके ? (तिला जवळ घेत) हा पाहा मी तुझा स्वीकार केलासुद्धा. लग्न कधी करायचं ते तू ठरव.

लैला : मिस्टर जमदग्नी, आम्ही उद्याच लग्न करणार आहोत.

जमदग्नी : दॅट्स व्हेरी नाइस ऑफ यू. कॉंग्रॅच्युलेशन्स. (तिच्याशी हस्तांदोलन करतो)

लैला : हां ऽ, मात्र रोख पंचवीस लाख रुपये, लग्न होताक्षणीच मला मिळायला हवेत.

जमदग्नी : नक्कीच मिळतील. देणारे हे आता 'नवे मालकच' आहेत इथं की !

गजानन : डार्लिंग, पंचवीस लाखच काय, तू मागशील तेवढी रक्कम मी देईन तुला. आता तू आणि मी काय वेगळे आहोत ? जे माझं तेच तुझं.

लैला : (त्याला बिलगत) गजन डार्लिंग, यू आर अमेझिंग ...

फँटास्टिक, माय प्रिन्स !

**मोरोपंत** : जमदग्नीसाहेब, आमच्या मुलीला दागिन्यांचा डबा उद्याच मिळायला हवा. आणि बाटल्यांचा साठा देखील. माणसाचा काही भरवसा सांगता येतो का ?

**गजानन** : माझा भरवसा धरा मोरोपंत. वाटल्यास आत्ता घेऊन चला तुमचा डबा आणि बाटल्यांचा साठा.

**गुरुनाथ** : नो नो, ते सगळं उद्या ! एक्झिक्यूटर म्हणून तो माझा खास अधिकार आहे. ओ. के. ? देन लेडीज अँड जंटलमेन, बाऽया! (थबकून) बाय द वे, भीमाबाई कुठं आहेत ? त्यांना मला एकदा भेटायला सांगा.

(गुरुनाथ जातात. पाठोपाठ मोरोपंत, मंदा आणि हैबतीही जातात. – मग)

**लैला** : (गजाननच्या गळ्यात हात घालीत) डार्लिंग, कसं वाटतं तुला ? एकदम हॅपीऽ?

**गजानन** : हॅपी म्हणून विचारतेस काय ? आय ॲम ऑन द टॉप ऑफ द वर्ल्ड ! माझ्या सुखाचा हा परमोच्च क्षण आहे. जय देवी कपालकुंडला ! जय महंतराज ! तुम्ही धन्य आहात. लैला, एका क्षणात माझं भाग्य केवढं उजळलं म्हणतेस ! मला तू मिळालीस, अपरंपार धनदौलत मिळाली. आता मिळण्यासारखं या जगात काय उरलंय ? माझी दृष्टी बदलली. माझी सृष्टी पालटली. कोण म्हणतो, 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वता-एवढे ?' मी तर म्हणतो, 'दुःख जवासारिखे थोकडे । सुख हिमालयाएवढे !' 'जगी सर्वसुखी असा कोण आहे ?' मी मी, आणि मी ! (संगीत उसळते. लैलाचे दोन्ही हात हातात घेऊन गजानन नाचायला लागतो. आणि त्याच वेळी – पडदा)

॥ अंक पहिला संपला ॥

# अंक दुसरा ❖ प्रवेश पहिला

(मागील अंकातील घडामोडीनंतर सुमारे वीस दिवसांचा काळ उलटला आहे. तोच दिवाणखाना. पण आता कात टाकल्यासारखा दिसतो आहे. रंगरंगोटीत आणि सजावटीत नव्या धन्याची श्रीमंती आणि नव्या घरधनिणीची छानछोकीची आवड यांची जागजागी छाप पडलेली दिसते आहे. नवा सोफा सेट, नवे ड्रेसिंग टेबल, नवा वॉर्ड रोब आणि टीपॉयवर ठेवलेला नवा टेलिफोन. भिंतीवर लावलेल्या बाईसाहेबांच्या नव्या फिल्मी तसबिरी. वेळ सायंकाळची.

रंगमंच प्रकाशाने उजळतो तेव्हा गजानन कमालीच्या विमनस्क मनाने आणि प्रक्षोभित मुद्रेने दोन्ही हातांनी डोकं गच्च दाबून कोचावर बसलेला दिसतो. अंगात रेशमी गुरु शर्ट आणि झोकदार टेरीवुलची पँट, बोटात हिऱ्याची आंगठी, गळ्यात सोन्याचा गोफ - असा थाट. क्षणभराने फोनची घंटा वाजू लागते. गजानन डोकं सोडून त्या फोनकडं तिरस्कारानं बघू लागतो आणि दुर्लक्ष करतो. फोनची घंटा वाजतच राहते. तशी आतून लैलाराणी ओरडते - अर्थात फारच लाघवी स्वरात - "ग ऽ जन्, डार्लिंग, तेवढा फोन घेतोस का रे ? आणि हे बघ, फोन मदनकुमारचा असला तर त्याला सांग की–" तेवढ्यात - )

**गजानन** : (बसल्या जागेवरून ओरडून) लैला, गरज असली तर तू बाहेर ये आणि तुझा फोन तूच घे. मी पी. ए. नाहीये तुझा - तुझ्या यारांचे फोन घ्यायला आणि द्यायला. मी तुझा नवरा आहे आणि मी या घराचा मालक आहे मालक. (फोन वाजतच आहे. क्षणार्धात लैला झगमगीत गाऊन अंगात घालून त्याचा पट्टा बांधीत - "कळ्ळंऽ ! कळ्ळंऽ ! नाऊ शट अप् ! मी सुद्धा मालकीण आहे इथली. तुझी बटीक नाहीये !" असं कडाडत प्रवेशते आणि लगबगीनं फोनकड जाते )

**लैला** : मी कपडे बदलत होते म्हणून तुला रिक्वेस्ट केली; तर एवढ्या मिजाशीत मग्रुरीनं जबाब ? स्वतःला कोण सम्राट समजतोस की काय तू ? (रिसीव्हर उचलीत कमालीच्या मधाळ स्वरात) हाय ऽऽ ! मी लैलाराणी ! .. हॅलो ऽ मदन, तूच ना ? कसं ओळखलं म्हणून काय विचारतोस डार्लिंग ?... यू कॅन डिसीव्ह द होल वर्ल्ड, बट नॉट मी. (हसते) हां

बोल... हूं ऽऽ ? (नखरे करीत) यू नॉटी बॉय... तेही मी सांगायला हवं ?... (रिसीव्हरमध्ये प्रयेसीनं प्रियकराशी बोलावं आणि बोलताना लाजणं मुरकणं... 'अय्या ऽऽ.. ए जा ग डे..." इत्यादी उद्‌गारांनी आणि हावभावांनी, तसेच रिसीव्हर हातात घेऊन आजूबाजूला फिरावं... मध्येच गिरकी घ्यावी तसा सगळा नखरा करीत लैला गजाननच्या मत्सरात भरपूर तेल ओतते. मग - ) बरं, तू आता मला सोडणार आहेस का ?... इश्य ऽऽ ! किती पांचट आहेस रे ? 'सोडणार' आहेस का म्हणजे फोनपासून म्हणत होते मी... हूं... हूं... डोन्ट यू वरी... मी माझे सगळे पैसे तर घेतलेच आहेत, पण आणखी पाच लाख देखील घेतलेत. पुरतील ना ?

गजानन : (ताडकन वर पाहत) आणखी पाच लाख ? मला न विचारता ?

लैला : (रिसीव्हरवर हात ठेवीत) शट अप्. मी मालकीण आहे इथली. माझा सुद्धा हक्क आहे त्या पैशावर.

गजानन : अग पण -

लैला : आय से इनफ ! (पुन्हा रिसीव्हरमध्ये) हे बघ मी तयार आहे. तुझी तयारी झाली की ये. मी गाडी घेऊन शोफरला पाठवते. फ्लाइट साडेनऊची आहे ना ?... ओके... बाय, डार्लिंग... (फोन ठेवून लगबगीनं ड्रेसिंग टेबलापाशी येऊन ओठाला लिपस्टिक लावीत रंगेल गीत गुणगुणते.)

गजानन : साडेनऊची फ्लाइट म्हणजे ? पुन्हा आज कुठं जाणार आहेस तू ?

लैला : नक्कीच. डार्लिंग आमच्या पहिल्या पिक्चरचा मुहूर्त आहे उद्या पेहेलगामला.

गजानन : कालच तू उटीहून आलीस.

लैला : हो, आले. मग ?

गजानन : आपलं लग्न झालंय पंधरा दिवसांपूर्वी, हे लक्षात आहे का तुझ्या ?

लैला : अगदी चांगलं लक्षात आहे. त्याशिवाय पंचवीस लाख माझ्या हातात कसे पडले असते ?

गजानन : लग्नानंतर हनीमूनला माथेरान नाही तर महाबळेश्वरला जायचे बेत मी -

लैला : (फुदकन् हसत) माथेरान नाही तर महाबळेश्वर ? भेळपुरी खायला की पावभाजी चरायला ? स्वित्झर्लंड तरी म्हणायचंस ?

बाकी जन्म गेला तुझा शागिर्दी करण्यात. तू असं कर, एकटाच लोणावळ्याला जाऊन ये तूर्त. (हसते. तेवढ्यात फोन खणखणतो, तशी धावून रिसीव्हर घेत) हॅलो ऽऽ छाब्रासाहेब ?.. मी लैलाराणी... मदनला घेऊन मी निघतेच आहे... तुम्ही वेळेवर पोचा हं... आणखी काय काढलंत ? ओ आय सी... सर्टनली आय विल बी वुइथ यू... आपण असं करूया का गडे ? नाही म्हणजे फ्लाइटवरच त्या डीटेल्स ठरवू. ओके ? बा ऽ य ! (रिसीव्हर ठेवून जाण्यासाठी वळते तोच)

गजानन : हा कोण छाब्रासाहेब उपटला आणखी ?

लैला : मला शेकडो मित्र आहेत, डार्लिंग.

गजानन : पण नवरा तरी मी एकच आहे ना ?

लैला : ऑफ कोर्स – अगदी एकुलता एक.

गजानन : पण कुंकवापुरता !

लैला : डोन्ट बी सिली डार्लिंग. मी मुळी कुंकूच लावीत नाही. (हसते)

गजानन : तू बैस इथं. मला आज तुझ्याशी बोलायचंय काही महत्वाचं.

लैला : त्यासाठी तुला थांबायला हवं, डार्लिंग. मी काश्मीरहून पंधरा दिवसांनी परतले तर –

गजानन : तू पंधरा दिवस काश्मीरला हॉटेलात राहणार आहेस ? त्या –त्या हरामखोर मदनकुमारबरोबर ?

लैला : डोन्ट गेट जेलस, डार्लिंग. मदनकुमार चारच दिवस राहणार आहे तिथं. त्यानंतर अकबारखान, सवाई महमूद नाही तर झिल्लू दारूवाला मला कंपनी देतील.

गजानन : (कपाळावर हात मारीत) कर्म माझं.

लैला : तू झिल्लू दारूवालाला पाहिला आहेस, डार्लिंग ? सच अ फँटास्टिक 'ही मॅन' आहे म्हणतोस ! पोरी मरतात बघ त्याच्यावर.

गजानन : तू नाही ना मेलीस – अजून तरी ?

लैला : नॉन्सेन्स. मला किनई डार्लिंग, त्याच्याबद्दल फार 'वात्सल्य' वाटतं.

गजानन : आधी बैस इथं. (तेवढ्यात फोन खणखणतो)

लैला : थांब आधी. फोन घेते, आणि मग –

गजानन : नथिंग डुइंग. बैस इथं. फोन मीही घेणार नाही आणि तुलाही

घेऊ देणार नाही. आपल्याला पुष्कळ गोष्टींबद्दल –

लैला : (फोनपाशी थबकत) तुझ्यात 'नवरा' संचारला वाटतं ?

गजानन : तसं म्हण हवं तर. पण माझा हुकूम आहे तुला. तू आधी बैस इथं.

लैला : (कमरेवर हात ठेवीत ठसक्यात) ओ हो ऽऽऽ ! तर मग डार्लिंग, तू एक मोठ्ठी चूक केली आहेस. माझ्याऐवजी तू त्या 'इश्यबाई' मंदाशीच लग्न करायला हवं होतंस. तिनं तुझे सगळे हुकूम बिनतक्रार पाळले असते.

(हे ऐकतच मोरोपंत येतात. वेश शुभ्र धोतर, शुभ्र झब्बा, डोक्यावर पांढरी टोपी. लगबगीनं फोनपाशी येत मोरोपंत म्हणतात – )

मोरोपंत : त्याचीही खात्री देऊ नका, बाईसाहेब. आमचं कन्यारत्न म्हणजे जहाल मिरची आहे मिरची. आपण बसावं बाईसाहेब, मी घेतो फोन.

गजानन : (दरडावून) फोनला हात लावाल तर खबरदार, मोरोपंत.

मोरोपंत : (रिसीव्हरवर हात ठेवीत) काय कराल हो नवे ?

गजानन : तुम्ही आमचं अन्न खाऊन वर आमच्याशीच बेइमानी करता ?

मोरोपंत : (गातो) आम्ही काय कुणाचे खातो रे । श्रीराम आम्हाला देतो ! तात्पर्य नवे, आपण-तुपण कै. बाबा महाराजांचं अन्न खातो. पण नवे, हल्ली जेवणात साजुक तूप अंमळ हात राखून वाढलं जातंय. चहाच्या चमच्यानं तूप घ्यायची आम्हाला सवय नाही. ओगराळ्यानं तूप वाढायचा वाढप्यांना हुकूम व्हावा.

गजानन : (संतापून) हे-हे तुम्ही आम्हाला फर्मावताहात ?

मोरोपंत : वुइलमधल्या तरतुदीप्रमाणं पूजा डिपार्टमेंट स्वतंत्र आहे. नैवेद्याच्या पानावर भरपूर तूप पडलंच पाहिजे. (रिसीव्हर उचलत) हलाव हलाव... (बघत) शिंचा उलटा धरला वाटतं ? (सुलटा करीत हसून) सवय नाही ना ?

गजानन : सवय आहे वाडगाभर तुपाची. तीही फुकटची.

मोरोपंत : हो हो, फुकटची.. आपल्यासारखीच.

गजानन : (ओरडून) काय-काय म्हणालात ?

मोरोपंत : काही नाही. बसा खाली आणि बोला बाईसाहेबांशी. (रिसीव्हर कानाला लावीत) हलाव... हलाव... शिंचा मध्येच कट झाला वाटतं ? (परत ठेवतो)

लैला : पण तुम्ही जाऊ नका मोरोपंत. इतक्यात पुन्हा येईल.

२३२९३

मोरोपंत : जशी आज्ञा बाईसाहेब. मी फोनचं तर बघीनच, पण आपल्या प्रेमळ संवादात, आपल्याला जरूर पडेल तेव्हा मी नेमकी सल्लामसलत सुद्धा देईन. तुम्ही नुसता इशारा करायचा, ताबडतोब नव्या रावसाहेबांच्या खट्याळ सवालांना माझा इरसाल जबाब गेलाच म्हणून समजा.

गजानन : अहो सवाल-जबाब-वाले, आधी तुम्हालाच दोन इरसाल सवाल मला विचारायचेत.

मोरोपंत : विचारा की. जबाब तयार.

गजानन : तुम्ही म्हणे आपल्या घरी खानावळ चालवली आहे एक.

मोरोपंत : खानावळ नव्हे. पै-पाहुण्यांसाठी 'महापूजा प्रसाद केंद्र' चालवलंय मी.

गजानन : किती पै-पाहुणे जेवतात रोज सकाळी आणि संध्याकाळी ?

मोरोपंत : वेळेला शंभर पान तर नक्कीच होत असेल.

गजानन : हे पै-पाहुणे आपल्या जेवणाचं बिल देत नाहीत ?

मोरोपंत : देतात की. पण बिल नव्हे. ती दक्षणा असते.

गजानन : पण लागणारं धान्यधुन्य, वाणसामान तुम्ही वाड्यावरूनच नेता. तेही फुकट. आम्ही काय म्हणून बिलं भरायची तुमची ?

मोरोपंत : ते सगळं रीतसर आहे, नवे.

गजानन : रीतसर म्हणजे ?

मोरोपंत : रावसाहेबांनीच वुइलमध्ये लिहून ठेवलयं की. पान नंबर दोन, परिच्छेद तिसरा - तो, त्याचे कुटुंबीय आणि पै-पाहुणे यांना दोन वेळचं मोफत जेवण वा त्यांना लागेल तो शिधा, मी त्याला देत आहे. मी आणि मंदा इथे जेवतो आणि पै-पाहुण्यांसाठी शिधा घरी घेऊन जातो.

गजानन : वा रे वा ! मोठा अजब कारभार आहे तुमचा. तुम्ही गावात एक कापडाचं दुकानही उघडलंय असं कानांवर आलंय माझ्या.

मोरोपंत : होय, नवे. कै. बाबा महाराजांच्या कृपेनं दुकान फारच छान चाललंय.

गजानन : अहो, पण कापड गिरण्यांची आणि घाऊक व्यापाऱ्यांची बिलं वाड्यावर आमच्याकडं काय म्हणून ?

मोरोपंत : तेही अगदी पद्धतशीरच आहे, नवे. म्हणजे वुइलमध्ये बाबा महाराजांनी लिहून ठेवलंय की - पान नंबर दोन, परिच्छेद चौथा, त्याला म्हणजे मला, हवं असेल तेवढं कापड-चोपड मोफत द्यावं.

गजानन : अरे वा रे वा ! 'हवं असेल तेवढं कापड-चोपड' म्हणजे तुम्हाला व्यक्तिशः लागणारा कपडा-लत्ता. तुमच्या दुकानात विकायला ठेवलेलं कापड नव्हे.

मोरोपंत : ते सगळं कायद्याला धरूनच केलंय, नवे. वाटल्यास आपण ॲडव्होकेट जमदग्नींचा सल्ला घ्यावा. त्यांना विचारूनच मी पावलं टाकली आहेत.

गजानन : मोरोपंत, तुम्ही एवढे हरामखोर आणि डँबीस असाल याची कल्पना नव्हती मला. तुम्ही चक्क मला लुबाडता आहात.

मोरोपंत : चुकलात नवे. आपण सगळेच लुबाडतो आहोत (वर बोट दाखवून) त्यांना.

लैला : गजन डार्लिंग, काय मूर्खपणा चालवला आहेस तू ? मोरोपंतांनी चार पैसे कमावले तर तुझं काय जातं ? तुला तर काही कमी पडत नाहीये ना ?

मोरोपंत : पाहा ना ! (फुदकन हसत) समजच तेवढी. आश्रितांची उडी–पडून पडून किती लांब पडणार ?

गजानन : खबरदार मोरोपंत, तुम्ही आमचे नोकर आहात.

मोरोपंत : देवपूजेपुरता. बाकी माझी नोकरी बाईसाहेबांच्यासाठी.

गजानन : लैला काय तुम्हाला पगार देतेय ?

लैला : ऑफ कोर्स, डार्लिंग. हजार रुपये पगार देणार आहे मी मोरोपंतांना.

गजानन : पण कशासाठी ? हा मोरोपंत काय काम करणार आहे तुझं ?

मोरोपंत : मी बाईसाहेबांचा पत्रव्यवहार पाहतो. त्यांच्या विशेष प्रीतीतल्या मित्रांना खास निरोप पोचवतो. रात्री-अपरात्री कोणाच्या बंगल्यावर वा हॉटेलमध्ये त्यांना मी घेऊन जातो वा परत आणतो. चिठ्ठ्याचपाट्या आणि फोन मीच संभाळतो. शिवाय समद्य आणि सामिष मेजवान्याही मीच पार पाडतो.

गजानन : अवघ्या पंधरा दिवसांत या कामात तुम्ही बरेच तरबेज झालात की पंत !

मोरोपंत : पंधरा दिवसांत नव्हे. बाबा महाराजांच्या हयातीत सुद्धा मी हीच कामं करीत होतो.

गजानन : कोणकोणत्या बायकांना सावकारांच्या रंगमहालात नेऊन घातलंत तुम्ही ?

मोरोपंत : तुमच्या दृष्टीनं महत्वाची बाई म्हणजे खुद्द आपल्या मातोश्री.

गजानन : तोंड संभाळून बोला मोरोपंत. (खवळून उठून अंगावर धावतो)

मोरोपंत : मी बोलतोय ते सगळं वुइलमध्ये लिहून ठेवलंय बाबा महाराजांनी.

लैला : आय से, स्टॉप धिस नॉन्सेन्स ! गजन डार्लिंग, तुला माझ्याशी काय बोलायचंय ते लवकर बोलून टाक. मला ताबडतोब कपडे करून एअरपोर्टकडं निघायची घाई आहे. पंत, आजचं काही टपाल ?

(मोरोपंत पिशवीतून पत्रांचा एक मोठा गठ्ठा काढून लैलाच्या हाती देतात. तशी –)

गजानन : (डोळे विस्फारीत) रोज इतकी पत्रं येतात तुला ?

मोरोपंत : ही फक्त दुपारच्या डाकेची. सकाळच्या डाकेत याच्या दुप्पट असतात.

(लैला झरझर डाक न्याहळत चाळते).

गजानन : (धुमसत) हे सगळं एकदम थांबलं पाहिजे.

मोरोपंत : सरकारनं पोस्ट खातं बंद केलं तरच ते शक्य आहे. बाकी मेघाला दूत करून पाठवणारे आषुक-माषुक तेवढ्यानं गप्प बसणार आहेत थोडेच ?

लैला : मोरोपंत, ही पत्रं माझ्या व्हॅनिटी बॅगमध्ये ठेवा. (मोरोपंत पत्रं घेऊन जातात.) हूं. बोल, तुला काय म्हणायचंय ते थोडक्यात सांग, डार्लिंग.

गजानन : लैला, हा तुझा सगळा थिल्लरपणा मला मुळीच पसंत नाही.

लैला : ते मला ठाऊक आहे. पुढं ?

गजानन : माझ्यासारख्या एका खानदानी इनामदाराशी तुझं लग्न झालेलं आहे.

लैला : तेही मला ठाऊक आहे.

गजानन : लग्न झालेल्या बायकोचं वर्तन निरपवाद शुद्ध असलं पाहिजे.

लैला : हा एक मतभेदाचा मुद्दा आहे.

गजानन : तुझं माझ्यावर प्रेम आहे की नाही ?

लैला : नाही.

गजानन : मग तू माझ्याशी लग्न केलंस कशासाठी ?

लैला : वुइल वाच पुन्हा एकदा, म्हणजे तुला कारण कळेल.

गजानन : केवळ पैशासाठी ?

लैला : येस, एक्झॅक्टली, डार्लिंग.

गजानन : मला ते चालणार नाही. माझं तुझ्यावर प्रेम आहे. मी तुझ्याशी लग्न केलंय. लग्नातल्या निष्ठा तुला पाळायलाच लागतील.

गजानन : अरे वा रे वा ! 'हवं असेल तेवढं कापड-चोपड' म्हणजे तुम्हाला व्यक्तिशः लागणारा कपडा-लत्ता. तुमच्या दुकानात विकायला ठेवलेलं कापड नव्हे.

मोरोपंत : ते सगळं कायद्याला धरूनच केलंय, नवे. वाटल्यास आपण ॲडव्होकेट जमदग्नींचा सल्ला घ्यावा. त्यांना विचारूनच मी पावलं टाकली आहेत.

गजानन : मोरोपंत, तुम्ही एवढे हरामखोर आणि डँबीस असाल याची कल्पना नव्हती मला. तुम्ही चक्क मला लुबाडता आहात.

मोरोपंत : चुकलात नवे. आपण सगळेच लुबाडतो आहोत (वर बोट दाखवून) त्यांना.

लैला : गजन डार्लिंग, काय मूर्खपणा चालवला आहेस तू ? मोरोपंतांनी चार पैसे कमावले तर तुझं काय जातं ? तुला तर काही कमी पडत नाहीये ना ?

मोरोपंत : पाहा ना ! (फुदकन हसत) समजच तेवढी. आश्रितांची उडी-पडून पडून किती लांब पडणार ?

गजानन : खबरदार मोरोपंत, तुम्ही आमचे नोकर आहात.

मोरोपंत : देवपूजेपुरता. बाकी माझी नोकरी बाईसाहेबांच्यासाठी.

गजानन : लैला काय तुम्हाला पगार देतेय ?

लैला : ऑफ कोर्स, डार्लिंग. हजार रुपये पगार देणार आहे मी मोरोपंतांना.

गजानन : पण कशासाठी ? हा मोरोपंत काय काम करणार आहे तुझं ?

मोरोपंत : मी बाईसाहेबांचा पत्रव्यवहार पाहतो. त्यांच्या विशेष प्रीतीतल्या मित्रांना खास निरोप पोचवतो. रात्री-अपरात्री कोणाच्या बंगल्यावर वा हॉटेलमध्ये त्यांना मी घेऊन जातो वा परत आणतो. चिठ्ठ्याचपाट्या आणि फोन मीच संभाळतो. शिवाय समद्य आणि सामिष मेजवान्याही मीच पार पाडतो.

गजानन : अवघ्या पंधरा दिवसांत या कामात तुम्ही बरेच तरबेज झालात की पंत !

मोरोपंत : पंधरा दिवसांत नव्हे. बाबा महाराजांच्या हयातीत सुद्धा मी हीच कामं करीत होतो.

गजानन : कोणकोणत्या बायकांना सावकारांच्या रंगमहालात नेऊन घातलंत तुम्ही ?

मोरोपंत : तुमच्या दृष्टीनं महत्वाची बाई म्हणजे खुद्द आपल्या मातोश्री.

गजानन : तोंड संभाळून बोला मोरोपंत. (खवळून उठून अंगावर धावतो)

मोरोपंत : मी बोलतोय ते सगळं वुइलमध्ये लिहून ठेवलंय बाबा महाराजांनी.

लैला : आय से, स्टॉप धिस नॉन्सेन्स ! गजन डार्लिंग, तुला माझ्याशी काय बोलायचंय ते लवकर बोलून टाक. मला ताबडतोब कपडे करून एअरपोर्टकडं निघायची घाई आहे. पंत, आजचं काही टपाल ?

(मोरोपंत पिशवीतून पत्रांचा एक मोठा गठ्ठा काढून लैलाच्या हाती देतात. तशी –)

गजानन : (डोळे विस्फारीत) रोज इतकी पत्रं येतात तुला ?

मोरोपंत : ही फक्त दुपारच्या डाकेची. सकाळच्या डाकेत याच्या दुप्पट असतात.

(लैला झरझर डाक न्याहळत चाळते).

गजानन : (धुमसत) हे सगळं एकदम थांबलं पाहिजे.

मोरोपंत : सरकारनं पोस्ट खातं बंद केलं तरच ते शक्य आहे. बाकी मेघाला दूत करून पाठवणारे आषुक-माषुक तेवढ्यानं गप्प बसणार आहेत थोडेच ?

लैला : मोरोपंत, ही पत्रं माझ्या व्हॅनिटी बॅगमध्ये ठेवा. (मोरोपंत पत्रं घेऊन जातात.) हूं. बोल, तुला काय म्हणायचंय ते थोडक्यात सांग, डार्लिंग.

गजानन : लैला, हा तुझा सगळा थिल्लरपणा मला मुळीच पसंत नाही.

लैला : ते मला ठाऊक आहे. पुढं ?

गजानन : माझ्यासारख्या एका खानदानी इनामदाराशी तुझं लग्न झालेलं आहे.

लैला : तेही मला ठाऊक आहे.

गजानन : लग्न झालेल्या बायकोचं वर्तन निरपवाद शुद्ध असलं पाहिजे.

लैला : हा एक मतभेदाचा मुद्दा आहे.

गजानन : तुझं माझ्यावर प्रेम आहे की नाही ?

लैला : नाही.

गजानन : मग तू माझ्याशी लग्न केलंस कशासाठी ?

लैला : वुइल वाच पुन्हा एकदा, म्हणजे तुला कारण कळेल.

गजानन : केवळ पैशासाठी ?

लैला : येस, एक्झॅक्टली, डार्लिंग.

गजानन. : मला ते चालणार नाही. माझं तुझ्यावर प्रेम आहे. मी तुझ्याशी लग्न केलंय. लग्नातल्या निष्ठा तुला पाळायलाच लागतील.

नाही तर –

लैला : नाही तर काय ? घटस्फोट ? माझी हरकत नाही काही. पण मला मिळालेले पैसे मात्र परत मिळणार नाहीत तुला. उलट मी नुकसानभरपाई मागेन.

गजानन : पैशाचा प्रश्न नाहीये, लैला. तू घटस्फोट घ्यावास असंही मी म्हणणार नाही. पण आपल्याला सुखाचा संसार करायचा आहे ना लाडके ?

लैला : असं म्हणतोस का ? मग विचार करायला हवा. हे बघ, आत्ता मला वेळ नाही. पण विचार करायला काश्मीरमध्ये मी थोडी फुरसद काढीन. ओ. के. ? (उठते)

गजानन : (उठत अजीजीनं) पण डार्लिंग; मी तुझ्याबरोबर आलो तर ? (तेवढ्यात फोन खणखणतो. परत येऊन दाराशी उभे असलेले मोरोपंत लगबगीनं पुढं होत तो घेतात. दरम्यान –)

लैला : (आरशात बघून लिपस्टिक लावीत) नको. तिथं तुला बघू नये ते बघावं लागेल. तू पुन्हा भडकशील.

गजानन : तुला काही नीती-अनीतीची थोडी तरी चाड आहे की नाही ?

लैला : बहुतेक नसावी. मी मुक्तिवादी आहे.

मोरोपंत : (फोनमध्ये बोलता बोलता – अर्थात हलक्या आवाजात, मध्येच रिसीव्हरवर हात ठेवीत) बाईसाहेब, गुलाबदास, जव्हेरींचा फोन आहे. एक उत्कृष्ट हिऱ्याचा हार त्यांच्याकडं एक कस्टमर घेऊन आलंय. स्वस्तात आहे. घेणार का म्हणून विचारताहेत.

लैला : काय किंमत सांगताहेत ?

मोरोपंत : वीस लाख.

गजानन : (डोळे विस्फारीत) वीस ला ss ख ? बाप रे !

लैला : अवघे वीस लाख ? फँटास्टिक ! त्यांना मला एअरपोर्टवर भेटायला सांग. (लडिवाळपणे गजाननच्या गळ्यात हात घालीत) गजन डार्लिंग, तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ? मग माझी एवढी हौस तू नाही का पुरवणार ?

गजानन : (गळ्यातले हात काढीत) छे छे, भलतंच काय ? लैला, गेल्या पंधरा दिवसांत तू माझी तिजोरी साफ केली आहेस.

लैला : (रागानं) साफ केली म्हणजे ? त्यातले पंचवीस लाख तर माझेच होते लग्नाचे. वर पंधरा लाख तू दिलेस. तेही माझ्या हक्काचे – तुझी बायको म्हणून.

गजानन : ठीक आहे, पण आता हे वीस लाख कोठून आणू ?

लैला : का ? बँकेत पैसा कुजत पडलाय तो काढ की बाहेर.

गजानन : तुझे सगळे प्रवासाचे, शूटिंगचे बेत रद्द करून आणि तुझ्या सगळ्या यारांशी संबंध तोडून, तू इथं राहून, माझ्या आज्ञेत वागणार असशील तर मी वीस लाखांचा हार विकत घ्यायचा विचार करीन.

लैला : अरे जा जा. माझं पिक्चर लागलं की तुला मी तुझ्या जहागिरीसकट विकत घेईन, आणि माझे बूट पुसायला ठेवीन. मोरोपंत, गुलाबदासना मी हार विकत घेतला म्हणून सांगा. व्यवहार एअरपोर्टवरच पुरा होईल. तोही रोखीनं. ओ. के. ? (ऐटीत जाऊ लागते तशी –)

मोरोपंत : जशी आज्ञा, बाईसाहेब. (रिसीव्हरमध्ये हलक्या आवाजात बोलू लागतात)

गजानन : (चिडून उठत) पैसे कोठून देणार आहेस ? सांग, पैसे कोठून आणशील ?

लैला : (दाराशी थबकून) बाळा, त्याची तुला रे आता का काळजी ? काहीच नाही जमलं तर दुसऱ्या एखाद्या जहागीरदार सावकाराकडं मी 'आश्रित' म्हणून राहीन. ओ. के. ?
(जाऊ लागते, तेवढ्यात प्रवेशतो मदनकुमार. "हाय डार्लिंग लैलाराणी–" म्हणत तो पुढं होतो. "हाय मदन... केव्हाची वाट बघतेय मी तुझी डार्लिंग" म्हणत लैला पुढं धावून त्याचे हात हातात घेते. गजाननचा जळफळाट होतो. मदनकुमार तद्दन 'फिल्मी' अवतारात. तरी पण गजाननला त्याच्यात महंतराजांचे साम्य दिसू लागते.)

मदनकुमार : डार्लिंग, शूटिंग संपवून पॅक अप होता होता मुळी इतका वेळ गेला. तुझी सगळी तयारी झाली ना ? सगळे पैसे घेतलेस बरोबर ?

लैला : मी एकदम तयार आहे. (हाक मारीत) हैबतीऽऽ–

मदनकुमार : हैबती कशाला ? तुझं बॅगेज आणायचंय एवढंच ना ? मग तुझ्या या मजनूला सांग की ! हाच तुझा नवरा मजनू नव्हे का ?

गजानन : तुम्ही मला काय हिचा गडी समजलात ?

मदनकुमार : लैला आता फिल्मस्टार होणार म्हणजे तिचा नवरा म्हणून तुम्हाला शोफर कम् सर्वंट कम् सेक्रेटरी.. थोडक्यात पडतील ती कामं केलीच पाहिजेत मिस्टर...

गजानन : मी मी असलं काही एक करणार नाही. मी मालक आहे या घराचा.

मदनकुमार : मग तुम्हाला दुसरी मालकीण बघावी लागेल. लैलाराणी आज ना उद्या सुपरस्टार झाल्यावर तिच-तुमच मुळीच पटायचं नाही.

गजानन : कसं पटणार नाही ते बघतोच मी. तुम्ही मध्ये कडमडू नका म्हणजे झालं.

मदनकुमार : लैलाराणी, या विदूषकाशी तू कशासाठी लग्न केलं आहेस ग ?

लैला : कशासाठी ते सगळी दुनिया जाणते. अंमळ साधाभोळा असला तरी माझा नवरा उदार आहे. त्यानं माझ्या पंचवीस लाखांत आपले पंधरा लाख घालून, आपल्या नव्या फायनान्सला मदत केली ठाऊक आहे ?

मदनकुमार : तरी पण तू त्याला पुरता धुतला नाहीस अजून ?

लैला : हळू हळू सगळं होऊन जाईल. मला आधी सांग, तुझ्या 'कृष्ण-लीला' पिक्चरचे रिपोर्टस् काय आहेत ?

मदनकुमार : एकदम फँटास्टिक. अगदी अमेझिंग. तरी पिक्चर फक्त तामीळनाडूतच रिलीज झालंय. उत्तरेत जर या चित्रानं हॅवॉक केला तर मला मग स्काय इज द लिमिट. (तेवढ्यात हैबती येतो.)

लैला : हैबती, माझ्या बेडरूममधलं सगळं सामान गाडीमध्ये ठेव. त्यात एक पैशाची छोटी बॅग देखील आहे बरं का ? ती तेवढी मला आणून दे. (हैबती जातो. मग -) मदन, कृष्णाच्या भूमिकेत तू अगदी चिकणा दिसला असशील नाही रे ?

मदनकुमार : अग, रोज कोवळ्या पोरींच्याकडून मला शेकडो लव्हलेटर्स यायला लागलीत. पण ते काहीच नाही. तुझ्यामाझ्या हीरो-हिरॉईनच्या पिक्चरमध्ये आपल्या दोघांनाही इतके कडाड रोल्स आहेत म्हणतेस – ऑडियन्स अगदी तुटून पडेल बघ. एक सीन तर एकदम इतका हॉट आहे की –

लैला : तो धबधब्याखालचा पोहण्याचा ना ? मी नाही हं तसला काही चावटपणा करू देणार.

मदनकुमार : अग फिल्मस्टार व्हायचं म्हणजे हे सगळं करावंच लागतं.

लैला : फिल्मस्टार व्हायचं म्हणजे काय अगदी कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळायचं ?

मदनकुमार : छे छेऽऽ डोक्याला नाही गुंडाळायचं. दूर फेकून द्यायचं.

लैला : (लाजून हसत) अय्याऽऽऽ किती फाजील आहेस रे तू ?

गजानन : (कानात बोटं घालून वाईट मुद्रेनं) नाही- नाही. ऐकवत नाही मला हे.

लैला : जे ऐकवत नाही ते ऐकायचंच कशाला ? देवघरात जाऊन बस तू. (तेवढ्यात हैबती एक सूटकेस आणि पैशाची बॅग घेऊन येतो.) मदन डार्लिंग हे सामान घेऊन तू खाली गाडीत जाऊन बस. या बॅगेत पैसे आहेत, नीट संभाळून ठेव.

मदनकुमार : (पैशाच्या बॅगेवर झडप घालीत) डोन्ट यू वरी डार्लिंग, हे पैसे माझ्या अगदी सेफ कस्टडीत आहेत. अच्छाऽ- बाऽय, डार्लिंग मजनू... गजनू... (हैबती सामान घेऊन आणि मदनकुमार बॅग घेऊन जातात. मग)

लैला : मोरोपंत, माझ्या टपालाबद्दलच्या इन्स्ट्रक्शन्स मिळाल्या तुम्हाला ? (मोरोपंत "होय" म्हणतात) तर मग गजन डार्लिंग -

गजानन : (विव्हल होत) लैला- लैला- तू खरंच निघालीस ? परत केव्हा येणार ते तरी सांग.

लैला : हाऊ आर यू कन्सर्न्ड ? मी हवी तेव्हा परत येईन. नाही तर येणारही नाही.

गजानन : नाही नाही, डार्लिंग. माझं काही चुकलं असलं तर मला क्षमा कर. पण माझ्यावर अशी रागावून मला कायमची सोडून जाऊ नकोस. प्लीऽऽऽज-

लैला : मोरोपंत, तुम्ही पुढं व्हॉ. मी आलेच. (मोरोपंत गालात साभिप्राय हसत जातात.) माझ्या पायावर नाक घासून क्षमा मागायची तयारी आहे तुझी ?

गजानन : (वाकून तिचे पाय धरू पाहत) हे बघ आत्ता घासतो -

लैला : (त्याला उठवत) नो नो डार्लिंग, माझी तशी अपेक्षा नव्हती.

गजानन : मी तुझ्यासाठी वाट्टेल ते करायला तयार आहे, पण तू माझी हो. सगळी सगळी माझी एकट्याची हो. (तो तिला बिलगू पाहतो तशी -)

लैला : (त्याला दूर करीत) हां हां- नॉट नाऊ- नॉट नाऊ. त्या हिऱ्याच्या हाराचं काय ते सांग आधी.

गजानन : एवढंच ना ? गुलाबदासजींकडून हार घेऊन जा. मी उद्या पैसे देऊन टाकीन त्यांचे.

लैला : (त्याला मिठी मारीत) दॅट्स लाइक माय स्वीट प्रिन्स ! (तेवढ्यात मोरोपंत येतात, तशी दोघांना दूर होणं भागच पडतं.

लैला हसते. गजानन चरफडतो.) हे आलेच. मोरोपंत, गुलाबदासजींकडून स्टेशनवर हार घ्यायचा. पैसे गजन उद्या देईल म्हणून सांगायचं. राइट डार्लिंग ? हे बघ, पेहेलगामचं शूटिंग आटोपलं की आम्ही कुलू मनालीला जाणार आहोत. तिकडून येता येता वृंदावनला मी थांबणार आहे. यू नो डार्लिंग, मी कृष्णभक्त आहे. मी प्रख्यात राजयोगी मुकुंदमाधवाचार्यांचा गुरूपदेश पण घेणार आहे. तिथूनच मी तुला पत्र टाकीन. ओ.के. ?

गजानन : तू म्हणशील तसं. पण मी तुला खालपर्यंत पोचवायला येत नाही.

लैला : का ? गाडीत माझ्याबरोबर मदनकुमार आहे म्हणून ? (त्याचा गालगुच्चा घेत) कित्ती रे तू जेलस आहेस, गजू ? बाऽय ! (हसत जाते)

(मोरोपंत येतात आणि सदऱ्याच्या खिशातली चपटी छोटी बाटली आतल्या आत उघडतात आणि खिशासकट सदरा वर करून बाटलीचं तोंड आपल्या तोंडाला लावून घुटका घेतात. "आहाऽऽ" करीत सदरा खाली करून खिशातल्या बाटलीला खिशातच बूच लावतात. मग भसाड्या स्वरात गातात –) "...अंतरीच्या गूढ गर्भी एकदा जे दाटले । ते प्रेम आता आटले...." मग –)

मोरोपंत : आयला ! 'अंतरीच्या गूढ गर्भी,' म्हणजे नेमकं कुठशीक हो, नवे ?

गजानन : (चिडून) शोधा म्हणजे सापडेल.

मोरोपंत : (हाताच्या बोटानं आपली छाती चाचपीत) तसा शोध तर चाललाच आहे. (छातीवर एका जागी बोट ठेवीत) हे हे इथं... 'अंतरीच्या' – त्याच्या खाली गूढ गर्भी... गूढ गर्भी... (म्हणत हात पोटावर सरकवीत, बेंबीत बोट ठेवीत) हां ऽऽ राजे, सापडली. 'गूढ गर्भी' म्हणजे बेंबीत. बरोबर ना नवे ? या बेंबीतच शिंची ती आटण्या-बिटण्याची भानगड होत असावी. म्हणजे भोवती जठराग्नी सतत भडकलेला असतो ना ?

गजानन : मोरोपंत, हात जोडू का तुमच्यापुढं ? तुम्हाला काही हृदय आहे का हो ?

मोरोपंत : बहुतेक असावं. एकदा ई. सी. जी. काढून तपासायला हवं. पण नवे, माझ्या हृदयापेक्षा चिंता करायला हवी ती तुम्ही तुमच्या हृदयाची. अंमळ फारच निगरगट्ट झालेलं दिसतंय.

(तेवढ्यात हातात ट्रे घेऊन मंदा येते.) हे पाहा आलं, आणखी एक निगरगट्ट कोडगं हृदय. हे काय घेऊन आलीस तू मंदे ?

मंदा : श्रीखंड-पुरी.

मोरोपंत : कोणासाठी ? या नव्या रावसाहेबांसाठी ?

मंदा : नाही तर कोणासाठी ? आज गजाननचा वाढदिवस नाही का ? आज तरी त्याचं तोंड गोड करायला नको ?

मोरोपंत : यांचं तोंड गोड करायला मोठी नामी वेळ शोधून काढलीस बघ तू. मालकीणबाईंनी आत्ताच त्यांचं तोंड भलतंच गोड करून ठेवलंय.

मंदा : का ? काय झालं ? पुन्हा भांडण ?

मोरोपंत : मालकीणबाई आपल्या मित्राबरोबर तिजोरीतला सगळा पैका घेऊन आज काश्मीरला प्रवासाला गेल्या.

मंदा : गजाननला इथंच ठेवून ?

मोरोपंत : तर काय ? त्यांना इथंच शेतीवाडीची कामं करायची आहेत की !

मंदा : इश्यऽऽ – हा काय मेला उठवळपणा ! तू का नाही रोखलंस तिला गजानन ?

मोरोपंत : त्यांचं ते बघून घेतील. तुला कोणी त्यांच्यात नाक खुपसायला सांगितलंय ?

मंदा : हूं ! खरंच आहे ते. माझाच मेलीचा जीव राहत नाही म्हणून मी पुन्हा पुन्हा येते. गजानन, सकाळपासून तू उपाशी आहेस. दोन घास तरी खाऊन घे.

गजानन : (धुमसत) नकोय मला तुझ्या हातची श्रीखंडपुरी.

मंदा : अरे, तू उपाशी राहिलास म्हणून तिचं काही बिघडणार आहे का ?

मोरोपंत : मला कळत नाही मंदे, तुझं तरी काय बिघडणाराय हे राजश्री उपाशी राहिले म्हणून ?

मंदा : माझं काय बिघडायचं ते एकदा बिघडून गेलंय अण्णा.

मोरोपंत : अग, पण रावसाहेबांचं लग्न होऊन चुकलंय.

मंदा : लग्न होऊन सुद्धा गजानन एक दिवस तरी सुखी झालाय का ? सावकारांची एवढी प्रचंड संपत्ती मिळून सुद्धा एक तरी सुखाचा घास त्याच्या पोटात उतरलाय का ? मला त्याचं दुःख, त्याची तडफड बघवत नाही.

मोरोपंत : घ्या ऽ ऐका ऽ ! यालाच म्हणतात आयजीचा जीव बायजीत, पण बायजीचा जीव खेटरात ! ती त्याला ठेचतेय, तो तुला तुडवतोय – इतरेजनांना गंमत.

मंदा : गजानन, तू माझ्यावर रागावला आहेस का ?

गजानन : नाही, मंदा. मी तुझ्यावर रागवावं असा तू माझा काय अपराध केला आहेस ? तसा अपराध म्हणशील तर माझाच आहे. लैला कशी आहे ते माहीत असून मी तिच्यावर प्रेम केलं. त्यामुळंच मी आज पराकाष्ठेचा दुःखी झालोय. तिच्या पायी बदनामही झालोय.

मंदा : इतक्या उलट्या काळजाच्या, लबाड, स्वार्थी, पैशाला लालचावलेल्या मुलीवर तुझा जीव जडलाच कसा, हे मला कळत नाही. तिला निःस्वार्थी, सात्विक आणि एकनिष्ठ प्रेम कसं असतं याची ओळख तरी आहे ?

गजानन : असंच काही नाही. लग्न झाल्यावर सहवासानं तिचा स्वभाव बदलेल असं मला वाटत होतं. पण ती मुळी सहवासातच यायला तयार नाही. मी सांगतो, मदनकुमारसारख्या पाजी माणसांनीच तिचा घात चालवलाय.

मोरोपंत : नवे, तुम्ही अजून चुकताहात. बायकांची काळजं उलटीच बसलेली असतात. म्हणून त्यांच्यावर प्रेम सुद्धा उलटंच करावं लागतं. म्हणजे प्रथम बडवावं आणि मग लाड करावेत. लाड करायचे ते खाण्यापिण्यात, कपड्यालत्त्यांत, आणि दागदागिन्यांत. पण ते आत माजघरात, नाही तर शयन महालात. बाहेर फक्त धाक. तिजोरीच्या किल्ल्या बाईच्या कडूसरीला लावाव्यात, पण बाई सतत आपल्या कडूसरीला ठेवावी. 'बायको' ही एक महागडी करमणूक आहे, पण शिंची ती माणसाला लागते, म्हणून हा मंत्र..

गजानन : मोठं अजब तत्वज्ञान सांगताहात मोरोपंत, तुम्ही.

मोरोपंत : हे तत्वज्ञान नाही, नवे. हा संसार- सुखाचा मूलमंत्र आहे आणि तो खुद्द कै. बाबा महाराजांनीच या सेवकाला सांगितला आहे.

गजानन : तर मग आता आम्ही या लैलाराणीला कडूसरीला कशी लावावी म्हणता ?

मोरोपंत : छे छे ! नवे, त्या फंदात तुम्ही मुळीच पडू नका. जो कोणी त्यांना आपल्या कडूसरीला लावण्याचा प्रयत्न करील त्याचे कटिवस्त्रच गायब होईल.

गजानन : तर मग तिच्या वृत्ती बदलायसाठी मला जालीमच इलाज करायला हवा.

मंदा : तिचा नाद तू सोड, नाही तर नको सोडूस. मला बाकीच्या

गोष्टीशी काहीही कर्तव्य नाहीये. पण बाबा महाराजांनी वाड्यावरला स्वैपाकघराचा कारभार माझ्याकडं सोपवलाय. तेव्हा या घराचा धनी दोन वेळचं यथासांग जेवतो की नाही ते पाहणं माझं काम आहे. गजानन, तू थोडं तरी खाल्ल्याशिवाय मी इथून हलायची नाही.

गजानन : ठीक आहे. मान्य आहे मला. पण माझं मन अंमळ शांत झालं म्हणजे स्वयंपाकघरात येऊन दोन घास खाईन मी. मग तर झालं ? तो ट्रे घेऊन जा तू. (मंदा ट्रे घेऊन जाऊ लागते –)

मोरोपंत : मंदे, वाड्यावरल्या स्वैपाकिणीची जागा तू आता राजीखुषीनं घेतलीच आहेस. पण नव्या रावसाहेबांना जेवू-खाऊ घालताना स्वतःच त्यांचा फराळ होऊ नकोस, म्हणजे झालं.

मंदा : (थबकून) शीऽऽ ! अण्णा, इतकं घाणेरडं बोलवतं तरी कसं हो तुम्हाला ?

मोरोपंत : जहागीरदार-इनामदार-सावकार या जमातीची भूक कशी असते हे मी पाहिलंय आणि हे नवे रावसाहेब तर त्याचंच फळ आहे. म्हणून तुला घाणेरडा वाटला तरी एक रोखठोक इशारा. जा. (मंदा जाते.)

गजानन : मोरोपंत, तुम्हाला स्वतःच्या लेकीची सुद्धा खात्री वाटत नाही ?

मोरोपंत : मला माझी सुद्धा खात्री वाटत नाही. मग लेकीची गोष्ट काय घेऊन बसलात ? (सदऱ्याचा खिसा वर करून पुन्हा एक घुटका मारून सदरा खाली करीत –) हा ऽऽ ! नवे, तुम्ही बाईसाहेबांना पंचवीस लाख रुपये देऊन टाकलेत. कराराप्रमाणं दिलेत हे ठीकच झालं. पण तेही वाचवता आले असते. 'धर्मे च, अर्थे च, कामे च' ही शपथ पुरी झाल्यावर म्हणजे मूल-बाळ झाल्यावर ही रक्कम हप्त्याहप्त्यानं मिळेल असं तुम्ही म्हणू शकत होता.

गजानन : पैसे तिचे होते ते तिला मी देऊन टाकले.

मोरोपंत : वरल्या वीस लाखांचं काय ?

गजानन : तेही मी तिला देऊन टाकले आहेत.

मोरोपंत : ही सगळी रक्कम त्या मदनकुमारच्या घशात जाणार. जाणार नव्हे. गेलीच आहे.

गजानन : तिचं नशीब.

मोरोपंत : आणि तुमचंही. तुम्ही सह्या करून बाईसाहेबांना कोऱ्या चेकचं पुस्तक दिलंय हे तुम्हाला आठवतंय का ? ते पुस्तक मदनकुमारपाशी आहे.

गजानन : मी ते परत मागून घेईन.

मोरोपंत : म्हणजे पुन्हा भांडण. आणि चेकबुक मिळणार नाही ते नाहीच.

गजानन : मी स्टॉप पेमेंट म्हणून बँकेला कळवून टाकीन.

मोरोपंत : मग तेवढं करा. तेही मुकाट्यानं.

गजानन : मोरोपंत, तुम्ही नक्की सल्लागार कोणाचे आहात ? लैलाचे की माझे ?

मोरोपंत : नवे, आकाशातल्या दोन पक्ष्यांपेक्षा हातातला एक पक्षी बरा, नाही का ?

गजानन : म्हणजे ?

मोरोपंत : बाईसाहेब चालल्या म्हणजे त्यांची चाकरीही संपलीच. आता तुमची भलाई एवढ्याचसाठी पाहायची, की पोहोऱ्यात पाणी यायचं असेल तर आडात पाणी राहील याची काळजी करायलाच हवी. बघताय काय नवे ? अहो, कापड दुकान आणि 'पूजा प्रसाद केंद्र' ऊर्फ घरगुती खानावळ उत्तम चालायची तर सावकारांच्या संपत्तीची काळजी करायला नको ? नवे, जगात कोणी कोणाला फुकट मदत करीत नाही. (गजानन थक्क होऊन बघतच राहतो. मोरोपंत जातात. गजानन क्षणमात्र विचार करीत उभा राहतो. मग कपाटातून शंख काढून फुंकतो. तशी – गडगडाट, अंधार. विचित्र सुरावटीचे संगीत, आणि क्षणार्धात रंगमंच प्रकाशाने उजळताच दारात उभे दिसतात महंतराज कालियास्वामी. तशी गजानन शंख बाजूला ठेवून लगबगीनं स्वामींना वंदन करतो.

महंत : (हसून) का बेटा ? माझी पुन्हा आठवण का काढलीस ?

गजानन : तशीच तातडीची गरज निर्माण झाली, महंतराज.

महंत : तुझ्या दोन्ही इच्छा पुऱ्या झाल्या ना ?

गजानन : तशा पुऱ्या झाल्या म्हटलंच पाहिजे. पण महंतराज, माझ्या पदरात काहीच पडलं नाही.

महंत : नेमकं तुला काय म्हणायचंय, बेटा ?

गजानन : लैलाशी माझं लग्न झालंय, पण माझ्यावर तिचं प्रेम नाही. या वाड्यावर ती नांदायलाच तयार नाही. स्वभावानं ती चंचल, खोटारडी, पैशार्थी, लोभी, आणि शीलभ्रष्ट आहे. मदनकुमार नावाच्या एका नटानं तर तिला पुरतं पागल करून टाकलंय. तिनं त्याला चाळीस लाखांची रक्कम देऊन टाकली असावी असा माझा अंदाज आहे. तो तिला आणि

तिच्यामुळं मला भिकेला लावील असं मला भय वाटतं, स्वामी.

महंत : हूं ऽऽ ! प्रश्न गंभीर आहे खरा. अशा परिस्थितीत तिचा नाद सोडावा असं तुला वाटत नाही ? लक्ष्मी किती चंचल असते हे अजून तुझ्या लक्षात आलं नाही ? अर्थात, अजून तुझ्या दैवी इच्छा शिल्लक आहेतच. त्यांचा तू जरूर उपयोग करू शकतोस.

गजानन : महंतराज, आता मला फक्त दोन इच्छा मागायच्या आहेत.

महंत : ठीक ठीक. (शंख फुंकत) जय देवी कपालकुंडला ! इच्छा नेमक्या शब्दात सांग. (काही मंत्र पुटपुटत) सांग – तुझी पहिली इच्छा !

गजानन : या मदनकुमारनं लैलाकडून जेवढा पैसा लुबाडला असेल तेवढा सगळा मला परत मिळावा आणि लैला त्याच्याच नव्हे तर तिच्या सगळया बदमाश मित्रांच्या कचाटयातून कायमची सुटावी.

महंत : (हात वर करून) तथास्तु ! (गडगडाट होतो) दुसरी इच्छा सांग.

गजानन : लैलाचा सगळा स्वभावच बदलावा. तिला नीतीची चाड निर्माण व्हावी. ती सरळ, सात्विक, शुद्ध हृदयाची व्हावी. सगळा नटवेपणा, लोभीपणा, रंगेलपणा नाहीसा व्हावा. उच्च उदात्त, दैवी, सात्विक प्रेम – जसं राधेला कृष्णाबद्दल वाटायचं, तसं तिच्या हृदयात उपजावं. अगदी गाढ एकनिष्ठ, पण वासनाशून्य प्रेम तिनं करावं. सेवाभाव, प्रेमळपणा, दया-क्षमा-शांती यांची जणू ती दुसरी मूर्तीच व्हावी. तिला मित्र मिळावेत. पण हे असले उल्लू लंपट हरामखोर लोक नकोत. तेही साधू वृत्तीचे, तिला योग्य मार्गदर्शन करणारे मिळावेत. माझी लैला अशा नव्या रूपात मला मिळावी.

महंत : (हात वर करीत) तथास्तु. (पुन्हा गडगडाट) मात्र – या वेळी तुझी मागणी काही घटना घडण्याची नाही. ती वृत्तिधर्म आणि स्वभाव बदलण्याची आहे. तुला हवं ते घडायचं तर आठ-दहा दिवसांचा अवधी तरी लागेलच.

गजानन : (हुरळून) मान्य आहे मला, महंतराज !

महंत : जय जय देवी कपालकुंडला ! तुझी लीला अगाध आहे.

(संगीत उसळते. अंधार होतो. आणि त्याच वेळी – )

**(प्रवेश पहिला संपला)**

# अंक दुसरा ❖ प्रवेश दुसरा

(सुमारे पंधरा दिवस उलटले आहेत. एक सायंकाळ. तोच दिवाणखाना. मंदा दिवाणावर बसली आहे. गजानन अस्वस्थतेनं येरझारा घालतो आहे. मुद्रा आजाऱ्यासारखी. दाढी वाढलेली.)

**मंदा** : मला तुझं नवल वाटतं, गजानन. महंतराज़ कालियास्वामींच्या सांगण्यावर तुझा इतका गाढ विश्वास बसलाच कसा ?

**गजानन** : मंदा, पहिल्या दोन इच्छा जेव्हा मी बोलून दाखवल्या तेव्हा मला तेथल्या तेथे तत्काळ प्रचीती आली होती.

**मंदा** : डोंबलाची प्रचीती ! अरे वस्तुस्थिती इतकी साधी, सरळ आणि स्पष्ट आहे, की त्यात चमत्काराची कोणाला दुरून सुद्धा शंका येणार नाही. मला सांग, ज्या दिवशी तुझ्या इच्छा तू महंतराजांना बोलून दाखवल्यास, त्याच्या आधी दीड-दोन महिने बाबा महाराजांनी आपलं मृत्युपत्र तयार केलं होतं, हे तर खरं ? मृत्युपत्रातला मजकूर महंतराजांना माहीत असलाच पाहिजे. बरं, तुला एवढी संपत्ती मिळाल्यावर लैला तुझ्याशी लग्न करायला तयार होईल यात चमत्कार कसला ? त्यातून बाबा महाराजांनी तिला पंचवीस लाख रुपये देऊ केल्यानंतर ती लग्नाला आपण होऊन धावली नसती तरच आश्चर्य होतं.

**गजानन** : मंदा, पण महंतराजांच्या दैवी समर्थ्याची प्रचीती त्याआधी सुद्धा त्यांनी मला आणून दिली होती. माझी निर्भर्त्सना करून लैला निघून गेल्यावर - खरं म्हणजे मी जीवच देणार होतो. लैलानं येऊन माझी क्षमा मागितली पाहिजे अशी माझी इच्छा बोलून दाखवताच ती इथं आली आणि तिनं पाया पडून माझी क्षमा मागितली. हा चमत्कार नव्हे ?

**मंदा** : पण त्याआधी काय घडलं होतं हे तुला कुठं ठाऊक आहे ? बाबा-महाराजांच्या जवळ येऊन ती तुला शिव्या घालायला लागली, तशी ही पंचवीस लाखांची गोष्ट सांगून सावकारांनी तिची खरमरीत कानउघडणी केली होती.

**गजानन** : (येरझारा घालीत) हूं ऽ ! काही कळत नाही. तू म्हणतेस ते सगळं तर्काला पटण्यासारखं आहे. पण महंतराजांच्या दैवी सामर्थ्याबद्दल मला अजून विश्वासच वाटतो.

मंदा : वाटतो तर वाटू दे. महंतराजांच्या चमत्कारानं लैलाच्या स्वभावात बदल घडून आला आणि ती तुझ्याशी निष्ठेनं संसार करायला लागली तर सगळ्यात मोठा आनंद मला होईल. लैलानं मदनकुमारला दिलेले चाळीस लाख रुपये चमत्कार झाला तरच तुला परत मिळतील. पण तो होईल की नाही आणि झाला तर कधी होईल या चिंतेनं तू आपली किती दशा दशा करून घेतली आहेस, ते एकदा आरशात जाऊन पाहा. धड झोप नाही, धड वेळेवर खाणं-पिणं नाही, धड कामकाज नाही. दिवस-रात्र सिगरेटी आणि ध्यानी-मनी अष्टौप्रहर फक्त 'लैला ! लैला ! लैला !' एवढा जप एखाद्या देवीचा केला असतास तर तुला ती कधीच पावली असती.

गजानन : जे काय माझं झालंय ते माझ्यापुरतं. तू माझ्यासाठी एवढा जीव का टाकते आहेस ? कशासाठी तू माझी एवढी काळजी, इतकी सेवाचाकरी करते आहेस ?

मंदा : (ताडकन) मूर्ख म्हणून: कळलं ? (थबकून) शेवटचं सांगते, मला त्यात सुख मिळतं म्हणून.

गजानन : पण आपलं लग्न व्हावं, आपला संसार असावा, असं तुला –

मंदा : थांब. हा प्रश्न तू मला पुन्हा कधीही विचारू नकोस. त्याचं उत्तर मी देणार नाही. त्याच्याशी तुझा काहीही संबंध नाही. (आवेगानं निघून जाते.)

(गजानन विचारमग्न होतो. उठून येरझारा घालतो. तेवढ्यात मोरोपंत येतात.)

मोरोपंत : रावसाहेब, पाहुणे आलेत.

गजानन : कोण ? लैला ?

मोरोपंत : मी पाहुणे म्हणालो, नवे. लैलादेवी काही पाहुण्या नव्हेत.

गजानन : कोण पाहुणे ?

मोरोपंत : हे पाहुणे फारच प्रेक्षणीय वेशभूषेत आले आहेत. त्यांना तुमची तातडीने भेट घ्यायचीय.

गजानन : खरं म्हणजे मी आज कोणालाही भेटायच्या मनःस्थितीत नाहीये, मोरोपंत.

मोरोपंत : मी त्यांना सांगितलं तसं. तर ते म्हणाले, भेट न होता मी परत गेलो तर रावसाहेबांनाच पस्तावावं लागेल.

गजानन : (विचार करीत) ठीक आहे. घेऊन या पाहुण्यांना.

(मोरोपंत जातात. गजानन पुन्हा येरझारा घालू लागतो. मध्येच तो

थबकतो. आ वासून विस्मयाने दाराकडे पाहू लागतो. कारण त्याच वेळी दारात सुहास्य वदनाने येऊन उभे राहतात साक्षात भगवान श्रीकृष्ण. तशी –)

गजानन : तुम्ही–तुम्ही–

श्रीकृष्ण : मी भगवान श्रीकृष्ण नाही. मी आहे मदनकुमार.

गजानन : ते मी ओळखलं. पण तुम्ही या–या वेशभूषेत–म्हणजे शूटिंग करून तसेच इकडं आलात काय ?

मदनकुमार : नाही. शूटिंग बिटिंग काही नाही. सिनेमाचा प्रांत मी केव्हाच सोडलाय !

गजानन : सिनेमा सोडला ? आणि मग लैला कुठाय ?

मदनकुमार : मला नाही माहीत. मला ती कधीच सोडून गेली. वृंदावनच्या श्रीकृष्ण आश्रमाचे राजयोगी मुकुंद माधवाचार्य ऊर्फ एम. माधवाचार्य यांचा तिनं गुरूपदेश घेतलाय म्हणे. त्यांच्या सेवेतच असते ती – म्हणजे असं ऐकलंय मी.

गजानन : पण मग तुम्ही इथं कशासाठी आलात ? माझ्याकडे तुमचं काम काय असणार ? (त्याच वेळी एक सूटकेस घेऊन मोरोपंत येतात.)

मदनकुमार : ठेवा ती इथं माझ्याजवळ. बसा तरी म्हणणार आहात का ? (आत येऊन बसत) तुम्ही नाही म्हणालात तरी मी बसणारच.

मोरोपंत : काय दगडबिगड भरलेत का हो या बॅगेत ? नाही, बॅग जरा जादाच जड लागतेय म्हणून आपलं –

मदनकुमार : एका अर्थानं दगडच आहेत त्यात. पण त्या दगडांची जात वेगळी आहे. म्हणजे त्यात हिऱ्यांचा हार आहे, शिवाय सोन्या-मोत्यांचे दागिने आहेत आणि शिवाय चाळीस लाख रुपयांच्या नोटा आहेत. घ्या ही बॅग. या बॅगेच्या चाव्या.

मोरोपंत : (थक्क होत) आंऽ ? या बॅगेत चाळीस लाख ? हिऱ्यांचा हार ? शिवाय सोन्या-मोत्याचे दागिने ? कोठून आणलेत ? इथं कशासाठी आणलेत ?

मदनकुमार : या मालावर मालकी या रावसाहेबांची. लैलानं ही बॅग अशीच्या अशीच माझ्या स्वाधीन केली होती. फिल्म इंडस्ट्री मी सोडायची ठरवली तेव्हा मी तिला ही बॅग द्यायला वृंदावनला गेलो. तर ती मला म्हणाली, चिंचलीला जाऊन ज्यांची त्यांना म्हणजे या गजाननरावांना द्या. मला त्यातलं काहीही नको.

मोरोपंत : आणि तुम्ही इमानेइतबारे ती बॅग रावसाहेबांना देण्यासाठी इथं

२३२१३ ॥५॥८
ना।२५

घेऊन आलात ?

मदनकुमार : हो. अर्थातच.

मोरोपंत : (वाकून नमस्कार करीत) भगवान, पुन्हा एकदा हरिश्चंद्र राजाच्या सत्य युगाला प्रारंभ तर झाला नाही ?

मदनकुमार : झाला नाही, पण लवकरच होईल.

मोरोपंत : पण मदनकुमारजी, या बॅगेत काय आहे हे तुम्ही मला खालीच सांगितलं असतंत तर ? अंमळ काही वेगळी योजना मी सुचवली असती.

मदनकुमार : वेगळी योजना, म्हणजे भ्रष्टाचार असंच ना ? (उठत आवेशानं) पंत, आमच्या पक्षाचा भ्रष्टाचाराला सक्त विरोध आहे.

मोरोपंत : पक्ष ? च्यामारी ! मध्येच हा पक्ष कोठून उपटला ?

मदनकुमार : तुम्ही आमच्या कृष्णराज्य पक्षाचा निवडणूक जाहीरनामा वाचला नाही ?

गजानन : कुठला कृष्णराज्य पक्ष ? कुठली निवडणूक ? तुम्ही काय बोलताय मदनकुमार ? मला काहीच कळत नाही. तुम्ही चित्रपट सोडून नाटकात काम करायला सुरवात केलीय का ?

मोरोपंत : बरोब्बर ! टाळी द्या नवे ! सौभद्रातला कृष्ण याच वेशभूषेत काय गंमत करून जात होता म्हणता ! अहाहा – (गातो) नारी मज बहु असती, प्रीती परितुजवरती –

मदनकुमार : मिस्टर मोरोपंत, ते-ते त्या काळी ! आताचा आमचा मॅनिफॅस्टो वेगळा आहे. समान नागरिक कायदा. एका पुरुषाला एकच बायको. कळ्लंऽ ?

मोरोपंत : हरहर ! (कपाळावर हात मारीत) फक्त एकच बायको ? मग आमच्या देशातल्या अल्पसंख्यांकांचे पुढल्या पिढीत काय होणार ?

मदनकुमार : ते अल्पसंख्यांक बघून घेतील. पण अंमळ 'मैत्रिणींचा' कायदा मात्र आमच्या कृष्णराज्य पक्षानं खूपच उदार करण्याचं ठरवलंय. म्हणजे 'मैत्रिणीला' देखील लग्नाच्या बायकोसारखेच सगळे अधिकार आम्ही ठेवले आहेत – मॅनिफॅस्टोमध्ये.

गजानन : मदनकुमार, तुम्ही हे काय बोलताहात मघापासून ? आणि ही वेशभूषा करून तुम्ही इथं कशासाठी आला आहात, हे अजूनही मला कळ्लं नाही.

मदनकुमार : कळ्लं नसेल तर सांगतो. 'कृष्ण-रास-लीला' ही आमची सीरियल टी.व्ही. वर उभ्या भारतात, दक्षिणेत आणि उत्तरेत

देखील, इतकी गाजली, इतकी गाजली, इतकी गाजली की –

गजानन : तुम्हाला अफाट पैसा मिळाला, आणि म्हणून तुम्ही ही बॅग जशीच्या तशी मला परत द्यायला आलात. हेच ना ?

मदनकुमार : पैसा पैसा काय करताहात राव ? माझी भूक आता लाखांच्या रकमेनं भागण्यासारखी नाही. माझ्या डोळ्यांपुढं कोटींच्या रकमा उभ्या आहेत. 'कृष्ण-रास-लीला' टी.व्ही. वर गाजल्यामुळे तामिळनाडूतले लोक कृष्णवेडे झाले आहेत. म्हणून तेथल्या 'कृष्णराज्य पक्षानं' नेता म्हणून मला या निवडणुकीला उभं करायचं ठरवलं आहे. आमच्या पक्षाच्या परिणामकारक प्रचारासाठी सध्या मी श्रीकृष्णाच्या या वेशभूषेतच व्याख्यानं देत फिरत असतो. आमचा पक्ष प्रचंड बहुमतानं निवडून येणार आणि मी मुख्यमंत्री होणार. त्यासाठी मी एका बाईचे पैसे लंपास केले, असा आरोप कोणी माझ्यावर करू नये आणि माझ्या विरोधकांना माझं चारित्र्यहनन करण्याची संधी मिळू नये, म्हणून ही बॅग देण्यासाठी वाकडी वाट करून मी इथं आलोय.

गजानन : तुम्ही लैलाकडून पैसे आणि दागिने घेतलेत, हे तुमच्या विरोधकांना कळायला काय कारण आहे, मदनकुमार ?

मदनकुमार : हे पाहा राव, तुम्ही सरळ अंतःकरणाचे आहात. पण तुमची बायको तशी सरळ नाहीये. परवा एका मुलाखतीत ती हे सांगून गेली होती. महा चालू आणि नाटकी बाई आहे ती. कसा काय तुम्ही तिच्या बरोबर संसार करणार देव जाणे ? तो एम. माधवाचार्य तर तिच्यापेक्षा भारी माणूस आहे. त्यानं तर पाच-पंचवीस खानदानी घरातल्या सुंदर बायका-पोरी पळवून जवळ बाळगल्या आहेत. कोणाला 'रुक्मिणी' म्हण, कोणाला 'सत्यभामा' म्हण, तर कोणाला 'चंद्रावळ' म्हण. तुमच्या लैलाला त्यानं आपली 'राधामाई' करून टाकलीय.

गजानन : लैलाला ? राधामाई ?

मदनकुमार : काही विचारू नका. बया गाते काय, नाचते काय, त्या माधवाचार्याला भरवते काय, त्याच्या पायाचं तीर्थ काय घेते ... सगळा उठवळपणा आहे. हॅऽऽऽ !

(तोच हैबती येतो)

हैबती : रावसाहेब, कृष्णमंदिरातून निरोप घेऊन एक पुजारी आलाय की कालच माधवाचार्य आणि राधामाई इथं आली आहेत. थोड्या वेळात आपल्या भेटीसाठी येणार आहेत.

मदनकुमार : (उठत) बघा, आली प्रचीती ? आता मला उठलंच पाहिजे. बराय, येतो मी.

गजानन : अहो, तुम्हाला या पैशाची, दागदागिन्यांची पावती नको का ?

मदनकुमार : पैसे घेताना मी कुठं पावती दिली होती ? पावतीची गरज नाही. पण त्या महामायेचं तोंड बंद करा म्हणजे झालं. आणि मुख्य म्हणजे आमच्या पक्षाला मत द्या. नमस्ते. चला पुढल्या चौकात ! (जातो)

गजानन : या दैत्याच्या तावडीतून लैला सुटली ही फार भली गोष्ट झाली.

मोरोपंत : पण दुसऱ्या सोद्याच्या ताब्यात बाईसाहेब गेल्या नसल्या म्हणजे मिळवली.

गजानन : छे छे, तसं मुळीच होणार नाही. तुम्ही या बदमाशाच्या शब्दावर काय विश्वास ठेवताहात, मोरोपंत ? अहो, राजयोगी मुकुंद माधवाचार्य हे केवढे मोठे संत, कृष्णभक्त आणि तत्वज्ञानी आहेत, हे या गदळ माणसाला काय ठाऊक ?

मोरोपंत : पण लैलादेवी कृष्णमंदिरात कशासाठी उतरायला गेल्या ?

गजानन : कदाचित माधवाचार्यांनी तिला तिकडं उतरायचा आग्रह केला असेल. मोरोपंत, तिला घेऊन येण्यासाठी गाडी पाठवून द्या.

मोरोपंत : ठीक आहे. पाठवतो. (मोरोपंत जातात. गजानन बॅग उचलून दिवाणावर ठेवतो. चावी लावून बॅग उघडतो आणि क्षणमात्र ती न्याहाळतो. मग पुन्हा बंद करून चावी खिशात टाकतो. तेवढ्यात मोरोपंत येतात.) पाच मिनिटांत लैलादेवी येतील. गाडीतून. हैबतीलाच पाठवलाय.

गजानन : मोरोपंत, दैवी चमत्काराशिवाय हा सगळा ऐवज परत करायची बुद्धी मदनकुमारला होणार नाही आणि सात्विक शुद्ध प्रेमाची आणि नैतिक आचरणाची लैलालाही गोडी लागणार नाही. तुम्हाला काय वाटतं ?

मोरोपंत : तुम्ही म्हणता ते रास्तच आहे, नवे. हा ईश्वरी चमत्कारच आहे. तरी पण रावसाहेब, या बॅगेतल्या ऐवजाचं तुम्ही काय करायचं ठरवलंय ?

गजानन : यातले सगळे अलंकार आणि भूषणं मी माझ्या हातानं आज रात्री तिच्या अंगावर चढवणार आहे.

मोरोपंत : म्हणजे आज रात्री तुम्हाला श्रृंगाररसाची चमचमीत मेजवानीच मिळणार तर.

गजानन : कोणास ठाऊक ? आजपर्यंत तरी उपवासाचंच पुण्य पदरी

पडलंय.

मोरोपंत : रावसाहेब, मी तुम्हाला उपदेश करणं बरं नव्हे. पण जरा ठणठणीत पुरुषासारखे वागा. लाड करा, पण रट्टेही लगावा. त्याहीपेक्षा लवकरात लवकर पाळण्याची 'तरतूद' करा.

गजानन : तसंच करणार आहे. काय कृष्णपूजा करायची असेल ती वाड्यावर करायची.

मोरोपंत : छे छे ऽ! कृष्णपूजा करायची ती शयन महालात – पलंगावर. नवरा म्हणजे कृष्णच की. (लावणीच्या थाटात ओळ म्हणतात) कसा ग बाई झाला । कुणी ग बाई केला । राधे तूझा सैल अंबाडा ऽऽ.....

गजानन : मोरोपंत, तुम्ही चांगलेच पांचट आहात की.

मोरोपंत : (हसतात. सदरा खिशासकट वर करून एक घुटका मारतात. मग) हा ऽ ! असो असो. नवराबायकोच्या पलंगतोड क्रीडेत आम्हाला नाक खुपसायचं नाही. बायको कशी संभाळायची हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे. रावसाहेब, या बॅगेतल्या चाळीस लाख रुपयांचं तुम्ही काय करायचं ठरवलंय ?

गजानन : दुसरं काय करणार ? बँकेत डिपॉझिटमध्ये पुन्हा गुंतवणार.

मोरोपंत : नाही. मुळीच नाही. ते जवळ ठेवायचे. तिजोरीत सुद्धा नाही. याच बॅगेत राहू देत.

गजानन : का ?

मोरोपंत : तुमच्यावर एक नवं संकट येऊ पाहतंय. ते टळेपर्यंत तरी –

गजानन : नवं संकट ? कसलं संकट ? काय प्रकरण आहे, मोरोपंत ?

मोरोपंत : रावसाहेब, आज आपल्या 'महापूजा प्रसाद केंद्रात' एक इसम जेवायला आला होता.

गजानन : आपल्या म्हणू नका; तुमच्या म्हणा.

मोरोपंत : बरं, माझा मुद्दा तो नाहीये.

गजानन : अजून भोजनार्थींचा शिधा वाड्यावरूनच जातो ना ? फुकटचा ?

मोरोपंत : ते वळण आता पक्क्या तरतुदीनं पडून गेलंय, रावसाहेब.

गजानन : तुम्ही पक्के 'तरतुदीचे' गृहस्थ आहात, मोरोपंत.

मोरोपंत : हीच तरतूद तुम्हालाही करायची वेळ येणार आहे. रावसाहेब. तर हा गृहस्थ वाड्यावरल्या नोकराचाकरांजवळ तुमची बारीक चौकशी करीत होता. तसाच तो अलीकडं कधी तरी आपल्या सगळ्या बागायती मळ्याकडं आणि शेतावरही जाऊन आला असावा.

गजानन : कशासाठी ?
मोरोपंत : तुमची सगळी माहिती काढण्यासाठी. जेवण झाल्यावर दक्षणेचे पैसे देताना तो इसम खुद्द माझ्यापाशी चौकशी करू लागला. बाबा महाराजांनी हे मृत्युपत्र कधी केलं ? तुम्ही बाबासाहेबांचे औरस पुत्र आहात की अनौरस ? तसंच ही इस्टेट कायदेशीर दृष्टीनं मृत्युपत्र करून दुसऱ्या कोणाला देता येते की नाही याबद्दल.
गजानन : पण संबंध काय त्या इसमाचा आमच्या मालमत्तेशी ?
मोरोपंत : मीही त्याला नेमका हाच प्रश्न केला, तेव्हा तो गडबडीने सुपारी तोंडात टाकीत पैसे देऊन सटकला.
गजानन : असेल कोणी तरी फाजील चौकशा करणारा रिकामटेकडा माणूस.
मोरोपंत : मलाही तसंच वाटलं होतं. पण दुपारी, भोजनोत्तर आपण वामकुक्षी करीत होता त्या वेळी एक फोन आला.
गजानन : कोणाचा ?
मोरोपंत : ॲडव्होकेट गुरुनाथ जमदग्नी. त्यांच्या बोलण्यावरून असं दिसलं की हा गृहस्थ त्यांनाही भेटायला गेला होता.
गजानन : पण गुरुनाथांनी त्याला हाकलून द्यायचा नाही ? दाराशी उभाच कसा केला ?
मोरोपंत : मी देखील ॲडव्होकेट साहेबांना हाच सवाल केला. पण मग त्यांनी जे उत्तर दिलं त्यामुळं मी गप्पच झालो. त्या माणसानं आपलं जे नाव सांगितलं त्यामुळं ॲडव्होकेटसाहेबही चक्रावले.
गजानन : काय नाव सांगितलं आपलं त्या माणसानं ?
मोरोपंत : बाळकृष्ण चिंचलीकर.
गजानन : (ताडकन सावरून बसत) क–काय, काय, काऽय ? बाळकृष्ण चिंचलीकर ?
मोरोपंत : होय. कै. बाबा महाराजांचा पुतण्या. हाँगकाँगकडे परागंदा झालेला.
गजानन : हे–हे–हे कशावरून ? तो म्हणाला म्हणूनच ना ?
मोरोपंत : त्यानं आपले सगळे कागदपत्र गुरुनाथांना दाखवले. गुरुनाथांनी ते ठेवून घेतले आहेत. थोडी मुदतही मागितली आहे.
गजानन : (चेहरा टाकत) हूंऽऽ – म्हणजे गंभीरच आहे हे प्रकरण. तो काय करू शकेल ?
मोरोपंत : जवळ पैसे असले तर तो दावा लावू शकेल. त्यानं दावा लावला

तर त्याचा निकाल पाच-दहा वर्षांनी लागेल. पण तोपर्यंत सगळ्या प्रॉपर्टीला कोर्टाची सिलं लागतील. सगळे अकौंट्स फ्रिज होतील. तुम्हाला खर्चापुरते पैसे आणि राहायपुरती जागा, फार फार तर कोर्टाकडं अर्ज करून मिळवावी लागेल.

गजानन : यात त्याला काय मिळणार आहे ?

मोरोपंत : तुमच्यावर दबाव आणून तो तुम्हाला तडजोड करायला भाग पाडू शकेल.

गजानन : तडजोड कसली ?

मोरोपंत : संपत्तीची विभागणी करण्याची.

गजानन : निम्मी निम्मी ?

मोरोपंत : ते काय म्हणून ? तो "साठ-चाळीस" किंवा तुम्ही दबताहात हे पाहून "ऐशी-वीस" सुद्धा मागू शकेल.

गजानन : तसं असेल तर मी कोर्टातच दावा लढवीन.

मोरोपंत : 'दावा हरेल सुद्धा' हे वकिलांचं मत जमेला धरून दावा जरूर लढवा. पण दावा लढवण्यासाठी सुद्धा पैसा लागेल. कोर्टानं स्टे ऑर्डर काढून सिलं लावली म्हणजे तुम्ही पैसा कोठून उभा कराल ?

गजानन : हा प्रश्न तुम्ही उपस्थित करताहात, मोरापंत ?

मोरोपंत : रावसाहेब, हा प्रश्न ॲडव्होकेटसाहेबांनी उपस्थित केलाय. मी फक्त तुमच्यापुढं विचारासाठी मांडलाय.

गजानन : (विचारात पडत) हूं ऽऽ – कठीणच आहे एकूण सगळं. यावर तुम्हाला काही उपाय सुचतोय का मोरोपंत ?

मोरोपंत : उपाय – उपाय – म्हणजे 'तरतूद'. मघा तुम्ही उल्लेखिलेली. ज्या तरतुदीनुसार 'महापूजा प्रसाद केंद्र' आणि 'बाबा महाराज क्लॉथ स्टोअर' आम्ही काढले आणि बक्कळ पैका मिळवला, आणिक मिळवतो आहोत. तसलीच एखादी 'तरतूद'. तीही झटपट. तो 'बाळकृष्ण' न्यायदेवतेला आवाहन करायच्या पूर्वीच.

गजानन : पण म्हणजे 'तरतूद' काय करायची ?

मोरोपंत : (श्लोक म्हटल्यागत) दिसामाजी काही तरी ते पळवावे, सुरक्षीत जागी लपवीत जावे ॥ जय जय रघुवीर समर्थ ! उदाहरणार्थ – हे चाळीस लाख रुपये, बँकेत घातले की गेले. सुरक्षित जागी लपवले की 'राहिले'.

गजानन : अहो, पण ही 'सुरक्षित जागा' कोणती ?

मोरोपंत : आमच्या मळ्यावरल्या पर्णकुटीतलं तळघर. बापजन्मी या

तळघराचा वास कोणाला लागायचा नाही.

गजानन : त्या तळघरात मी हे चाळीस लाख रुपये नेऊन ठेवू ?

मोरोपंत : ठेवा.

गजानन : आणि तुम्ही ते परस्पर बळकावून बसलात तर ?

मोरोपंत : रावसाहेब, तसा मी नेकीचा इमानदार सद्गृहस्थ आहे. आमचा वाटा आमच्या पदरात पडला की मग सगळा कारभार चोख. दारूबंदी भारीच कडक होती त्या काळात बाबा महाराजांचा तळघरातील दारूचा खजिना मी तुडुंब भरून ठेवीत असे. आमची अट एवढीच होती, की सावकारांनी दारूच्या महासागरात आनंदाने पोहत राहावे, पण सेवकालाही स्नान करण्याची मुभा असावी. सावकारांनी अट मानली. जन्मभर त्यांनी आनंद केला, आम्हीही स्वर्गात विहार केला.

गजानन : या बाबतीत तुमची काय अट आहे ?

मोरोपंत : आमच्या मळ्यातल्या पर्णकुटीच्या तळघरात जो ऐवज जमा होत जाईल त्यातला निम्मा वाटा आमचा, निम्मा तुमचा.

गजानन : (किंचाळत) निम्मा ऽऽऽ ? या चाळीस लाखांतले वीस लाख मी तुम्हाला देऊ ?

मोरोपंत : देऊ नका. माझा आग्रह नाही. खुशाल बँकेत ठेवा. कोर्टाची सिलं लागली म्हणजे मग करा ओम् भवति भिक्षांदेही.

गजानन : नाही नाही – तसं मी म्हणत नाही. हे फक्त चाळीस लाखांचं झालं. बाकीच्या संपत्तीचं काय ? शेतजमिनीचं आणि बागायती मळ्यांचं काय ?

मोरोपंत : त्याबद्दलची माझी योजना जय्यत तयार आहे. अगदी युद्धपातळीवरली कारवाई करायची. रोज थोडी थोडी आपली आपणच चोरी करीत राहायचं. सगळ्या बँकांतली आपली खाती, सगळी डिपॉझिट्स, सगळे शेअर्स– हूंऽऽ ! पार सप्पा ! वाड्यावरल्या एकूण एक किमती चिजा – हूं ऽऽ ! पसार. शेतजमिनी आणि बागायती मळे काही विकता येणार नाहीत. पण त्यावर दणकून कर्ज काढून ठेवू. बैस म्हणावं लेका शेती करीत आणि कर्ज फेडीत.

गजानन : आणि अशा रीतीनं जमा होतील त्यातला निम्मा ऐवज तुम्हाला द्यायचा ?

मोरोपंत : रीतसरच आहे. चोरी म्हटली की प्राप्तीचा अर्धा वाटा चिकटलाच.

गजानन : हूं ऽऽ ! मोरोपंत, तुमची योजना फारच हुशारीची आहे. पण फार महागडी आहे.

मोरोपंत : असल्या योजना महागड्याच असतात, रावसाहेब. सर्वनाशे समुत्पन्ने अर्ध्यं त्यजति पंडितः ! सर्वनाश होण्याची वेळ आली की शहाणी माणसं अर्ध्याचा त्याग खुषीने करतात.

गजानन : ठीक आहे. लैला आली की तिचा विचार घेऊन सांगतो तुम्हाला. तूर्तास ही बॅग आमच्या बेडरूममध्ये पलंगाखाली नेऊन ठेवा.

मोरोपंत : जशी तुमची मर्जी. (बॅग उचलू लागतात, तेवढ्यात बाहेर रस्त्यावरून "गोपालकृष्ण राधेकृष्ण" चा टाळ-मृदंग-झांजा यांच्या साथीत जयघोष ऐकू येऊ लागतो. "हा काय प्रकार आहे?" म्हणून मोरोपंत विस्मयाने पृच्छा करतात. तेवढ्यात बाहेरून मंदा ओरडत येते – " गजानन, गजानन – अरे तुझी लैला आली–")

गजानन : (आनंदानं) लैला आली ? माझी लैला आली ?

मंदा : तू तिच्या स्वागताला दरवाज्यापाशी नाही येणार ?

गजानन : नाही. तिनं मला भेटायला इथंच आलं पाहिजे.

मोरोपंत : पण मला कळत नाही, मोटारीतून कृष्णमंदिरापासून वाड्यावर यायला इतका वेळ कसा लागला ?

मंदा : अहो, ती मुळी मोटारीतून आलीच नाही. ("गोपालकृष्ण राधेकृष्ण" चा जयघोष जवळ येऊ लागतो, तशी मंदा खिडकीपाशी जाते आणि बाहेर डोकावून पाहत) गजानन, अण्णा अगोदर इथे येऊन बघा तरी. अग्गोबाई ! दुतर्फा बायका-पुरुषांची केवढी प्रचंड गर्दी जमलीय ! लैला आणि माधवाचार्य नाचत-गात येताहेत. मोटार मागाहून येतेय.
("बघू बघू" म्हणत गजानन खिडकीकडे धावतो. पाठोपाठ मोरोपंत जातात. बाहेरचा देखावा पाहून गजानन कपाळावर हात मारून माघारी फिरतो आणि खचून मटकन् बसतो. क्षणार्धाने मोरोपंतही मागे येतात.)

मोरोपंत : (मान डोलावीत) वा वा ! देवीजींना कृष्णाचा साक्षात्कारच झाला असावा.

गजानन : बोडक्याचा साक्षात्कार. अहो, ही तर जोगीण झालीय जोगीण.

मंदा : मी घेऊन येतो लैलादेवींना.

गजानन : फक्त लैलालाच घेऊन ये. बाकी तो भक्तजनांचा मेळावा चौकातच थांबू दे. मोरोपंत, तुम्ही पुढं होऊन बघा जरा. (मंदा

आणि मोरोपंत लगबगीनं जातात. मग उद्वेगानं) महंतराज, महंतराज, मी तुम्हाला मागितलं होतं काय, आणि तुम्ही मला हे दिलंत काय ? सिद्ध पुरुषांचे वर सुद्धा इतके दुधारी आणि फसवे असतात काय ? (त्या क्षणी बाहेर "राधाकृष्ण-गोपालकृष्ण" चा धडाका जोरात सुरू होतो आणि नाचत-गात लैला आत येते. शुभ्र साडी-चोळी, गळ्यात रुद्राक्षांची माळ, डोक्यावरून पदर, कुंक्वाचा मळवट, एका हातात एकतारी आणि दुसऱ्या हातात चिपळ्या, अशा अवतारात ती दिसते. सर्वांत शेवटी मोरोपंत आणि मंदाही टाळ्या वाजवत 'राधाकृष्ण गोपालकृष्ण' म्हणत येतात.)

लैला : (बाकीचे 'गोपालकृष्ण-राधेकृष्ण' म्हणत नाचत असताना एकटीच नाचत गाते –)

हे री मैं तो प्रेमदिवाणी, मेरा दरद न जाणे कोय
सूली उपर सेज हमारी किस विध मिळणा होय
घायाळाची जखम जिव्हारी घायाळच ग जाणी
सये बाई मी तर शामदिवाणी, माझे दुःख न जाणे कोणी...

(हे गात आणि नाचत लैला आणि माधवाचार्य गजाननभोवती फेर धरून नाचू लागतात. तशी गजानन भडकून ओरडतो–)

गजानन : हा काय तमाशा मांडला आहेस तू लैला ? शोभत नाहीत तुला हे थेर. मी विदूषक नाहीये. नवरा आहे तुझा नवरा.

(तशी नाचता नाचताच गीत बदलते आणि)

तुझ्याविना गिरिधर गोपाला कुणी न दुसरे माझे
तूच पती मज, मी तव कांता, एक के लिये दूजे
कृष्णा, कुणी न दुसरे माझे....

('राधाकृष्ण गोपालकृष्ण' चा धडाका चालत असतानाच मागून कोठून तरी गुलालाने लाल झालेला हैबती येतो, आणि पुढे घुसून गजाननला गुलाल फाशीत त्याच्या हतात झांजा खुपशीत म्हणतो –" वाजवा रावसाहेब आणि म्हणाऽऽ "गोपालकृष्ण-राधेकृष्ण"... त्याच वेळी पडदा.)

## अंक दुसरा संपला.

# अंक तिसरा ❖ प्रवेश पहिला

(सुमारे पाच-सहा दिवस उलटले आहेत. समय रात्रीचा. दहा वाजण्याचा. तोच दिवाणखाना. बाहेर जवळच्या कृष्णमंदिरातून भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम धडाक्यात चालला आहे. "गोपालकृष्ण–राधेकृष्ण", "हरेराम हरेराम रामकृष्ण हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे" हे काही वेळ समूहाने म्हटल्यावर कोणी तरी लाउड स्पीकरवर बोलतो. "श्रीमती राधामाई आणि राजयोगी मुकुंद माधवाचार्य हे आज जाणार असल्यानं त्यांच्या महापूजेचा कार्यक्रम लवकरच सुरू होईल. ती दोघेही लवकरच मंदिरात उपस्थित होतील. तोवर ऐका श्रीपतीबुवा सुंठमारीकर आणि मंडळी गाताहेत एक गवळण. –" मग श्रीपतीबुवा भसाड्या आवाजात गातात आणि मंडळी कर्कश आवाजात त्यांना ध्रुवपदाची साथ देतात.

कृष्णा, माझा पदर धरू नको सोड ॥ ध्रु. ॥
मी गोरी राधा, तू काळाकुट्ट मुकुंदा
तुझी माझी आहे का रे जोड ? ॥ कृष्णा०
घरी माझा पती, त्याची धर जरा भीती
पडते पाया, हा संबंधच तू तोड ॥ कृष्णा०
भुलले बासरीला, म्हणून येशी का रे अंगचटीला
नको खाऊ मुळासकट ऊस, लागला जरी गोड ॥कृष्णा०

ही भजनी गवळण संपता संपताच लैला "सोड – सोड – माझी वाट. अडवू नकोस गजानन –" असं म्हणत धावत आतून दिवाणखान्यात येते. गजानन मागून धावून येत दारात हात पसरून तिची वाट अडवतो. लैलाचा वेश पूर्वीचाच, पण आता पायात घुंगरू बांधले आहेत.)

**लैला** : पागलपणा करू नकोस. गुरुदेव तिकडं माझी वाट पाहत असतील.

**गजानन** : पाहू देत. तू त्यांची कोणीही लागत नाहीस. तू माझी बायको आहेस.

**लैला** : किती वेळा तुला सांगू गजानन ? – तुझी बायको लैला होती. मी गुरूपदेश घेतला त्याच दिवशी तुझी लैला मेली. आता मी राधामाई आहे. कृष्णकन्हैयाची राधामाई.

गजानन : कृष्णकन्हैया म्हणजे तोच तुझा गोसावडा गुरुदेव, मुकुंद माधवाचार्य ना ? पक्का चारशेवीस साला.

लैला : (भडकून) खबरदार ! माझ्या कृष्णकन्हैयाची इतक्या घाणेरड्या शब्दांत तू माझ्यासमोर निंदानालस्ती करणार असलास तर खिडकीतून ओरडून मी भक्तजनांना बोलावीन. मग मात्र तुझं हाड देखील शिल्लक राहणार नाही.

गजानन : (थबकून, वाट सोडत) लैला, मी तुला अडवतोय का? पण गेल्या आठ दिवसांत एकदा सुद्धा तू मला एकांतात भेटली नाहीयेस. मला दोन शब्द सुद्धा तुझ्याशी बोलायला मिळाले नाहीयेत.

लैला : एकांतात तू माझ्याशी काय बोलू शकणार आहेस ? आत्तासारखाच लंपटपणानं कामांध नरपशू होऊन तू माझ्या अंगचटीला येणार. अरे, नवरा-बायकोंनी सुद्धा नैष्ठिक ब्रह्मचर्य पाळून आध्यात्मिक चर्चाच करायला हवी. जशी परमपूज्य रामकृष्ण परमहंसांनी आपल्या पत्नीबरोबर केली --

गजानन : किंवा तुझा हा गुरुदेव जशी तुझ्याबरोबर करतो --

लैला : होय होय, तशीच. गुरुदेवांचं माझ्यावर किती निरामय, सात्विक आणि शुद्ध प्रेम आहे, पाहा बरं. राजसा, लाडक्या, माझ्या सख्या, तुझ्यावरही माझं फार फार उत्कट गाढ प्रेम आहे.

गजानन : (हुरळून तिचा हात धरीत) क- काय, काय, काय म्हणतेस ? तुझं माझ्यावर फार फार उत्कट गाढ प्रेम आहे ?

लैला : होय रे राजसा. पण ते प्रेम पूर्णपणे वासनाशून्य, सात्विक, उदात्त आणि दैवी आहे.

गजानन : पण लाडके, नवरा म्हणून त्या प्रेमात थोडी वासना असायला हरकत नाही.

लैला : छे छे ऽऽ भलतंच काय राजा ? वासना म्हणजे पाप आहे पाप.

गजानन : हे बघ, तू मला असं सांग, तुला माझ्याबद्दल उत्कट, गाढ प्रेम वाटतं, म्हणजे तू सर्वस्वी माझी एकट्याचीच आहेस, हे तर खरं ना ?

लैला : सख्या, राजसा, असं कसं होईल ? अरे जशी मी तुझी आहे, तशीच गुरुदेवांची आहे, सगळ्या भक्तजनांची सुद्धा आहे.

गजानन : म्हणजे सगळ्या दुनियेची आहेस ?

लैला : राजसा, हे केवढं मोठ्ठं वैभव आहे, नाही का ?

गजानन : मला न पेलणारं हे वैभव आहे, लैला.

लैला : तू मला 'लैला' म्हणू नकोस. राधामाई म्हण. म्हणजे तुझ्या आत्म्याला जागृती येईल. तुला मी सांगते, गजानन -- तू ही शरीरवासना मारून टाक. वासनेच्या डबक्यातच वळवळायला तू किडा आहेस का ? खाणं, पिणं, आणि विणं यापलीकडे आपल्याला दिव्य, उदात्त, विश्वप्रेमाची प्रचीती व्हायला नको का ?

गजानन : (वैतागानं) खरंय. सखे, राजसे, लाडके, गाढवपणा माझ्याचकडून झालाय. आमच्या गुरुदेवांना तुझ्या वृत्तीत, स्वभावात, बदल व्हावा म्हणून मी जी मागणी केली होती, तिथंच चूक झाली. मला इतकं सात्विक, शुद्ध, उदात्त, दैवी प्रेम झेपणारं नाहीये.

लैला : त्याचं कारण तुला सांगू ?

गजानन : अशी माझ्या 'वामांगी रखुमाई' सारखी बसून, मला मिठीत घेऊन सांगणार असलीस तर सांग. येऽ येऽऽ अशीऽऽऽऽ-

लैला : छी छी ! किती घाणेरडं बोलतो आहेस रे तू ? तुझ्या या अवस्थेत तुला वेदान्त सांगण्यात काय अर्थ आहे ? आता मला गुरुदेव म्हणत होते ते पूर्णपणं पटलं.

गजानन : काय सांगत होता तुझा मुकुंद माधव ?

लैला : आता ते तुला सांगायलाच हवं. हा तुझा-माझा तिसरा जन्म आणि तिसऱ्यांदा पडलेली लग्नगाठ आहे.

गजानन : (ताडकन् सावरून बसत) आं ऽ ? तिसऱ्यांदा ऽऽ? तुला काय म्हणायचंय, लैला ?

लैला : पहिल्या जन्मात मी राधा होते; तू माझा पती अनय होतास. दुसऱ्या जन्मी मी मीरा होते; तू भोजराज होतास. या जन्मी मी लैला, आणि तू--

गजानन : हरे राम ! हरे कृष्ण ! म्हणजे कृष्णाजीपंतांनी तिन्ही जन्मांत आमचा पाठलाग चालवला आहे तर !

लैला : मागल्या दोन जन्मांची गोष्ट वेगळी होती. पण या जन्मी मी तुला लग्नबंधनातून मोकळं करू शकते. मोकळं करायला तयार आहे मी.

गजानन : थँक्यू व्हेरी मच. पण अजूनही तुझ्या वृत्तीत आणि स्वभावात पुन्हा एकदा फेरबदल घडू शकेल, अशी मला आशा आहे. आय कॅन वेट !

लैला : (उठत) ठीक आहे. जाण्यापूर्वी आपण श्रीकृष्णाची प्रार्थना करू

या क्र ?

गजानन : तुला वाटली तर तू कर, मी त्याला नमस्कार सुद्धा करणार नाही. सोळा हजार एकशे आठ बायका पटकावून पुन्हा आमच्या बायकोवर डोळा ? देव झाला म्हणून काय झालं ? आम्हाला मिळालेल्या एकुलत्या एक बायकोचंसुद्धा सुख मिळून देत नाही, म्हणजे काय चावटपणा आहे ?

लैला : नको रे गजन, माझ्या कृष्णकन्हैयाबद्दल असं वाईटसाईट बोलू नकोस. अरे त्या कंसाचं आणि शिशुपालाचं काय झालं ते ठाऊक आहे ना तुला ? (तेवढ्यात मोरोपंत येतात)

मोरोपंत : रावसाहेब, राजयोगी मुकुंद माधवाचार्य येताहेत.

लैला : (हर्षभरानं दाराकडं धावत) गुरुदेव आले ? (तोच राजयोगी मुकुंद माधवाचार्य येतात शुभ्र सोग्याचे धोतर, रेशमी गुरुशर्ट, अर्धवट पुढे टक्कल, मागे शेंडी, अंगावर शाल, कपाळावर भस्म असा त्यांचा थाट. लैला धावत जाऊन त्यांचे पाय धरते. ते तिला उठवून लपेटून घेतात.) कल्याण. कशी आहेस तू राधामाई ?

लैला : गुरुदेवा, आपल्या कृपेनं मी आनंदसागरात पोहत आहे.

गजानन : (कपाळाला हात लावीत) हरे राम ! शुद्ध, सात्विक, दैवी, उदात्त प्रेम ते हेच का ? वा गुरुदेव बसा बसा.
(गुरुदेव बसतात. लैला त्यांच्या पायाशी बिलगून बसते. त्यांच्या मांडीवर हनुवटी टेकवून गुरुदेवांच्या मुखाकडे पाहत ती म्हणते)

लैला : राजसा, मुकुंद माधवा, या माझ्या लाडक्या पतिदेवाला तुम्ही जाग कधी आणणार. माझ्या मागल्या जन्मी, म्हणजे मी मीरा होते तेव्हा हा भोजराज होता. त्यापूर्वी म्हणजे पुराणकाळी मी राधा होते तेव्हा अनय होता. त्या वेळी त्यानं जे हट्ट घेतले होते ते अजूनही तसेच आहेत. त्याची समजूत कशी काढायची ?

माधवाचार्य : (तिचे मुख कुरवाळीत) चिंता करू नकोस राधे, आता काळ खूपच बदलला आहे. पूर्वीइतके नवरे आता सनातनी उरले नाहीत. प्रसंगी आपली बायको दुसऱ्याला देऊन टाकण्याइतके ते उदारही झाले आहेत. एकाद्या बायकोनं अन्य पुरुषाशी मैत्री केली तर तीही खपवून घेण्याइतका समाजही समजूतदार झाला आहे. तेव्हा मी या अडाणी बालकाची समजूत घालीन. बालका –

गजानन : जरा थांबा गुरुदेव. तुम्ही महंतराज कालियास्वामींसारखे दिसता. तुम्ही सिनेस्टार मदनकुमारसारखे दिसता. ॲडव्होकेट

जमदग्नीसुद्धा तुमच्यासारखेच दिसतात. हे काय गौडबंगाल आहे ?

माधवाचार्य : बालका, हा तुझा दृष्टिदोष आहे. तू आत्ता जी नावं घेतलीस ती माणसं मला ऐकूनसुद्धा ठाऊक नाहीत. पण मनी वसे ते स्वप्नी दिसे म्हणतात ते हे असं. तू अंमळ रोज शवासन करायला लाग. म्हणजे हा दृष्टिदोष नाहीसा होईल.

गजानन : ठीक आहे. माझेच डोळे एकदा तपासून घेतले पाहिजेत. नाही तर एखाद्या सायकिॲट्रिस्टला दाखवलं पाहिजे. हे - हे फारच झालं. जो नवा माणूस येतो तो म्हणजे वेशांतर करून महंतराजच आल्यासारखा वाटतो.

माधवाचार्य : ते असो. तुझी काय समस्या आहे ती मला सांग बरं.

गजानन : माझी काहीही समस्या नाही, गुरुदेव. आमचं तुमच्याशी विधिपूर्वक लग्न झालेलं आहे --

माधवाचार्य : माझ्याशी ?

गजानन : नव्हे हो. असं मी सौभाग्यवती लैला गजानन चिंचलीकरांना म्हणतोय. तर आता घेतलेली शपथ पाळा म्हणजे झालं. म्हणजे लग्नविधीतली शपथ म्हणतोय मी.

माधवाचार्य : बालका गजानना, संसार करायचा, तो धर्मे च अर्थे च कामे च कारणासाठी. पैकी अर्थप्राप्ती तुमच्या अनौरस पिताजींची. तुमची नव्हे. तुम्ही फक्त 'कामा' वर बोट ठेवून पत्नीला शयन महालात पुरुषार्थ दाखवू पाहताहात. राधामाई धर्मावर बोट ठेवून मुक्तिवादी होऊ बघते आहे. 'कामा' च्या पुरुषार्थापेक्षा 'धर्मा'चा पुरुषार्थ श्रेष्ठ आणि मोठा आहे, हे कोणीही मान्य करील. अतएव न्याय राधामाईच्या बाजूला जातो. आता माझ्या सवालाचं उत्तर दे. बालका, लैलावर तुझं गाढ प्रेम आहे म्हणतोस ?

गजानन : होय. अगदी गाढ प्रेम आहे, गुरुदेव.

माधवाचार्य तिला सुखी करणं, हे या गाढ प्रीतीचं कर्तव्य आहे असं तू मानतोस ?

गजानन : होय गुरुदेव, जरूर मानतो.

माधवाचार्य तेव्हा तिनं आपल्या सुखाचा मार्ग शोधला असल्यानं, तिला त्या मार्गानं जाण्यासाठी तू तिला मदत करणं हे तुझं कर्तव्य ठरतं, खरंय ना ?

गजानन : वाहवा गुरुदेव ! काय पण निवाडा केलात ! तिला आपल्या मार्गानं जाऊ द्यायचं, म्हणजे मी संन्यास घ्यायचा, असंच ना ?

माधवाचार्य : तुला शुद्ध, सात्विक, दैवी, उदात्त प्रीती हवीय ना ? ती फक्त संन्यासातच मिळते, अरे तुझ्यासाठी राधामाई जोगीण झालीय, हे तुला कळतंय की नाही ?

गजानन : ते खरं असलं नसलं तरी मला काही संन्यास घ्यायचा नाही, गुरुदेव.

माधवाचार्य : मग पर्याय एकच. घटस्फोट घेऊन तू दुसरी बायको करणं आणि संसाराला लागणं. राधामाई, या बालकाला तू कायदेशीर रीतीनं मुक्त कर.

राधामाई : गुरुदेव, ती तयारी मी केव्हाच दाखवलीय. मी त्याचे सगळे पैसे, दागदागिने - अगदी मंगळसूत्र सुद्धा– परत केलेत. ती बॅग मिळाली ना रे तुला ?

गजानन : हो, मिळाली. पण लैला --

माधवाचार्य : (उठत) मग त्याच्या बोलण्याकडं तुला लक्ष द्यायची गरज नाही. चल राधिके, सखे, तिकडे मंदिरात आपले भक्तजन वाट पाहत असतील.

लैला : (उठत) प्रिय गजन, भगवानांची तुजवर कृपा होवो. तुझ्यातलं वासनेचं अमंगल हीण जळून जावो. आणि तुझ्यात शुद्ध, सात्विक, उदात्त, आणि दैवी प्रीतीचा उदय होवो. येते मी. (माधवाचार्य लैलाच्या खांद्यावर हात ठेवून तिला घेऊन जातात. त्याच वेळी कृष्णमंदिरातून "मना, चल गंगा जमुना तीर –" हे भजन ऐकू येते. ही दोघे गेल्यावर मंदा येते. तशी –)

गजानन : हा साळभोकपणा पाहिलास ना, मंदे ? ही महामाया 'माझ्यातलं वासनेचं हीण जळून जावो' आणि 'शुद्ध, सात्विक, उदात्त, दैवी प्रीतीचा माझ्यात उदय होवो' असा उलटा मलाच आशीर्वाद देतेय !

मंदा : ही ढालगज भवानी आपलं पूर्वीचं चरित्र विसरली आहे का इतक्यात ?

गजानन : तुला सांगतो मंदे, हा मुकुंद माधवाचार्य तत्वज्ञानाच्या आणि वैराग्याच्या लंब्या-चौड्या गप्पा मारू दे; पण ते काही अस्सल पाणी नाही. तो लैलाला "माझी राधा-माझी राधा" म्हणत कसा जवळ घेत होता, कुरवाळत होता आणि ही मूर्ख बाई कशी त्याला बिलगत होती, ते तू पाहायला हवं होतंस. शुद्ध, उदात्त, सात्विक, दैवी प्रेमाचा जयघोष करीत हा मुकुंद माधव तिला गट्टम करून टाकणार–

मंदा : तिचं नशीब तिच्याबरोबर. तू तिला काय करू शकतोस ?

गजानन : मी पुष्कळ काही करू शकतो. मी काही गप्प बसणार नाही मी तिला नाक मुठीत धरून परत यायला लावीन.

मंदा : कायद्याचा बडगा उगारूनच ना ?

गजानन : नाही. महंतराज कालियास्वामींची सिद्धी वापरून. माझी अजून एक शेवटची इच्छा पुरी करायची बाकी राहिलेली आहे.

मंदा : तुला एक गोष्ट सांगू का, गजानन ? लैलाच्या बाबतीत थोडीशी चूक तुझ्याकडूनच झालेली आहे. इच्छा व्यक्त करताना तू विचारपूर्वक शब्दयोजना केली नव्हतीस. उच्च, उदात्त, सात्विक, शुद्ध, दैवी प्रेम; तेही राधा-कृष्णासारखं, तेही पुन्हा वासनाशून्य; असले शब्द तू वापरलेस. मग लैला जोगीण बनून आणि राधामाई होऊन तुझ्या पुढ्यात उभी राहिली यात नवल ते काय ?

गजानन : तू म्हणतेस ते माझ्याही लक्षात आलंय. म्हणून ही शेवटची इच्छा मागताना मी ॲडव्होकेट जमदग्नींचा सल्ला घेणार आहे. माझ्या इच्छेचा ड्राफ्टच मुळी मी वकीलसाहेबांना तयार करायला सांगणार आहे.

मंदा : अजून शहाणा हो, गजानन. अरे, कायदेशीर भाषा म्हटली की हजार पळवाटा आल्या. तू सुखी व्हावंस एवढीच माझी इच्छा आहे. म्हणून –

गजानन : म्हणूनच वकिलांची बुद्धी वापरून या कालियास्वामीच्या सगळ्या पळवाटा नि चोरवाटा बंदच करून टाकतो मी.

मंदा : तुझं वकिलांशी बोलणं झालंय ?

गजानन : अजून नाही. पण उद्या-परवा मी ॲडव्होकेट जमदग्नींच्याकडं जाणार आहे, आणि (हे ऐकतच मोरोपंत येतात आणि--) त्यांना भेटून –

मोरोपंत : भेटणार असलात तर भेटू नका आणि बोलणार असलात तर बोलू नका. हा ॲडव्होकेट जमगदग्नी एक नंबरचा हरामखोर माणूस आहे. तो तुम्हाला एक सल्ला देतो आणि त्या बाळकृष्ण चिंचलीकराला दुसराच सल्ला देतो. दोन्हींकडून दक्षणा उपटतो आणि आपली तुंबडी भरतो.

गजानन : बाळकृष्ण चिंचलीकरचं प्रकरण किती पुढं गेलंय, मोरोपंत ?

मोरोपंत : बरंच पुढं गेलंय.

गजानन : म्हणजे ?

मोरोपंत : सांगतो. सांगायलाच हवं. त्याआधी एक छोटं काम. मंदे, तुला लैलादेवी ऊर्फ राधामाईंनी कृष्णमंदिरात ताबडतोब बोलावलंय.

मंदा : (विस्मयानं) मला ? कशासाठी अण्णा ?

मोरोपंत : त्यांना तुझ्याशी काही तरी महत्वाचं बोलायचंय म्हणे. जाऊन बघ तरी त्या काय म्हणताहेत त्या. (मंदा जाते. मग) तर रावसाहेब, बाळकृष्णानं कोर्टात ॲफिडेव्हिट देऊन पिटिशन दाखल केलंय. या आठवड्यात बहुतेक तुम्हाला कोर्टाचं समन्स लागेल आणि सगळ्या प्रॉपर्टीला कोर्टाची सिलं लागतील. तुम्ही तेव्हा माझं ऐकलं असतंत तर --

गजानन : त्याची काही गरज नाही, मोरोपंत. मीही हा दावा लढवायचं ठरवलंय. चाळीस लाख रुपये आणि दागदागिने यांनी भरलेली बॅग माझ्या ताब्यात आहे. तेव्हा तिजोरीला आणि बँकेतल्या डिपॉझिट्सना सिलं लागली तरी मला पर्वा नाही. कोर्टात केस लढवून आणि जिंकूनच मी श्रीमंती मिळवीन. चोरीमारी करून नाही.

मोरोपंत : ठीक आहे. तुमची मर्जी. आता तुमची शेवटची इच्छा नेमक्या शब्दांत महंतराजांना सांगण्याची कामगिरी तुम्ही माझ्यावर सोपवावी. या कामात माझा अनुभव फार मोठा आहे.

गजानन : हे, हे इच्छेचं प्रकरण तुम्हाला कसं काय कळलं, मोरोपंत ? मंदानं सांगितलं ?

मोरोपंत : छे छे ! मंदानं कशाला सांगायला हवं ? रावसाहेब, वाड्यावर माझी हयात गेलीय. मला कळल्याशिवाय या वाड्यावर काहीही घडलेलं नाही; घडू शकत नाही. कैलासवासी सावकारांना महंतराजांची भेट मीच घडवून दिली होती, यात काय ते समजा. सावकारांनी ज्या पाच इच्छा मागितल्या त्या महंतराजांनी कशा पुऱ्या केल्या ते मी साक्षेपानं पाहिलंय.

गजानन : म्हणजे बाबा महाराज सुद्धा--

मोरोपंत : होय होय, बाबा महाराज सुद्धा महंतराजांचे कस्टमर म्हणजे गिऱ्हाईक होते. तुम्हाला एक गंमत सांगतो, बाबा महाराज पन्नाशीचे होते, तेव्हा त्यांनी पाऊणशे वर्षांचं प्रदीर्घ आयुष्य मागितलं. ते त्यांना मिळालं. ही त्यांची शेवटची म्हणजे पाचवी इच्छा होती. त्यानंतर अवघ्या वर्षभरात त्यांना पक्षघात झाला. जवळजवळ पंचवीस वर्षं ते अंथरुणाला खिळून होते. जगणं नकोसं झालं, तरी मरण येईना. मरण मिळेना.

गजानन : बाप रे ऽऽ !

मोरोपंत : हा महंतराज एका हातानं तुमची इच्छा पुरी करतो आणि दुसऱ्या

हातानं तुम्हाला ठणाणा करायला लावतो.

गजानन : पण कशासाठी ?

मोरोपंत : तुमची पाचवी इच्छा पुरी झाली की ते तो तुम्हाला सांगेल. सावकारांना त्यांनी सांगितलं होतं. मला मात्र ते ठाऊक नाही. तात्पर्य इतकंच की जी इच्छा मागायची त्याची शब्दयोजना पक्कीच हवी.

गजानन : मोरोपंत, तुम्ही सुद्धा –

मोरोपंत : मी नाही. तुमच्यासारखे दाते असताना या अघोर पंथाकडं जाच कशाला ?

गजानन : खरं म्हणजे पहिल्या चार इच्छा मागताना मी इतका खोलवर विचार केलाच नव्हता.

मोरोपंत : विचार केला नव्हता एवढंच नव्हे, रावसाहेब; तुम्ही इच्छा मागताना चक्क गाढवपणाच केला होता.

गजानन : आंऽ ?

मोरोपंत : आं काय ? पहिल्या दोन्ही इच्छा मागताना, तुम्हाला त्या एकाच इच्छेत समाविष्ट करता आल्या नसत्या ?

गजानन : एकाच इच्छेत दोन इच्छा ? ते कसं काय करता आलं असतं ?

मोरोपंत : लैला तुम्हाला बायको म्हणून हवी होती आणि बाबा महाराजांची संपत्ती तुम्हाला वारसा हक्कानं हवी होती---बरोबर आहे ?

गजानन : बरोबर. पण पुढं ?

मोरोपंत : अंमळ घुटका घेतो आणि सांगतो. (नेहमीप्रमाणे खिशात हात घालून चपटी बाटली उघडतात आणि बाटलीसकट खिसा वर. करून घुटका घेतात. परत सदरा खाली करून खिसा बंद करीत) हाऽऽ! शिंची अंमळ कडकच निघाली ही व्हिस्की. आपल्या लोकांचं काही खरं नाही. व्हिस्की तयार करावी आपल्या स्कॉटिश बांधवांनीच. तर रावसाहेब, लैला बायको म्हणून हवी आणि सावकरांची संपत्ती बिनबोभाट मिळावी एवढं मागण्यासाठी तुम्ही चार इच्छा वाया घालवल्यात. पुन्हा तुम्ही बिनबायकोचे आणि संशयित संपत्ति-मालकीचे– पूर्वपदावर उभे ते उभेच. तुम्ही असं मागायला हवं होत की-- "ही लैला राजे, जी सावकारांची सेवाशूश्रूषा करते, तिनं सगळे उद्योग सोडून, गाढ, उत्कट, एकनिष्ठ प्रेमानं, मजवर आसक्त आणि लंपट होऊन, मजसमवेत पतिसेवापरायण आणि शृंगार– रति-क्रीडा-पारंगत होत्साती, बाबा महाराजांच्या समग्र संपत्तीचा वारसा घेऊन, माझे

दोन पुत्र आणि दोन कन्या यांना जन्म देण्यासाठी पत्नी म्हणून मला मिळावी. काऽय ?

गजानन : अबबब ! केवढं हो हे वाक्य ?

मोरोपंत : पण त्यात सगळं आलं की नाही ?

गजानन : आता माझी शेवटची इच्छा मागायच्या वेळी मी तुमचाच सल्ला घेईन.

मोरोपंत : तेवढ्यानं कामगिरी पार पडेलच असं धरू नका. महंतराज बारा गावचं पाणी प्यालेले आहेत. ते शब्दांच्या फटीफटीतून निसटतील आणि तुमच्या हातावर फक्त तुरी ठेवतील. (तेवढ्यात फोन खणखणतो)

गजानन : बघा बरं, मोरोपंत, फोन कोणाचा आहे ते. रात्रीच्या या वेळी फोन ?

मोरोपंत : (पुढं होऊन रिसीव्हर उचलत) हॅलोऽऽ मी मोरोपंत. अच्छाऽ ॲडव्होकेट जमदग्नी ? नमस्ते. बोला, काय बातमी आहे ?.... हो, इथंच आहेत. (गजानन मोरोपंतांना खुणेनं "तुम्हीच बोला" म्हणून सांगतो.) पण तब्येत जरा नरम आहे. तुम्ही मला सांगायला हरकत नाही त्याबद्दल..हूं...हूं....हूं. पण म्हणजे एकूण कॉंप्रमाइजला बाळकृष्ण चिंचलीकर तयार आहे तर ? काय अटी आहेत ? हूं....हूं...हूं. जरा थांबा, मी रावसाहेबांना सांगतो. (रिसीव्हरवर हात ठेवीत) रावसाहेब, बाळकृष्ण म्हणतोय, सगळ्या इनामी जमिनी आणी रोख पैशांतले निम्मे पैसे त्याला हवेत. उरलेले--

गजानन : शहाणाच दिसतोय हा बाळकृष्ण चिंचलीकर. तसं काही एक होणार नाही. लाख-दोन-लाखांत तो गप्प बसायला तयार असेल तर पाहा. आम्ही दावा लढवणारच म्हणून सांगा त्यांना.

मोरोपंत : रावसाहेब, तडजोड होत असली तर थोडं मागंपुढं --

गजानन : नाही म्हणजे नाही.

मोरोपंत : उद्या कोर्टाची ऑर्डर निघेल तेव्हा--

गजानन : निघू दे. माझ्या बॅगमध्ये चाळीस लाख रुपये आहेत तोपर्यंत मी कोणाला भीत नाही.

मोरोपंत : जशी तुमची मर्जी. (फोनमध्ये) रावसाहेब म्हणताहेत, ते काही जमायचं नाही. दावा लढवायचंच ठरवलंय त्यांनी...... हरले तरी त्यांची तयारी आहे.... पाच नाही, दहा वर्षं लागली तरी केव्हा तरी निकाल लागेलच ना ? हूं...हूं... ठीक आहे. (फोन

ठेवत) जमदग्नीसाहेबांनी बाळकृष्ण चिंचलीकरचं वकीलपत्र घेतलंय.

गजानन : घेऊ द्या. वाट्टेल तेवढे वकील आपल्याला मिळतील.

मोरोपंत : दोन गोष्टी सांगतो तेवढ्या ऐकून घ्या. पलंगाखाली ठेवलेल्या बॅगचा बोभाटा फार झालाय. ऐवज दुसरीकडं सुरक्षित जागी हलवा. आणि महंतराजांच्या कडून तुमची पाचवी इच्छा काय मागणार आहात त्याचा आशय मला सांगून ठेवा. सकाळी कागद तुमच्या हातात ठेवीन. (तेवढ्यात मंदा येते)

गजानन : काय म्हणत होती लैला तुला ?

मंदा : तिनं तुझ्याशी काडीमोड घ्यायचं नक्की ठरवलंय. मला म्हणत होती, तू गजाननशी लग्न कर.

मोरोपंत : हा लुब्रेपणा करायची तिला काय गरज पडली होती ? तुझ्यापुरतं तू बोल म्हणावं.

मंदा : वृंदावनाला माधवाचार्यांच्या बरोबर जाताना, उद्याच ती ॲडव्होकेट जमदग्नींना भेटणार आहे, आणि डायव्होर्ससाठी पिटिशन करणार आहे.

गजानन : तर मग मोरोपंत, माझी इच्छा ऐका आणि ती तुमच्या पद्धतीनं सकाळीच लिहून आणा. लैला माझी बायको म्हणून आपण होऊन घरी परत आली पाहिजे आणि मुख्य म्हणजे प्रेमानं नांदली पाहिजे.

मोरोपंत : मुद्दा लक्षात आला, रावसाहेब.

गजानन : आणि बाळकृष्ण चिंचलीकरासारखी इस्टेटीवरील अरिष्टं पार कायमची नाहीशी झाली पाहिजेत.

मोरोपंत : तेही होऊन जाईल. चल मंदे, जाऊ या आपण. रात्र बरीच झाली. रावसाहेब, सकाळी उजाडताना कागद तुमच्या हाती पडेल.

गजानन : थांबा. या कामाबद्दल तुमचा मेहेनताना काय द्यावा लागणार आहे मला ?

मोरोपंत : कामगिरी तर पार पडू द्या. मग मेहेनताना. येतो रावसाहेब.

(मोरोपंत मंदाला घेऊन निघून जातात. गजानन उठून आत जातो. क्षणार्धात बॅग घेऊन परत येतो. चावी उघडून ऐवज बरोबर आहे हे पाहतो. बॅग पुन्हा बंद करतो. कुठे ठेवावी याबद्दल विचारात पडतो. प्रथम दिवाणाच्या खाली ठेवतो. तिथून काढून कपाटाच्या मागे ठेवतो. पुन्हा तिथून काढून दिसेलशी

कोपऱ्यात ठेवतो. मग उचलत स्वतःशीच म्हणतो, "सगळ्यात सुरक्षित जागा म्हणजे बाथरूम."बॅग उचलून तो आत जात असताना---अंधार)

प्रवेश पहिला संपला.

म. ग्रं. सं. ठाणे, [illegible]
ग्रा. क्र. 23293 नों. दि. ...
वि. ...

## अंक तिसरा ❖ प्रवेश दुसरा

(तोच दिवाणखाना.तीच रात्र. समय मध्यरात्रीचा. दिवाणखान्यात मिट्ट काळोख. विचित्र भयकारी सुरावटीचे संगीत. क्षणात प्रखर बॅटरीचा प्रकाशझोत पडतो. काळी घोंगडी पांघरलेली आणि तोंडाला काळी फडकी बांधलेली तीन बलदंड माणसे आत येतात. त्यांपैकी म्होरक्याच्या हातात फरशी आहे. बाकी दोघांच्या हातांत नागव्या तरवारी आहेत. फरशीवाला हातातल्या बॅटरीचा झोत सर्वत्र टाकतो. तशी---)

एक : पिऱ्यादादा, हतं कोन बी दिसत न्हाय.

पिऱ्या : वटवट करू नगस भिम्या. गुमान आत चल. सावकार कुटं झोपत्यो त्ये मस्नी ठावं हाय. काळू, तू बॅटरी धर.

(असे म्हणत पिऱ्या, भिम्या आणि काळू आत जातात. क्षणभराने गजाननाची अस्फुट किंचाळी..."मेलो मेलोऽऽ.... मारू नका... मारू नका... पाया पडतो.... सगळं देतो...सगळं सांगतो..." हे त्याचे उद्गार..."ए कोंबडीच्या गुमान गप ऱ्हा, न्हाय तर फरशीचा योक वादडा हानला की त्वा हकडं आन् तुझी मुंडी तकडं पडल !" ही पिऱ्याची जरब ऐकू येते. क्षणभरातच गजाननला ते तिघे ओढून बाहेर आणतात आणि जमिनीवर आदळतात. त्याला उताणा पाडतात. भिम्या त्याच्या नरडीवर तरवारीचं टोक ठेवतो. तर पिऱ्या त्याच्या छाताडावर एक पाय ठेवत, मिशीला पीळ भरीत बोलतो-)

पिऱ्या : राम राम नवं सावकार, इनामदार ! मस्नी वळिखलं का ? न्हाय वळिखनार.

गजानन : (पडल्या पडल्या नमस्कार करीत) ग्लॅड टु मीट यू. जरा या साहेबांना तरवारीचं टोक दूर करायला सांगता का ?

पिऱ्या : (पाय काढीत) भिऱ्या, तरवार घे बाजूला आणि जिमिनीवरच बसता कर या गब्रूला.(भिऱ्या तरवार बाजूला घेत गजाननाचा हात खसकन् ओढत त्याला बसता करतो.)

गजानन : (सावरून बसत हात जोडून) अंमळ तोंडावरची ओढणी बाजूला घ्याल तर ओळख पटते का बघतो.

पिऱ्या : (लाथ हाणीत) ए भानचोद, साल्या ही ओढणी हाय का ? म्या मर्द हाय मर्द. ह्यो काळा कपडा हाय कपडा.

काळू : दादा, कपडा काढू नका. उद्या त्यो पोलिसात वर्दी दील.

पिऱ्या : कशी वर्दी दील ती पगतो की म्या. उद्या रातच्याला खांडोळी व्हतील त्याची.

गजानन : छे छे, तशी शंका सुद्धा घेऊ नका. पोलिसांचं दरोडेखोरांना संपूर्ण सहकार्य असतं हे का आम्हाला ठाऊक नाही ? माझं म्हणणं इतकचं की, आपण शांतपणं आपल्याला काय हवं ते सांगितलंत तर पोलिसाशिवायही आपल्यात समझोता होऊ शकेल.

पिऱ्या : भिम्या, इकती वरसं म्या जलमठेपीला व्हतो म्हून जग किती फुडं गेलंय मस्नी कळत न्हाय. पर मला सांग गड्या, मानसं फारच सुदारली का रं ऽऽ ?– न्हाय मंजी सायबाच्या राज्यात कसं, समद्या लोकांचा पोलिसावर इस्वास व्हता. आता पगतो तर साले दरोडेखोरांशीच लोक समझोता करत्यात. डायरेक्ट. च्या मारी ! भानगड तरी काय जालिया ? लोकांन्‌ला दरोडेखोरांचं भ्या राहिलं नाही का काय ?

भिम्या : त्याचं काय जालंया दादा, आजकाल समद्या ठिकाणी दरोडेखोरच माजलंत. कुटं बी जा– कोनाचा तरी हप्ता चालू हायच. समदी कामं हप्त्यावर चालत्यात. देनाराची तकरार न्हाय, घेनाराची खुषी हाय. फुकाटची कोन तकतक करील ?

पिऱ्या : समदं खुषीत व्हत आसल तर आमाला तरी फरशी चालवायची काय हौस हाय ? (फडकं काढीत) काळ्या, टाक रं परकास माज्या मुखड्यावर. पगून घे बाळा ! (काळू बॅटरीचा झोत पिऱ्याच्या तोंडावर टाकतो.) काई वळख पटती का ? वाड्यावर पगितलं व्हतंस का तुज्या ल्हानपनी ?

गजानन : (निरखून पाहत) पिऱ्यादादा, तुमचा आणि महंतराज कालिया-स्वामींचा काही नात्यागोत्याचा संबंध आहे का हो ?

पिऱ्या : न्हाय.

गजानन : निदान सिनेस्टार मदनकुमारचा ? (पिऱ्या म्हणतो "न्हाय.") ॲडव्होकेट जमदग्नींचा तरी ? (पिऱ्या म्हणतो-,"न्हाय.") निदान एम. माधवाचार्यांचा तरी ?

पिऱ्या : न्हाय– न्हाय– न्हाय ! कोन जमदग्नी, कोन मदनकुमार आन्‌ कोन महंतराज काडलास रं तू ? म्या पिऱ्यादादा हाय पिऱ्यादादा. तुजा बा ! बाबा महाराज जिता होता त्या टायमाला दरोड्याचा माल इकायला वाड्यावर यायचा म्या. तुजा बा लई चिक्‍ट आन्‌ हरामखोर. रुपयातले चार आणे हातात ठिवायचा. बक्‍कळ पैका केला भोसडीच्यानं, आन्‌ मला जलमठेपीला धाडलं.

गजानन : मेलेल्याबद्दल वाईट बोलून काय फायदा, पिन्यादादा ?

पिन्या : ए अक्करमाशा, लई शानपना करू नगंस. ही मंडळी तुजं हातपाय तोडून ठिवत्याल, याद राख.

गजानन : राहिलं. आपलं काही म्हणणं नाही. आपण कामकाजाचं बोलू.

पिन्या : पैका कुटाय ? माल कुटाय ?

गजानन : तसा काही ऐवज या तिजोरीत ठेवलाय.

पिन्या : चावी कुठाय ?

गजानन : ही घ्या. (चावी देतो) तिजोरीतला सगळा ऐवज तुम्ही नेलात तरी माझी हरकत नाही. नाही तरी उद्या कोर्टाची सिलं लागायचीच आहेत तिजोरीला. (काळू आणि भिम्या तिजोरी खोलतात आणि बरोबर आणलेल्या काळ्या पिशवीची खोळ करून भराभरा तिजोरीतला ऐवज भरतात.)

पिन्या : ती बॅग कुठाय ?

गजानन : आं ऽ ? ती बॅग तुम्हाला काय ठाऊक ?

पिन्या : बकबक करू नगंस. ती बॅग कुठाय ?

गजानन : म्हणजे काय भानगड झालीय पिन्यादादा, बाळकृष्ण चिंचलीकरांनी इस्टेटीसाठी दावा केलाय माझ्यावर. आता दावा लढवायचा म्हणजे --

पिन्या : (लाथ घालीत) बॅग कुठाय ? (पुन्हा लाथ घालतो.)

गजानन : (ओय ओय) सांगतो - सांगतो. बाथरूम-बाथरूममध्ये ठेवलीय.

पिन्या : भिम्या, बाथरूममध्ये जाऊन बॅग घेऊन ये. (भिम्या बाथरूमकडे लगबगीने जातो.) हरामजादा साला ! बॅगेत माल लपिवतोस काय ? पगतोस काय काळ्या ? ने साल्याला आत फरपटवत. काड बदडून आन् ठीव तोंडात बोळा घालून पलंगाला बांधून.

(गजाननला मारहाण करीत आत ओढूत नेले जात असतानाच -- अंधार)

## प्रवेश दुसरा संपला

# अंक तिसरा ❖ प्रवेश तिसरा

(तोच दिवाणखाना. दुसऱ्या दिवशीची सकाळ. दहा-अकरा वाजण्याची वेळ. रंगमंच रिकामा आहे. क्षणभरात आतून "अयाई ग ऽऽ हरे राम राम---" असं कण्हत कुंथत गजानन काठी टेकत येतो. त्याला आधार देत "सावकाश-हळूहळू--बेतानं" असं म्हणत मंदाही येते. गजाननाच्या कपाळावर, नाकावर आणि हनुवटीवर पट्ट्या चिकटवल्या आहेत. त्याच्या अंगात पायजमा-झब्बा. मंदा त्याला आणून कोचावर बसवते.)

मंदा : खरं म्हणजे आजचा दिवस पडूनच विश्रांती घ्यायला हवी होतीस बघ तू.

गजानन : (कण्हत-कुंथत) छे छे ! विश्रांती कसची घेतोस ? आज तर फारच कामं करायचीत.

मंदा : पण बसवेल का तुला ?

गजानन : बसवेल. बसायलाच हवं.

मंदा : मी पाय चोळू का तुझा ? थांब, तेलाची बाटली घेऊन येते हं. (आत जाते.)

गजानन : कशाला उगीच त्रास घेतेस ? (उजव्या पायावरचा पायजमा गुडघ्यापर्यंत वर घेऊन न्याहाळत--) हूंऽ ! काय निर्दयपणं बदडलं नराधमांनी ? वळ उठलेत. (मंदा तेलाची बाटली घेऊन येते. "हूं, तू आता स्वस्थ बैस." असं म्हणत ती त्याच्या पायाशी बसत, हातावर तेल घेऊन चोळू लागते. तशी "हळूहळूऽऽ ! पाय आहे तो माझा; धुणं वाळत घालायची काठी नाहीये-" असं गजानन ओरडतो.)

मंदा : असं काय करतोस रे ? हळूहळूच तर चोळतेय मी. (पाय हळूहळू चोळत) फार मारलं का रे त्या चांडाळांनी ?

गजानन : अग, दरोडेखोरांचं ते मारणं. ते का आईनं मारलेल्या चापटीसारखं असणार ?

(गालाला हनुवटीजवळ हात लावीत) आऽऽ असा ठोसा मारला त्या भिम्यानं ? तरी नशीब, जिवं मारलं नाही त्यांनी मला. सगळं देऊनच्या देऊन मार खावा लागला मला. माझ्या जवळ आता काही म्हटल्या काही उरलं नाही, म्हणून मी कंठशोष करून सांगत होतो. पण ऐकतोय कोण ? आणखी माल कुठं

लपवला आहेस सांग, म्हणत तो पिऱ्या धबाधबा मला बडवीत सुटला. शेवटी यथेच्छ बडवूनही मी काही सांगत नाही, हे पाहून खरंच काही माल उरला नाही, याची त्यांना खात्री पटली असावी. सगळं पोत्यात घालून घेऊन गेले.

मंदा : जाऊ दे, तू सहीसलामत राहिलास ना ? – मी म्हणते सगळं भरून पावलं.

गजानन : पुरे झालं चोळणं. लैलापरी लैला गेली. घरातला पैसा-अडका, दाग-दागिने गेले. बँकेतल्या ऐवजावर आणि जमीनजुमल्यावर बाळकृष्ण चिंचलीकर टपून बसलाच आहे. चार इच्छा पुऱ्या होऊन पदरात पडलं काय ? भरपूर मार.

मंदा : माझं ऐकणार असशील तर पाचवी इच्छा मागूच नकोस.

गजानन : शहाणीच आहेस. या एका इच्छेत गेलेलं सगळं मी भरून काढणार आहे. (तेवढ्यात मोरोपंत येतात.) या मोरोपंत. काय करताहात तुम्ही खाली इतका वेळ ?

मोरोपंत : पोलिसांचा पंचनामा म्हणजे न संपणारं हरदासाचं कीर्तन असतं.

गजानन : तुम्ही उगीच पोलिसांच्या घोळात पडलात. आता हे त्या पिऱ्याला कळलं तर तो रात्री येऊन माझी खांडोळी करील.

मोरोपंत : काय माय व्यालीय त्याची पुन्हा इथं यायची ? चार-आठ दिवसांत पोलिस त्याला पकडतील पाहा. त्याच्या सगळ्या लपायच्या जागा त्यांना ठाऊक आहेत. कोठल्या तरी गुन्ह्यात तो सापडावा म्हणून पोलिस वाटच बघत होते.

गजानन : छान. फारच भारी मंडळींची भरती झालीय पोलिस खात्यात. म्हणे गुन्ह्यात सापडायची वाट बघत होते. आणि त्या पिऱ्यानं मला जिवं मारलं असतं तर ? त्यांना काय बाकी त्याचं सोयरसुतक ?

मोरोपंत : पण इन्स्पेक्टरसाहेब या वेळी कसून शोध करून गुन्हेगारांना मुद्देमालासकट पकडतील याची मला खात्री वाटते, रावसाहेब.

गजानन : कशावरून ?

मोरोपंत : सकाळी पंचनामा करण्यासाठी सगळ्या वाड्याची तपासणी करताना इन्स्पेक्टरसाहेब तळघरात शिरले आणि त्यांना आमचा 'खजिना' दिसला. मग काय ? ब्लॅक लेबलच्या दोन बाटल्या उचलल्या त्यांनी. अरे, सकाळपासून मला अंमळ कसंसंच वाटतंय. बरोबर ! गडबडीत तीर्थप्राशन राहूनच गेलं. (नेहमीप्रमाणं सदऱ्याच्या खिशातली बाटली आतल्या आत

उघडत, खिशासकट सदरा वर करून घुटका घेतो आणि सदरा खाली करून बाटली बंद करतो.) हाऽ....रावसाहेब, पोलिसांना आपण खबर दिली ही फारच शहाणपणाची गोष्ट झाली. बाळकृष्णाला ही बातमी मिळताच उजडताना त्याचा फोन आला होता. फोनवर मला बाळकृष्ण म्हणतो, "काय हो मोरोपंत, कोर्टाची सिलं लागायच्या नेमक्या आदल्या रात्रीच वाड्यावर दरोडा कसा हो पडला ?" मी म्हटलं, "आम्हीच दरोडा घातला" म्हणून जाऊन तक्रार गुदर पोलिसांत. अरे, मरता मरता आमचे रावसाहेब वाचले आणि तू असले गलिच्छ संशय घेतोस ?

गजानन : (सुस्कारून) हूंऽ ! एकूण हे सगळं सुरळीतपणं निभावणं मला कठीण दिसतंय, मोरोपंत. बाळकृष्ण तयार असेल तर आपण तडजोडीची बोलणी सुरू करावी, असं मला वाटतं.

मोरोपंत : तेही बोलणं झालं, रावसाहेब. आपण दावा लढवू शकणार नाही हे बाळकृष्णाच्या पुरतं लक्षात आलंय. आता त्याला सगळंच हवंय. तडजोड एकच. तुम्ही दोन वेळचं जेवण आणि राहायला एक खोली, तेही कारकुनी कामाच्या मोबदल्यात, यावर संतुष्ट राहावं.

मंदा : ही काय तडजोड झाली ? ही शुद्ध शरणागतीच आहे.

गजानन : त्यापेक्षा प्रसंग पडला तर मी रस्त्यावर जाऊन पडेन.

मोरोपंत : तुम्हाला तो रस्त्यावरच काढायला निघालाय, रावासाहेब.

मंदा : असा बरा रस्त्यावर पडू देईन मी त्याला ?

मोरोपंत : तू काय करू शकणार आहेस, मंदे ? त्यांच्यावर आभाळ फाटणार आहे.

मंदा : वेळ येईल तेव्हा दिसेल.

गजानन : तशी वेळ येणार नाही आणि कोणालाही माझ्यासाठी काहीही करायची गरज पडणार नाही. मंदा, आत पलंगावर माझ्या उशाशी गादीखाली शंख ठेवलाय तेवढा घेऊन ये.

मंदा : पाचवी इच्छा तू मागणार आहेस ?

गजानन : त्यावाचून आता गत्यंतरच नाहीये मला. (मंदा आत जाते.) मोरोपंत—

मोरोपंत : (खिशातून कागद काढत) इच्छा लिहून काढलेला कागद तयार आहे, रावसाहेब.

गजानन : (कागद घेऊन वाचतो, मग) वा, मोरोपंत ! तुम्ही खरं म्हणजे कायदेमंत्रीच व्हायचे. आता महंतराज आले की हा कागदच

त्यांच्या हाती ठेवतो. (मंदा शंख घेऊन येते. गजानन शंख रुमालाने पुसत असतानाच हैबती येतो.) काय रे, हैबती ?

हैबती : रावसाहेब, महंतराज कालियास्वामी आपल्या भेटीसाठी आले आहेत.

गजानन : (विस्मयाने) महंतराज ? भेटीसाठी ? चमत्कार पाहिलात ना मोरोपंत ? मंदा, अग मी हा शंख अजून तोंडापाशी सुद्धा नेला नाही, तो महंतराज हजर ! हैबती, जा बोलावून आण त्यांना. मी त्यांचीच वाट पाहत होतो म्हणून सांग. (हैबती जातो.) शुभ शकुन अहे.

मोरोपंत : रावसाहेब, आता आम्ही इथं थांबत नाही. महंतराज गेल्यावर परत येतो.

मंदा : राहवत नाही म्हणनू सांगते, गजानन. जे काही माझ्याजवळ आहे ते मी तुला देईन. पण तू विषाची परीक्षा पहू नकोस. पाचवी इच्छा मागू नकोस.

मोरोपंत : पुष्कळ बोललीस बये, चल अगोदर. (मोरोपंत, मंदा जातात. गजानन काठी टेकत कष्टानं उभा राहतो. मोरोपंतांनी दिलेला कागद नीट वाचतो. तेवढ्यात कालियास्वामी येतात.)

गजानन : यावं यावं महंतराज. (वंदनासाठी वाकू लागतो, तशी –)

महंतराज : वंदनासाठी वाकायची गरज नाही, बेटा. तुझं कल्याण असो. बैस बैस. (महंतराज स्वतः हातानं त्याला बसवत म्हणतात.) तुला काल रात्री दरोडेखोरांनी मारहाण केल्याचं समजलं म्हणून तुला पाहायला मी तातडीनं आलो. कसा आहेस तू बेटा ?

गजानन : शरीर दुखावलंय खूप जागी, जखमाही झाल्यात; पण त्या काही दिवसांत बऱ्या होतील. महंतराज, मनानं मी फार खचलोय, फार दुःखी-कष्टी झालोय.

महंतराज : का रे बेटा ? मागल्या खेपेच्या तुझ्या दोन्ही इच्छा तर पुऱ्या झाल्या ना ?

गजानन : तशा पुऱ्या झाल्याच म्हटलं पाहिजे. लैला स्वभावानं सात्विक होऊन परतली; पण परत आली ती जोगीण बनून आणि राधामाई होऊन. असली संन्यासिनी घेऊन मी काय करू ? माधवाचार्य तिला वृंदावनाला घेऊन गेले. मदनकुमारनं सगळा पैसा, दागदागिने परत केले. पण दरोडेखोरांनी सगळाच ऐवज धुऊन नेला. एका रात्रीत मी कंगाल झालो. उरलेल्या बँकेतल्या ऐवजावर आणि इनामी जमीनजुमल्यावर बाळकृष्ण चिंचलीकर

डोळा ठेवून बसलाच आहे. मिळून चार इच्छा मागून मला मिळालं काय ? पदरात काय पडलं ? काही नाही. फक्त मार-झोड.

महंतराज : तरी तू मागितलेल्या इच्छा पुऱ्या झाल्या हे तुला मान्यच केलं पाहिजे.

गजानन : हो. ते मान्य करणं मला भाग आहे. मला माझ्या इच्छा सविस्तरपणानं मागता आल्या नाहीत.

महंतराज : किंवा असंही म्हणता येईल की तुला नेमकं काय हवंयं, हेच तुला कधी समजलं नाही. प्रत्येक इच्छेशी तू चाचपडत होतास.

गजानन : पण आता चार वेळा ठेचा लागल्यानं मी शहाणा झालोय, महंतराज.

महंतराज : आयुष्यात असंच घडतं, बेटा. ठेचांवर ठेचा लागलागून बालपणापासून माणसाला शहाणपण शिकावं लागतं. पण तो जेव्हा संपूर्ण शहाणा होतो तेव्हा त्याचं आयुष्यच संपलेलं असतं.

गजानन : तरी पण माझी शेवटची पाचवी इच्छा मागायची शिल्लक राहिली आहे, ही एक सुदैवाची गोष्ट आहे. महंतराज, या वेळी माझी इच्छा मी सविस्तरपणं लिहूनच काढली आहे. (कागद पुढं करीत) ही माझी शेवटची पाचवी इच्छा आपण वाचावी आणि–

महंतराज : शेवटची आणि पाचवी ? (हसतात.)

गजानन : का ? हसलात का, महंतराज ?

महंतराज : बेटा, तुझ्या पाचही इच्छा पुऱ्या होऊन चुकल्या आहेत, हे तुझ्या लक्षात आलं नाही का ?

गजानन : (थक्क होत) माझ्या पाचही इच्छा पुऱ्या झाल्या ? छे छे ! असं कसं होईल ? तुमची काही तरी गफलत झालीय, महंतराज. माझा हिशेब पक्का आहे. मी चारच इच्छा मागितल्या होत्या. पहिल्यांदा दोन आणि नंतरच्या दोन.

महंतराज : नाही बेटा, गफलत तुझीच झालीय. पहिल्या दोन आणि नंतरच्या दोन इच्छा तू मोजल्यास, हे ठीक झालं. पण त्याआधी, "लैलानं येऊन माझी क्षमा मागितली पाहिजे" ही जी इच्छा तू मागितलीस ती या हिशेबात तू कुठं धरलीस ?

गजानन : ती सुद्धा या पाचांतच धरायची ?

महंतराज : अर्थातच. त्यासाठी सुद्धा मला सिद्धी वापरावीच लागली ना ?

गजानन : तुम्ही मला तसं कुठं सांगितलं होतंत ?

महंतराज : तू मला तसं कधी विचारलं होतंस ?

गजानन : म्हणजे मला मिळालेल्या सगळ्या इच्छा संपल्या ?

महंतराज : निश्चितपणे संपल्या.

गजानन : (कपाळावर हात मारीत) हाय रे दैवा. म्हणजे मी पुरतीच फसलो.

महंतराज : फसगत कुठे झाली ?

गजानन : हे मला आधी माहीत असतं, तर केवळ तुमच्या सिद्धीची प्रचीती घ्यायची म्हणून, एका क्षुल्लक कारणासाठी, मी एक मौल्यवान इच्छा वाया घालवली नसती.

महंतराज : बाकीच्या चार इच्छा तरी तू कोणत्या थोर सत्कारणासाठी वापरल्या होत्यास ? बायको हवी म्हणालास; बायको मिळाली. संपत्ती हवी म्हणालास; संपत्ती मिळाली. इच्छांचं गाठोडं उराशी धरून देवासमोर रांग धरणाऱ्या भक्तजनांत आणि तुझ्यात काय फरक आहे ? फक्त तुझ्या इच्छा पुऱ्या झाल्या, त्याही माझ्या सिद्धीनं.

गजानन : पण शेवट काय झाला ? बायकोही गमावली आणि संपत्तीही गेली.

महंतराज : सगळ्या इच्छांचा शेवट असाच होतो, बेटा. इच्छा हा अग्नी आहे. तो जाळीतच जातो. मागं ठेवतो फक्त अतृप्तीची राख.

गजानन : मग महंतराज, माझ्या इच्छा पुऱ्या करून आपण मला कोणतं सुख दिलंत ?

महंतराज : बेटा, मी तुझ्या याच प्रश्नाची वाट पाहत होतो. गजानन, मी तुला तुझ्या कोणत्याही पाच इच्छा पुऱ्या करीन असं वचन दिलं होतं. तुला मी सुख देईन किंवा सुखी करीन, अशी हमी दिली होती का ?

गजानन : नाही महंतराज. पण मला वाटलं होतं की--

महंतराज : इच्छा पुऱ्या झाल्या की सुख हाती आलंच ! होय ना ? (हसतात) इच्छा हे विष आहे, सुख हे अमृत आहे, हे कळायला तुला पाच ठेचा खाव्या लागल्या. सुखाची प्राप्ती ही ईश्वरी कृपा आहे. इच्छापूर्ती हा दैवाचा खेळ आहे. हात पसरल्यावर कदाचित इच्छा पुरी होईल देखील. पण सुख मिळवण्यासाठी खूप द्यावं लागतं, झिजावं लागतं, सोसावं लागतं, कष्टावं लागतं. त्यासाठी कधी कधी इच्छाही माराव्या लागतात. अरे, बोहल्यावर उभं राहिलं की बायको मिळतेच. तिचं प्रेम मात्र मिळवावं लागतं. त्यासाठी सर्वस्व ओतावं लागतं. ही मंदा तुझ्यासाठी सर्वस्व

वेचतेय तशी. पण तुला कुठं हे समजतंय ? गंगेकडं पाठ करून, तहान भागवण्यासाठी तू गटारगंगेत आचमनं करतो आहेस, या करंटेपणाला काय म्हणावं ?

गजानन : खरं आहे, महंतराज. आज माझे डोळे उघडले.

महंतराज : तर मग आता मी तुझी सहावी इच्छा पुरी करायला तयार आहे. बोल तुला काय हवंय ?

गजानन : (हातातला कागद फाडत) मला काहीही नकोय, महंतराज. सहावीच काय आपण माझी सहाशेवी इच्छा पुरी केलीत, तरी मला सुखाचा स्पर्शही होणार नाही, याची मला खात्री पटलीय. मी गरीब राहिलो, एकाकी राहिलो तरी चालेल. पण माझं सुख मीच मिळवीन.

महंतराज : (आनंदानं) शाब्बास बेटा, आता तू खरा शाहाणा झालास. माझं काम संपलं. येतो मी.

गजानन : थांबा महंतराज. मला तुम्हाला फक्त एकच प्रश्न विचारायचा आहे.

महंतराज : विचार बेटा.

गजानन : मलाच शहाणं करण्यासाठी तुम्ही आपल्या सिद्धी का वापरल्या ? मी एक सामान्य माणूस. ना तुमच्या नात्या-गोत्यातला, ना तुमच्या शिष्यपरिवारातला. तरी सुद्धा तुम्ही एवढे कष्ट का घेतलेत ?

महंतराज : (स्मित करीत) तू हा प्रश्न विचारणार हे मला माहीत होतं. ऋषीचं कूळ आणि नदीचं मूळ विचारू नये, म्हणतात. पण माझ्याबद्दल तुला विचारण्याचा हक्कच आहे. आणि मी जे सांगणार आहे त्यामुळे तुझ्या शहाणपणात भरच पडणार आहे. माझा जन्म एका गरीब घरात झाला. शाळा-कॉलेजात मी एक बुद्धिमान, अभ्यासू, हुशार आणि सुस्वभावी विद्यार्थी होतो. विज्ञानाची मला आवड होती. अशातच मला एक अवलिया भेटला. त्यानं काही सिद्धीचे प्रयोग मला दाखवले. ते पाहून या सिद्धी प्राप्त करून घेण्याचा मला ध्यास जडला. मी लौकिकाचा मार्ग सोडला आणि अघोरी पंथात सामील झालो. माझी अवघी दिनचर्या आणि जीवनपद्धती बदलली. पण या प्रकरणात ज्या एका मुलीशी माझे प्रेमसंबंध जडले होते आणि आम्ही लग्न करून संसार करणार होतो, तिचा मजकडून विश्वासघात घडला. त्याशिवाय मला इलाजच नव्हता दुसरा. करण मी जी वाट

धरली होती ती नापरतीची होती. त्या मुलीची सगळी वाताहत झाली. अखेर बाबा महाराजांनी तिला आश्रय दिला. जन्मभर बदलौकिक सोसून तिनं त्यांची मनोभावे सेवा केली. मला सिद्धी प्राप्त झाल्या; पण मी ईश्वरी कृपेला आणि खऱ्या सुखाला वंचित झालो. पुढं तिला मी एकदा पश्चात्तापदग्ध अंतःकरणानं भेटलो आणि विश्वासघाताचं परिमार्जन करण्यासाठी काय हवं ते माग म्हणून विनवलं. ती "मला काही एक नको" असं म्हणाली. मी तिच्या पाया पडलो, माफी मागितली. तेव्हा ती आपल्या छोट्या मुलाला पुढं करून म्हणाली "तुला परिमार्जनच करायचं असेल तर या तुझ्या मुलाला शहाणं कर." गजानन, तो मुलगा तू होतास.

गजानन : (धडपडून उठत) क– काय सांगता काय महंतराज ? मी–मी तुमचा मुलगा ?

महंतराज : होय बेटा. तू माझा पुत्र आहेस. मी सिद्धी मिळवण्यासाठी ईश्वरी कोपाला पात्र झालेला तुझा दुर्दैवी बाप आहे. मला माझं शासन भोगावं लागणारच आहे. अघोर पंथाकडून आणि ईश्वराकडूनही. पण तुझं काहीही विपरीत होणार नाही. (त्याच्या तोंडावरील पट्ट्या काढीत) ऊठ, तुला काही एक झालेलं नाही. तू ठणठणीत आहेस. इच्छापूर्तीसाठी मी तुला ज्या अटी घातल्या होत्या त्या तू विसरून जा. त्याचं प्रायश्चित्त मी भोगणार आहे. तुझ्या दुर्दैवी बापालाही तू विसरून जा. पण लक्षात ठेव, कधीही सिद्धीच्या मागं लागू नकोस. सुखाला जवळचा मार्ग नाही. सुखाचा मार्ग खडतर तपश्चर्येतूनच जातो. येतो मी. (गजाननला पोटाशी घेतात. गजानन प्रेमानं त्यांचे डोळे टिपतो. त्यांना वंदन करतो. महंतराज त्याला आशीर्वाद देतात. मग झटकन् पाठ वळवून निघून जातात. क्षणमात्र स्तब्धता. गजानन बसतो. मग मंदा एक ट्रे घेऊन येते. पाठोपाठ मोरोपंतही येतात.)

मोरोपंत : गेले एकदाचे महंतराज, बरं झालं.

मंदा : (ट्रे ठेवीत) या बशीत मात्रा उगाळून आणलीय. ती थोडी घे. मग ही साबूदाण्याची लापशी करून आणलीय ती खा. अगदी रिकाम्या पोटानं बसणं बरं नाही. हा वेखंडाचा लेपही करून आणलाय. जिथं सूज आलीय ना, तिथं लावल्याबरोबर चार-पाच तासांत सूज उतरेल बघ. (पाहत) अग बाई हे काय ?

गजानन : मंदा, मी ठणठणीत बरा झालोय. महंतराजांनीच मला बरं केलं.

मंदा : बरं झालं. देवच पावला.

गजानन : पण त्या डब्यात काय आणलं आहेस ? बेसनाचे का रव्याचे लाडू ?

मंदा : नाही- (डबा देत) उघडून पाहा.

गजानन : (डबा उघडतो आणि थक्क होत) दागिने ? बाबा महाराजांनी दिलेले ?

मोरोपंत : (उसळून) कार्टे, तू हे काय चालवलं आहेस ?

मंदा : तुला ज्यात सुख वाटेल ते तू कर, असं तुम्हीच मला सांगितलं होतंत ना ? अण्णा, या दागिन्यांचा मला मुळीच लोभ नाही. ते विकून टाकले तर गजाननला त्याचे पैसे उपयोगी पडतील.

मोरोपंत : कर्म माझं आता काय सांगणार तुला ? मूर्खे, आपण होऊन घरात आलेली लक्ष्मी खुशाल परतवून लावतेस ?

गजानन : चिंता करू नका, मोरोपंत. मंदानं थोर मनानं दिलेलं हे स्त्रीधन मी काही घेणार नाहीये. मंदा, पूर्वी मी तुझ्यावर नुसतं प्रेमच करीत होतो. आता मला तुझ्याबद्दल कृतज्ञता वाटते. हे सगळे अलंकार तुझे आहेत. ते तुझ्याच अंगावर शोभले पाहिजेत. (डबा परत तिच्या हातात देतो.)

मोरोपंत : हे अगदी रास्त झालं. पण मुख्य विचारायचं म्हणजे, तुमच्या शेवटच्या आणि पाचव्या इच्छेचं काय झालं, रावसाहेब ? मी लिहून दिलेला कागद दाखवलात का महंतराजांना ?

गजानन : नाही. तुमचा कागद मी फाडून टाकला, मोरोपंत. कारण मी एक वेगळीच इच्छा मागितली. पण महंतराज म्हणाले, "बेटा, ही तुझी इच्छा काही मी पुरी करू शकणार नाही. मोरोपंतांनाच तुला काय हवंय ते मागून घे."

मोरोपंत : मीऽऽ ? बाप रेऽ ! मी गरीब बापडा काय हो तुमची इच्छा पुरी करणार ? हे पाहा रावसाहेब, आपल्यापाशी दिडकी शिल्लक नाही.

गजानन : पैशाचा सवाल नाहीये, मोरोपंत.

मोरोपंत : मग काय हवंय तुम्हाला ? हांऽऽ- तळघरातल्या दारूच्या खजिन्यावर डल्ला मारायचा विचार दिसतोय तुमचा, रावसाहेब ? ते मात्र जमायचं नाही हो. आज सकाळी इन्स्पेक्टरसाहेबांनी, दोन 'ब्लॅक लेबल' च्या बाटल्या पळवल्या. आत्ता इतक्यात त्यांचा कॉन्स्टेबल आला, पाच व्हाइट हॉर्सच्या बाटल्या द्या

म्हणून मागायला. "तुझ्या बापानं ठेवलाय पांढरा घोडा" असं सांगून पिटाळलं त्याला. शिंची दारू सुद्धा सुखानं पिऊ देत नाहीत माणसं म्हणजे काय ? आता सगळा स्टॉक शेतावरल्या आमच्या पर्णकुटीतच नेऊन टाकतो दुपारी.

मंदा : पण अण्णा, गजानन दारूला स्पर्श तरी करतो का ? उगीच काय काही तरी ?

मोरोपंत : मग त्यांना काय पाहिजेल ? मी काय देणार रावसाहेबांना ?

गजानन : मोरोपंत, मला तुमची मंदा हवीय. बायको म्हणून.

मंदा : (भारावून त्याचा हात धरीत) गजानन--

मोरोपंत : (थक्क होत) आंऽऽ? म्हणजे रावसाहेब, तुम्ही मंदाला लग्नासाठी मागणी घालताहात ? अरे वा वा वा ! ही तर माझीच इच्छा महंतराजांनी न मागता पुरी केली. (चटकन खिशात हात घालून बाटली उघडतात, खिशासकट सदरा वर करून घुटका घेतात. सदरा खाली करीत बाटली बंद करतात, आणि मग--)हाऽऽ--- छान छान ! रावसाहेब, तुम्ही आता बाळकृष्ण चिंचलीकराची काळजीच करू नका. दावा आपण जिंकला असं समजा. "जगी सर्वसूखी असा कोण आहे ?" (मंदा आणि मोरोपंत दोघंही एकदम म्हणतात- "मी."

गजानन : (स्मित करीत) तुम्ही दोघंही सुखी झालात ना ? मग मी सुद्धा फार फार फार सुखी आहे.

(त्याच वेळी – पडदा)

**तिसरा अंक संपला**

**आणि**

**नाटकही संपलं.**

म. ग्रं. सं. ठा.
क्र. २३२९३ दि. ७.५.८९
वि. नाटक
IRBK-0123213